२१३

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७

# महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१

(दिनांक १ सप्टेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. XXVII of 1961

# THE MAHARASHTRA AGRICULTURAL LANDS (CEILING ON HOLDINGS) ACT, 1961

**(As modified upto 1st September 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : २२.६० रुपये ]

S (II) 1254

# महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१

## अनुक्रमणिका

कलम

पृष्ठ


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ ... ४

२. व्याख्या ... ४

२-क. न्यायाधिकरणांची रचना व पुनर्रचना ... १०

प्रकरण दोन

**जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे**

३. कमाल क्षेत्रापेक्षा जादा जमीन धारण करण्यास प्रतिषेध आणि कमाल क्षेत्राहून जादा असलेले क्षेत्र हे अधिक जमीन असणे. १२

४. कुटुंब घटकाने धारण केलेली जमीन ... १४

५. कमाल क्षेत्र ... १४

६. विवक्षित परिस्थितीत कमाल क्षेत्रापेक्षा जादा धारण केलेली जमीन कमाल क्षेत्राच्या मर्यादेत असल्याचे मानणे. १५

७. वगळलेली जमीन व इतर जमीन या दोन्ही जमिनी धारण करणाऱ्या व्यक्ती १५

प्रकरण तीन

**हस्तांतरण व संपादन यांवर निर्बंध-उल्लंघनाचे परिणाम**

८. हस्तांतरणावर निर्बंध ... १६

९. कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन संपादन करण्यावर निर्बंध ... १६

१०. जमिनीच्या विवक्षित हस्तांतरणाचे व संपादनाचे परिणाम ... १६

११. विभागणी करण्यावर निर्बंध ... १८

११-क. दुसऱ्या वर्गात रूपांतरित केलेल्या जमिनीच्या बाबतीत कमाल क्षेत्र ... १८

प्रकरण चार

**अतिरिक्त जमीन**

१२. विवरणे सादर करणे ... १८

१२-क. विवरण दाखल करण्याची मुदत वाढवण्याचा राज्य शासनाचा अधिकार ... २०




H-1254-i

१३. विवरण सादर करण्यात कसूर करणे ... २०

१४. चौकशी करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार ... २२

१५. अतिरिक्त जमिनींचे क्षेत्र ठरवताना भू-मापन क्रमांक किंवा त्यांच्या पोट विभागांचे विभाजन. २३

१६. कमाल क्षेत्राइतकी जमीन ताब्यात ठेवण्यासाठी जमिनीची निवड करणे ... २३

१७. कलम १४ अन्वयेच्या चौकशीमुळे परिणाम झालेल्या व्यक्तींना नोटीस देणे ... २४

१८. जिल्हाधिकाऱ्याने विवक्षित गोष्टींचा विचार करणे ... २६

१९. विवक्षित प्रकरणांमध्ये जमीनमालकास जमीन परत देण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार २७

२०. कलम १९ अन्वये जमिनीवरील जमीनमालकाच्या हक्काचा विचार करण्याची रीत २८

२१. जिल्हाधिकाऱ्याने अतिरिक्त जमीन, वगैरेबाबत अधिकथन करणे आणि त्याचे परिणाम. २९

२१-क. अतिरिक्त जमिनीच्या वापराबद्दल आणि भोगवट्याबद्दल भरपाई ... ३२


प्रकरण पाच

## भरपाई


२२. भरपाई देणे ... ३३

२३. भरपाईचे प्रमाण ... ३३

२४. जिल्हाधिकाऱ्याने हितसंबंध असलेल्या व्यक्तीस भरपाईबद्दल आपल्या मागण्या सादर करण्याविषयी नोटीस देणे. ३५

२५. भरपाई ठरविणे आणि तिचे संविभाजन ... ३५

२६. भरपाईची रक्कम द्यावयाची पद्धती ... ३६


प्रकरण सहा

## अतिरिक्त जमिनीची वाटणी


२७. अतिरिक्त जमिनीचे वितरण ... ३७

२७-क. सार्वजनिक प्रयोजने इत्यादींसाठी जमीन देण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार ... ४१

२८. कार्यक्षम रीतीने लागवड करण्यासाठी आणि कच्च्या मालाचा पुरवठा सतत चालू ठेवण्यासाठी औद्योगिक उपक्रमाकडून घेतलेल्या जमिनीच्या संबंधात खास तरतूद. ४१

२८-१क [वगळण्यात आले] ४३

## अनुक्रमणिका--चालू


२८-१कक. राज्य महामंडळांना जमीन देण्याचा राज्य शासनाचा अधिकार ... ४३

२८-१ख [वगळण्यात आले] ... ४६

२८-क. [वगळण्यात आले] ४६

२९. कलम २८ अन्वये देण्यात आलेल्या जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजन करण्यावर निर्बंध. ४६


### प्रकरण सात

### कार्यपद्धती आणि अपील


३०. चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार ... ४७

३१. जिल्हाधिकाऱ्याचे निर्णय अभिलेखित करण्याची रीत ... ४७

३२. नोटीस बजावणे ... ४७

३३. अपिले ... ४८

३४. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचा आदेश वगैरे कायम करण्याचा अधिकार ... ४९

३५. अपिलाबाबत मुदत ... ४९

३६. न्यायालय फी ... ४९


### प्रकरण आठ

### संकीर्ण


३७. घोषणापत्रातील किंवा निवाड्यातील लेखनदोष इत्यादी दुरुस्त करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. ५०

३८. जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे रकमा वसूल करण्याजोग्या असणे ... ५०

३९. कोणत्याही व्यक्तीस जमिनीचा कब्जा देण्याची रीत ... ५०

४०. संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकणे ... ५१

४०-क. विवरण इत्यादी सादर करण्यात कसूर केल्यास शिक्षा ... ५१

४१. अधिकारितेस प्रतिबंध ... ५१

४२. चौकशी व कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असणे ... ५१

४३. अधिकारी हे लोकसेवक असणे ... ५२

४३-क. एकापेक्षा अधिक ग्राम लेखापालांच्या अधिकारितेत जमीन धारण करण्यात आली असेल त्याबाबतीत पुरवावयाचे तपशील. ५२

| | | |
|---|---|---|
| ४४. | या अधिनियमान्वये केलेल्या उपाययोजनेस संरक्षण ... | ५२ |
| ४४-क. | काही क्षेत्रात किंवा या अधिनियमाच्या काही प्रयोजनार्थ, जिल्हाधिकाऱ्यांच्या अपवादाने जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार वापरण्याचा किंवा त्यांची कर्तव्ये पार पाडण्याचा न्यायाधिकरणाचा अधिकार. | ५३ |
| ४४-ख. | विधिज्ञ, इत्यादींना उपस्थितीतून वगळणे ... | ५३ |
| ४५. | नियंत्रण ... | ५३ |
| ४५-क | कलम २७ खालील चौकशी व कार्यवाही यात पुनरीक्षण करण्याचा आयुक्ताचा अधिकार. | ५५ |
| ४६. | नियम करण्यांचा अधिकार ... | ५५ |
| ४७. | वगळण्यात आलेल्या जमिनी ... | ५६ |
| ४८. | सुधारलेले अधिनियम ... | ५९ |
| ४९. | अडचणी दूर करण्याचा अधिकार ... | ५९ |
| | पहिली अनुसूची ... | ६० |
| | दुसरी अनुसूची ... | ६२ |
| | [तिसरी अनुसूची] वगळण्यात आली ... | ६३ |

# १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७[१]

## [ महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ ]

[१६ जून, १९६१]

या अधिनियमात खालील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.*

१९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९.

१९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.

१९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.

१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.†

१९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

१९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.‡

१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.**

१९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८***

१९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

१९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३,†† (४-५-१९७२)§§

१९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०‡‡ (९-१०-१९७३)§§

---

१. उद्देश व कारणे यांच्या विवरणपत्रासाठी, १९६१ चे **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग पाच, पृष्ठे १०५-१०७ पहावीत; संयुक्त समितीच्या अहवालासाठी, वरील दिनांकाचे **राजपत्र,** यातील भाग पाच, पृष्ठ १५१-२७७ पहावीत.

* मुख्य अधिनियम हा, १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ अन्वये सुधारला असल्याचे नेहमीच समजले जाईल. (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याचे कलम ९ पहा.)

† १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ अन्वये केलेल्या सुधारणा ह्या, ज्या तारखेस मुख्य अधिनियम अमलात आला, त्याच तारखेस अमलात आल्या असल्याचे समजले जाईल. (१९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याचे कलम ५ पहा.)

‡ १९६८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा, १९६८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ अन्वये निरसित करण्यात आला.

** १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० हा, १९६९ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

*** १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ हा, १९६९ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

†† १९७२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा, १९७२ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, अन्वये निरसित करण्यात आला.

‡‡ १९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ हा, १९७३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, अन्वये निरसित करण्यात आला.

§§ अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.@ (१९-९-१९७५)§§
१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, (२०-९-१९७५)§§
१९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.†
१९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.
१९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ (१२-१-१९७७).†† ***

---

§§ अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक

@१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याचे कलम २ पुढीलप्रमाणे आहे :--

संविधानाचा अनुच्छेद ३९, खंड (ब) व (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेली तत्त्वे प्रत्यक्षात आणण्याच्या बाबतीतील राज्याचे धोरण अंमलात आणण्यासंबंधीची उद्‌घोषणा

"२. भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३१-क यास अनुलक्षून, याद्वारे, घोषित करण्यात येत आहे की, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३९, खंड (ब) व खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेली तत्त्वे प्रत्यक्षात आणण्याच्या बाबतीतील राज्य शासनाचे धोरण अंमलात आणण्यासाठी आणि विशेषतः, परंतु पूर्वगामी उद्‌घोषणेच्या सामान्यतेस बाध न आणता, जीमुळे समाजातील कृषिविषयक साधनसामग्रीच्या मालकीचे व त्यावरील नियंत्रणाचे सर्वजनहिताच्या दृष्टीने वितरण होईल व कृषिविषयक अर्थव्यवस्थेच्या प्रवर्तनाची परिणती लोकहितास अपायकारक ठरेल अशा प्रकारे कृषि उत्पादनाच्या साधनसामग्रीचे आणि संपत्तीचे केंद्रिकरण होण्यात होणार नाही अशी तरतूद करण्यासाठी, या अधिनियमाच्या तरतुदी अधिनियमित करण्यात आल्या आहेत."

† (२) कलम २, खंड (क), कलम ३, कलम ४, खंड (ब), (क) आणि (ड), कलम ८, खंड (अ), कलम १०, कलम ११, खंड (ब) आणि कलमे १२ ते १७ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी २२ सप्टेंबर १९७५ रोजी अंमलात आल्या असल्याचे समजण्यात येईल, कलम २, खंड (अ) आणि (ब), कलम ५, कलम ७, आणि कलम ८, खंड (ब) यांच्या तरतुदी २ ऑक्टोबर १९७५ रोजी अंमलात आल्या असल्याचे समजण्यात येईल आणि या अधिनियमाच्या उर्वरित तरतुदी ३ जानेवारी १९७६ पासून अंमलात येतील. [पहा सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १ (२)].

†† अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

*** सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७ चे कलम ५ पुढीलप्रमाणे.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ४५-अ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने वापरलेली पुनरीक्षणाची अधिकारिता विधिग्राह्य असणे.

५. कोणत्याही न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा व विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९७६ च्या आरंभापूर्वी जिल्हाधिकाऱ्याने मुख्य अधिनियमाच्या कलम ४५-अ च्या पोट-कलम (२) द्वारे त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून किंवा तसा वापर केल्याचे समजून कोणतीही गोष्ट केली असेल किंवा कोणतीही कृती केली असेल किंवा कोणताही आदेश दिला असेल (यात त्याने कोणत्याही प्रकरणात वापरलेली पुनरीक्षणाची अधिकारिता किंवा चालवलेली कार्यवाही याचा समावेश आहे), तर केवळ जिल्हाधिकाऱ्यास अशी गोष्ट करण्याचा किंवा अशी कृती करण्याचा किंवा असा आदेश देण्याचा अधिकार नव्हता या किंवा अशी गोष्ट, कृती करणे किंवा असा आदेश देणे हे या अधिनियमान्वये सुधारण्यात आलेल्या उक्त पोट-कलम (२) अन्वये झालेले नसून ते सुधारणेपूर्वीच्या उक्त कलम ४५-अ च्या पोट-कलम (२) प्रमाणे झाले असल्याचे समजण्यात येते या किंवा जिल्हाधिकाऱ्यास कोणत्याही न्यायाधिकरणाच्या कामकाजाच्या पुनरीक्षणाची कोणतीही अधिकारिता अन्यथा नव्हती याकारणावरून ती गोष्ट, कृती किंवा आदेश बेकायदेशीर किंवा अविधिग्राह्य असल्याचे किंवा तो कोणत्याही वेळी बेकायदेशीर किंवा अविधिग्राह्य होता असे मानण्यात येणार नाही आणि तदनुसार अशा सर्व प्रकरणात जिल्हाधिकाऱ्याने केलेली कोणतीही गोष्ट, कृती किंवा दिलेला आदेश हा या अधिनियमाद्वारे सुधारलेल्या उक्त पोट-कलम (२) अन्वये कायदेशीरपणे व विधिग्राह्यतेने केला अथवा दिला असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा गोष्टीच्या, कृतीच्या किंवा आदेशाच्या विरुद्ध कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही किंवा चालू ठेवण्यात येणार नाही.

१९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०.

१९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

~~१९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.~~ £

१९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

२००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ (२०-५-२००३) ££ ††

२००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ @ (१७-२-२००६)

---

£सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, चे कलम ३ पुढीलप्रमाणे :--

राज्य शासनाने सुरू केलेल्या किंवा कार्यवाहीची किंवा संमत केलेल्या आदेशांची विधिग्राह्यता आणि त्यानुसार केलेल्या कृत्यांची किंवा गोष्टींची विधिग्राह्यता.

१९७६ चा महाराष्ट्र २६.

१९७६ चा महाराष्ट्र २६.

३. मुख्य अधिनियमामध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा कोणताही निकाल, हुकूमनामा किंवा आदेश, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, 'महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमालमर्यादा) (सुधारणा) अधिनियम, १९७६' या अन्वये सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या कलम ४५, पोट-कलम (२) अन्वये, उक्त सुधारित अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेस सुरू होणाऱ्या आणि ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस संपणाऱ्या कालावधीत, राज्य शासनाने, सुरू केलेली कोणतीही कार्यवाही किंवा संमत केलेला कोणताही आदेश हा विधिअग्राह्य असल्याचे समजण्यात येणार नाही. आणि जणू काही ह्या अधिनियमाद्वारे अशा रीतीने सुधारणा केल्याप्रमाणेच्या कलम ४५, पोट-कलम (२) च्या तरतुदी, ह्या अशी कार्यवाही सुरू करण्यात आली असेल किंवा आदेश संमत करण्यात आला असेल अशा महत्त्वाच्या सर्व वेळी लागू होत्या असे समजून या अधिनियमान्वये सुधारणा केल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या कलम ४५, पोट-कलम (२) अन्वये वैधरीत्या ती कार्यवाही सुरू केली असल्याचे किंवा तो आदेश संमत केला असल्याचे समजण्यात येईल; आणि त्यानुसार अशा रीतीने संमत केलेल्या कोणत्याही आदेशानुसार केलेली सर्व कृत्ये किंवा गोष्टी या विधिग्राह्य व परिणामकारक असतील आणि राज्य शासनाला अशी कार्यवाही सुरू करण्याचा किंवा असा आदेश संमत करण्याचा अधिकार कोणताही नव्हता केवळ याच कारणावरून अशी सुरू केलेली कार्यवाही, संमत केलेला आदेश, केलेली कृती किंवा करण्यात आलेल्या गोष्टी याबाबत कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही.

££ शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग क्र. आयसीएच-३४९८/सीआर-२३/भाग एफ/एल-७, दिनांक ८-५-२००३ अन्वये सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ अंमलात आला.

†† अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

@ सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ३ द्वारे सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ निरसित करण्यात आला.

महाराष्ट्र राज्यात शेतजमीनधारणेची कमाल मर्यादा (किंवा परामर्यादा) ठरवून देणे; अशा कमाल मर्यादेहून अधिक असलेल्या जमिनी संपादन करणे व त्यांचे वाटप करणे; [१][शेतीच्या प्रयोजनासाठी जमिनीचा पुरेपूर आणि कार्यक्षम वापर करण्याकरिता आणि राज्याच्या मालकीच्या किंवा राज्याच्या नियंत्रणाधीन असलेल्या महामंडळाकडून (यात कंपनीचा समावेश होतो) शेतीचे कार्यक्षम व्यवस्थापन सुनिश्चित करण्याकरिता ज्या जमिनी उपक्रमाकडून घेतलेल्या होत्या व ज्यांचा सधन गटामध्ये एकसंधपणा राखण्यात आला होता त्या जमिनी अशा महामंडळांना किंवा कंपनीस देण्याची तरतूद करणे;] आणि उपरिनिर्दिष्ट प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करणे, यांबाबत अधिनियम;

**ज्याअर्थी,** सर्वसाधारण जनतेचे अधिक कल्याण होईल अशा रीतीने शेतजमिनींची वाटणी करणे शक्य व्हावी म्हणून लोकहिताच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्यात शेतजमीनधारणेची कमाल मर्यादा (किंवा परामर्यादा) ठरवून देणे, अशा कमाल मर्यादेहून अधिक धारण केलेली जमीन संपादन करणे व ती भूमिहीन व इतर व्यक्तींना वाटून देणे [२][तसेच, शेतीच्या प्रयोजनांसाठी जमिनींचा पुरेपूर आणि कार्यक्षम वापर करण्याकरिता आणि राज्याच्या मालकीच्या किंवा राज्याच्या नियंत्रणाधीन असलेल्या महामंडळाकडून (यात कंपनीचा समावेश होतो) शेतीचे कार्यक्षम व्यवस्थापन सुनिश्चित करण्याकरिता ज्या जमिनी उपक्रमांकडून घेतलेल्या होत्या व ज्यांचा सधन गटामध्ये एकसंधपणा राखण्यात आला होता त्या जमिनी अशा महामंडळांना किंवा कंपनीस देण्याची तरतूद करणे;] आणि उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबी यासाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :--

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ असे म्हणता येईल.

(२) संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे या अधिनियमाचे विस्तारक्षेत्र राहील.

(३) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, जो [३]दिनांक नेमून देईल त्या दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या

२. संदर्भावरून अन्यथा अर्थ अभिप्रेत नसेल तर, या अधिनियमात,--

(१) "शेतकी" या संज्ञेत,--

(क) बागायत करणे ;

(ख) धान्याची पिके, गवत किंवा बागायतीचे उत्पन्न काढणे किंवा शिंगाड्यांची लागवड करणे;

(ग) शेतकऱ्याने धारण केलेल्या जमिनीचा किंवा तिच्या भागाचा चराईसाठी उपयोग करणे;

---

[१] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २, द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] २६ जानेवारी १९६२, शासकीय अधिसूचना, महसूल विभाग, क्रमांक आयसीएच-१०६२-एम-(स्पेशल), दिनांक १६ जानेवारी १९६२.

(घ) राब खतांच्या कारणासाठी भातशेतीच्या जमिनीस आनुषंगिक असलेल्या किंवा नसलेल्या कोणत्याही जमिनीचा उपयोग करणे ;

(ङ) दुग्धव्यवसाय;

(च) कुक्कुटपालन;

(छ) पशुधनाची निपज करणे

या गोष्टींचा अंतर्भाव होईल; पण, तीत फक्त लाकडे तोडण्याचा अंतर्भाव होणार नाही.

[१][* * * * *]

(३) "शेतकरी" याचा अर्थ जातीने जमीन कसणारी व्यक्ती असा आहे;

[२][(३क) "सुधारणा अधिनियम, १९७२" म्हणजे महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा कमी करणे) आणि (सुधारणा) अधिनियम, १९७२;] १९७५ चा महा. २१

(४) "नेमलेला दिवस" याचा अर्थ, ज्या दिवशी हा अधिनियम अंमलात येईल तो दिवस असा आहे;

(५) "जमिनीचा वर्ग" याचा अर्थ, पुढील वर्गाच्या जमिनींपैकी कोणत्याही एका वर्गाची जमीन :--

[३][(क) जलसिंचनासाठी खात्रीचा पाणीपुरवठा असलेली आणि वर्षात निदान दोन पिके देण्याची क्षमता असलेली जमीन, म्हणजेच,--

(एक) राज्य शासनाने किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेने बांधलेल्या किंवा परिरक्षण केलेल्या कोणत्याही साधनापासून किंवा पाण्याच्या इतर कोणत्याही नैसर्गिक साधनापासून हंगामात, तसेच बारमहा पाटाने पाणी मिळणारी जमीन; किंवा

(दोन) शासनाच्या मालकीच्या व शासनाकडून व्यवस्था ठेवल्या जाणाऱ्या उद्धरण सिंचन पद्धतीद्वारे राज्य शासनाने किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेने बांधलेल्या किंवा परिरक्षण केलेल्या कोणत्याही साधनापासून किंवा पाण्याच्या इतर कोणत्याही नैसर्गिक साधनापासून बारमहा पाणी मिळणारी जमीन;

(ख) जलसिंचनासाठी खात्रीचा बारमाही पाणीपुरवठा नसलेली परंतु वर्षातून फक्त एका पिकासाठीच खात्रीचा पाणीपुरवठा असलेली (खंड (ग) खाली मोडणाऱ्या जमिनीव्यतिरिक्त) जमीन, म्हणजेच--

(एक) राज्य शासनाने किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेने बांधलेल्या किंवा परिरक्षण केलेल्या कोणत्याही साधनापासून किंवा पाण्याच्या इतर कोणत्याही नैसर्गिक साधनापासून हंगामात पाटाने पाणी मिळणारी जमीन; किंवा

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ (१) अन्वये खंड (२) वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये खंड (३क) समाविष्ट करण्यात आला.

३. मूळ उपखंड (अ) ते (ड) याऐवजी उपखंड (क) ते (ड) वरील अधिनियमाचे कलम ३ (१) आणि १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम २ अन्वये दाखल करण्यात आले.

(दोन) राज्य शासनाने किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेने बांधलेल्या किंवा परिरक्षण केलेल्या कोणत्याही साधनापासून किंवा पाण्याच्या इतर कोणत्याही नैसर्गिक साधनापासून [खंड (क) च्या बाब (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या उद्धरण सिंचन पद्धती व्यतिरिक्त असणाऱ्या], उद्धरण सिंचन पद्धतीद्वारे बारमहा पाणी मिळणारी जमीन; किंवा

(तीन) कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पाच्या जलप्रदाय क्षेत्रातील जमिनीत असलेल्या किंवा नदीच्या, ओढ्याच्या किंवा नैसर्गिकरीत्या साचलेल्या पाण्याच्या किंवा जलनि:सारण मार्गाच्या (ज्यांच्यापासून बारमहा पाणी मिळत असेल अशी नदी, ओढा, नैसर्गिकरीत्या साचलेले पाणी किंवा जलनि:सारण मार्ग असलेल्या) पात्रात असलेल्या खाजगी मालकीच्या विहिरीपासून बारमहा पाणी मिळणारी जमीन;

(ग) राज्य शासनाने किंवा कोणत्याही जिल्हा परिषदेने बांधलेल्या व परिरक्षण केलेल्या कोणत्याही साधनापासून किंवा पाण्याच्या इतर कोणत्याही नैसर्गिक साधनापासून हंगामात पाटाने पाणी मिळणारी, खात्रीचा पाणीपुरवठा नसलेली जमीन, म्हणजेच, ज्या बाबतीत तात्पुरत्या पाणीविषयक मंजुरी अन्वये पुरवठा केला जातो किंवा जलाशयातील पाण्याच्या उपलब्धतेच्या आधारे अशी मंजुरी विनियमित केली जाते अशी जमीन;

(घ) कोरडवाहू पिकाची जमीन, म्हणजेच, या खंडाच्या उप-खंड (क), (ख) किंवा (ग) खाली येणाऱ्या जमिनीव्यतिरिक्त, मुंबई उपनगर जिल्हा, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी आणि भंडारा हे जिल्हे व चंद्रपूर जिल्ह्याचे ब्रम्हपुरी, गडचिरोली आणि सिरोंचा हे तालुके यात असलेली आणि प्रारंभाच्या तारखेच्या निकटपूर्वी तीन वर्षांच्या अखंड कालावधीसाठी भाताच्या लागवडीखाली असलेली जमीन;

(ङ) कोरडवाहू जमीन, म्हणजेच या खंडाच्या उप-खंड (क), (ख), (ग), किंवा (घ) खाली येणाऱ्या जमिनीव्यतिरिक्त इतर जमीन.

**स्पष्टीकरण.**--या खंडाच्या प्रयोजनांसाठी,--

(१) पाटबंधारे प्रकल्पाच्या जलप्रदाय क्षेत्रात असलेली जमीन, म्हणजे अशा प्रकल्पापासून ज्यांना पाणी मिळत असेल किंवा मिळण्याची शक्यता असेल अशा सर्व जमिनी;

(२) उपखंड (क), (ख) किंवा (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जलसिंचनाच्या कोणत्याही साधनापासून जिला पाणी मिळत असेल आणि २६ सप्टेंबर १९७० रोजी किंवा तत्पूर्वी बागायतीसाठी (नारळ, पोफळ, केळी, पेरू यांच्या लागवडीसाठी किंवा द्राक्षांच्या मळ्यांसाठी वापरण्यात आलेल्या जमिनीव्यतिरिक्त) वापरण्यात आली अशी जमीन, ४ ऑगस्ट १९७९ पर्यंत उपखंड (ङ) खाली येणारी जमीन असल्याचे मानण्यात येईल;

(३) उपखंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जलसिंचनाच्या कोणत्याही साधनापासून जिला पाणी मिळत असेल अशी जमीन, जर डिझेलवर किंवा विद्युतशक्तीने किंवा दोन्हींच्या वापराने चालवण्यात येणाऱ्या खाजगी उद्धरण सिंचनाद्वारे जलसिंचन होत असेल आणि बांधकाम १५ ऑगस्ट १९७२ नंतर झालेले असेल तर ती उक्त उपखंड (ख) खाली येणारी जमीन असल्याचे मानण्यात येणार नाही.]

१९६६ चा महा. ४१. [१][(५-क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ असा आहे.]

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ (४) अन्वये खंड (५-क) समाविष्ट करण्यात आला.

(६) "जिल्हाधिकारी" या संज्ञेत, अपर जिल्हाधिकारी, आणि [1][अधिनियमान्वये] जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये बजावणारा व त्याच्या अधिकारांचा वापर करणारा सहायक जिल्हाधिकारी किंवा उप-जिल्हाधिकारी यांचा अंतर्भाव होतो. तसेच त्यात, या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने विशेषेकरून अधिकार प्रदान केलेला आणि सहाय्यक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसेल असा कोणताही इतर अधिकारी याचासुद्धा अंतर्भाव होतो;

[2][(६-क) प्रारंभाचा दिनांक म्हणजे २ ऑक्टोबर १९७५;]

(७) "आयुक्त" या संज्ञेत, अपर आयुक्त याचा अंतर्भाव होतो;

(८) "कसणे" या संज्ञेचा अर्थ, या संज्ञेचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार व तत्सम शब्दप्रयोग धरून, शेतीचे उत्पादन काढण्याकरिता किंवा त्यात सुधारणा करण्याकरिता जमीन नांगरणे किंवा तिची मशागत करणे-मग असे काम अंगमेहनतीने करण्यात येवो किंवा जनावरांच्या किंवा यंत्राच्या सहाय्याने करण्यात येवो--किंवा अशा जमिनीवर कोणतीही शेतीविषयक कामे करणे, असा होतो;

**स्पष्टीकरण.**--जी व्यक्ती, कोणत्याही जमिनीवरील गवत कापण्यासाठी करार करते ती व्यक्ती केवळ त्याच कारणावरून अशी जमीन कशीत असल्याचे समजले जाणार नाही;

(९) "जातीने जमीन कसणे" म्हणजे, स्वत:साठी--

(एक) स्वत:च्या अंगमेहनतीने, अथवा

(दोन) स्वत:च्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या अंगमेहनतीने, अथवा

(तीन) मजुरीने कामावर लावलेल्या मजुरांकरवी अथवा रोख रकमेत किंवा मालाच्या स्वरूपात (परंतु पिकाच्या हिश्श्याच्या रूपात नव्हे) द्यावयाच्या वेतनावर ठेवलेल्या नोकरांकरवी स्वत:च्या किंवा स्वत:च्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली जमीन कसणे;

**स्पष्टीकरण १.**--जर असमर्थता प्राप्त झालेली व्यक्ती, अशी जमीन आपल्या नोकरांकरवी किंवा मजुरीने कामावर लावलेल्या मजुरांकरवी कसत असेल, तर ती, अशी जमीन जातीने कशीत असल्याचे समजले जाईल;

**स्पष्टीकरण २.**--एखाद्या संयुक्त कुटुंबाच्या बाबतीत, जर अशी जमीन अशा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीकडून अशा रीतीने कसण्यात येत असेल तर, ती जातीने कसण्यात येते असे समजले जाईल;

(१०) "वगळण्यात आलेली जमीन" याचा अर्थ, कलम ४७ अन्वये या अधिनियमांच्या तरतुदींच्या कक्षेतून वगळण्यात आलेली जमीन असा आहे;

(११) "कुटुंब" या संज्ञेत, अविभक्त हिंदु कुटुंबाचा आणि इतर व्यक्तींच्या बाबतीत, ज्या गटातील किंवा घटकातील व्यक्ती संपत्तीच्या किंवा कब्जाच्या किंवा निवासाच्या बाबतीत, रूढीनुसार किंवा वहिवाटीनुसार अविभक्त म्हणून समजण्यात येतात त्या गटाचा किंवा घटकाचा अंतर्भाव होतो ;

---

[1] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३ (५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी खंड (६-क) दाखल करण्यात आला.

[१][(११-क) "कुटुंब घटक" याचा अर्थ, कलम ४ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे कुटुंब घटक असा आहे;]

(१२) "कृषि संस्था" याचा अर्थ, सहकारी संस्थांची नोंदणी करण्यासंबंधी त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिन्वये कृषि संस्था म्हणून नोंदविलेली किंवा नोंदविण्यात आली आहे असे समजण्यात येणारी संस्था असा आहे;

१९४७ चा मुंबई ६२. (१३) "तुकडा" या संज्ञेचा अर्थ, मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याचे कलम २ मधील त्या व्याख्येंत जो अर्थ दिलेला आहे तोच अर्थ असेल;

(१४) "जमीन धारण करणे" या व्याख्येचा अर्थ, त्या संज्ञेचे व्याकरणदृष्ट्या होणारे फेरफार व तत्सम शब्दप्रयोग धरून, मालक किंवा कूळ म्हणून कायदेशीरपणे जमीन प्रत्यक्ष आपल्या ताब्यात ठेवणे, असा आहे, आणि "धारण केलेली जमीन" या व्याख्येचा तदनुसार अर्थ लावला जाईल;

(१५) "संयुक्त कृषि संस्था" याचा अर्थ, (सहकारी संस्थाची नोंदणी करण्यासंबंधी त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिन्वये संयुक्त कृषि संस्था म्हणून नोंदविलेल्या किंवा नोंदणी करण्यात आली आहे असे समजण्यात येणाऱ्या) ज्या कोणत्याही संयुक्त कृषि संस्थेच्या सदस्यांकडून, त्यांनी किंवा संस्थेने धारण केलेली जमीन संयुक्तपणे कसण्यात येते, ती संयुक्त कृषि संस्था असा आहे;

(१६) "जमीन" याचा अर्थ, शेतकीच्या कामासाठी उपयोगात आणलेली किंवा उपयोगात आणणे शक्य असलेली जमीन असा आहे. [२][आणि तीत,--

(क) अशा जमिनीवरील किंवा जमिनीशी अनुलग्न असलेल्या शेतघरांच्या जागा;

(ख) ज्या जमिनीवर नैसर्गिकरीत्या गवत वाढते अशी जमीन;

(ग) अशा जमिनीवरील झाडे व उभी पिके;

(घ) शेतीसाठी लागणारा पाण्याचा साठा किंवा पाणीपुरवठा करण्यासाठी अशा जमिनीवर बांधलेले किंवा परिरक्षित केलेले कालवे, पाट, विहिरी, नळ किंवा जलाशये किंवा इतर बांधकामे;

(ङ) शेतीच्या उपयोगासाठी, अशा जमिनीवर बांधलेली किंवा परिरक्षित केलेली जलनि:सारणाची कामे, बांधबंदिस्तीची कामे, बंधारे किंवा अशा जमिनीशी अनुलग्न असलेली इतर कामे; आणि अशा जमिनीवरील सर्व बांधकामे व कायम स्वरूपाची जोडकामे, यांचा अंतर्भाव होतो;]

[३][(१७) "भूमिहीन व्यक्ती" याचा अर्थ, जी कोणतीही जमीन धारण करीत नसेल अशी व्यक्ती किंवा जी कृषि प्रयोजनास्तव, कोरडवाहू जमिनीचे एक हेक्टरपेक्षा (अथवा कलम ५ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने त्या प्रमाणात रूपांतरित करण्यात आलेल्या ओलिताच्या जमिनीपेक्षा) अधिक क्षेत्र धारण करीत नसेल आणि शेतजमिनीवर मुख्यत्वेकरून, अंगमेहनतीने आपली उपजीविका करीत असेल अशी व्यक्ती असा आहे;]

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३ (७) अन्वये खंड (११-क) समाविष्ट करण्यात आला.

२. हा मजकूर "आणि तीत" या शब्दांनी सुरुवात होणाऱ्या व "त्या जमिनीच्या" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ यातील कलम २ अन्वये नेहमीसाठी दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

३. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ (८) अन्वये खंड (१७) मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[1]* * *

(१९) "महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण" म्हणजे *मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ अन्वये रचना केलेले महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण; १९५८ चा मुंबई ३१

[2]* * *

(२१) कोणत्याही जमिनीच्या संबंधात "मालक" या संज्ञेत,

[3][भोगवटादार किंवा अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला वरिष्ठ भूमिधारक].

म्हणून जमीन धारण करणारी किंवा शासनाकडून पट्ट्याने जमीन धारण करणारी व्यक्ती, कब्जेगहाण घेणारी व्यक्ती, आणि आपल्या उदरनिर्वाहासाठी जमीन धारण करणारी व्यक्ती, यांचा अंतर्भाव होतो;

(२२) "व्यक्ती" या संज्ञेत कुटुंबाचा अंतर्भाव होतो;

(२३) "असमर्थता" प्राप्त झालेली व्यक्ती याचा अर्थ,--

(क) विधवा, किंवा (ख) अज्ञान व्यक्ती, किंवा (ग) अविवाहित स्त्री किंवा एखादी स्त्री विवाहित असून जिला घटस्फोट मिळालेला आहे, किंवा जिला आपल्या पतीपासून विभक्त राहण्यास न्यायालयाकडून परवानगी मिळाली आहे, किंवा जिचा पती सशस्त्र सेनेत नोकरी करणारी व्यक्ती आहे अशी स्त्री, किंवा जी बाब (घ) खाली येत असेल अशी स्त्री, किंवा (ङ) एखाद्या मानसिक अथवा शारीरिक दौर्बल्यामुळे स्वतःच्या देखरेखीखाली किंवा जातीने मेहनत करून जमीन कसण्यास असमर्थ झालेली व्यक्ती;

आणि यात, सशस्त्र सेनेत नोकरी करणाऱ्या व्यक्तीचाही अंतर्भाव होईल;

(२४) "विहित केलेले" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे, विहित केलेले असा आहे.

[4]* * *

(२६) "संबंधित कुळकायदा" याचा अर्थ--

(क) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागाच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग व कच्छ प्रदेश) अधिनियम, १९५८. १९५८ चा मुंबई ९९

---

[1] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, अधिनियमाच्या कलम ३ (९) अन्वये खंड (१८) वगळण्यात आला.

[2] १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, याच्या कलम २ (ब) अन्वये खंड (२०) वगळण्यात आला.

[3] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ (११) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ (१२) अन्वये खंड (२५) वगळण्यात आला.

* आता पहा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र ४१).

१९५० चा हैद्रा. २१. (ख) राज्याच्या हैद्राबाद प्रदेशाच्या संबंधात, हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०, आणि

१९४८ चा मुंबई ६७ (ग) राज्याच्या उर्वरित भागाच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८;

(२७) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमास जोडलेली अनुसूची असा आहे;

(२८) "सशस्त्र सेनेत नोकरी करणारी व्यक्ती" याचा अर्थ, संघराज्याच्या सशस्त्र सेनेत नोकरी करणारी व्यक्ती, असा आहे; परंतु एखादी व्यक्ती संघराज्याच्या सशस्त्र सेनेत नोकरी करणारी आहे किंवा नाही असा प्रश्न उद्भवल्यास, राज्य शासन त्याचा निर्णय करील व राज्य शासनाचा त्यावरील निर्णय हा अंतिम राहील;

[1]* * *

(३०) "कूळ" याचा अर्थ, पट्ट्याने जमीन धारण करणारी व्यक्ती असा आहे, व यात संबंधित कूळ कायद्यान्वये कूळ म्हणून समजण्यात येणाऱ्या व्यक्तीचा अंतर्भाव होतो; आणि "जमीनमालक" याचा अर्थ, ज्या व्यक्तीपासून कुळाने पट्ट्याने जमीन धारण केलेली आहे ती व्यक्ती असा आहे आणि यात संबंधित कुळकायद्यान्वये जमीन मालक म्हणून समजण्यात येणाऱ्या व्यक्तीचा अंतर्भाव होतो;

[1]* * *

[2][(३१) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, कलम २-क अन्वये रचना करण्यात आलेले अतिरिक्त भूनिर्धारण न्यायाधिकरण, किंवा यथास्थिति, भू-वितरण न्यायाधिकरण असा आहे.]

(३२) या अधिनियमात वापरण्यात आलेले पण व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, [3][अधिनियमात] त्यांना जो अर्थ दिलेला असेल, तोच असेल.

न्यायाधिकरणाची रचना व पुनर्रचना

[4][२-क (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी आणि या अधिनियमाच्या अशा प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी किंवा त्यातील अशा तरतुदीसाठी किंवा तरतुदींसाठी आवश्यक असतील तेवढ्या न्यायाधिकरणांची रचना करता येईल.

(२) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये अतिरिक्त जमिनींच्या निर्धारणाच्या प्रयोजनासाठी ज्या न्यायाधिकरणाची रचना किंवा पुनर्रचना करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या न्यायाधिकरणास अतिरिक्त भू-निर्धारण न्यायाधिकरण असे म्हणण्यात येईल. या अधिनियमान्वये अतिरिक्त जमिनीच्या वितरणाच्या प्रयोजनासाठी ज्या न्यायाधिकरणाची रचना किंवा पुनर्रचना करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्यास भू-वितरण न्यायाधिकरण असे म्हणण्यात येईल.

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ (१२) अन्वये खंड (२९) व (३१) हे वगळण्यात आले.

२. १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ अन्वये खंड (३१) समाविष्ट करण्यात आला.

३. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ (१३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३ अन्वये कलम २-क समाविष्ट करण्यात आले.

(३) प्रत्येक न्यायाधिकरण हे तीनपेक्षा कमी नसतील एवढ्या सदस्यांचे मिळून बनलेले असेल. त्यांच्यापैकी एक सदस्य राज्यातील, तहसीलदाराच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसणारे दिवाणी पद धारण करणारी किंवा धारण केलेले असणारी व्यक्ती असेल आणि अशी व्यक्ती ही त्या न्यायाधिकरणाची सभापती असेल.

(४) तसेच, राज्य शासनास, वेळोवेळी, पोट-कलम (१) अन्वये, रचना केलेल्या न्यायाधिकरणाची पुनर्रचना करता येईल किंवा, कोणत्याही वेळी, असे न्यायाधिकरण नाहीसे करता येईल. राज्य शासनास, कोणत्याही वेळी, लेखी आदेशाद्वारे, कोणतीही कारणे न देता, न्यायाधिकरणामधून कोणत्याही सदस्यास काढून सुद्धा टाकता येईल किंवा तो सदस्य असल्याचे बंद करता येईल.

(५) न्यायाधिकरणाच्या बैठकीसाठी गणपूर्ती आणि बैठकीत अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

[1]["परंतु असे की, न्यायाधिकरणाच्या बैठकीसाठी ठरवलेल्या वेळेपासून अर्ध्या तासात, अशा रीतीने विहित करण्यात येईल एवढी गणपूर्ती झाली नाही आणि जर फक्त सभापती उपस्थित असेल तर त्याबाबतीत त्याच्या उपस्थितीने, न्यायाधिकरणाची बैठक होण्याकरिता आवश्यक ती गणपूर्ती झाल्याचे मानण्यात येईल. तो बैठकीची पुढील कार्यवाही चालू करील आणि कार्यवाहीतील त्याचा निर्णय हा न्यायाधिकरणाचा निर्णय म्हणून नोंदवील.]

(६) [2][पोट कलम (५) मध्ये अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून, न्यायाधिकरणाचे सर्व निर्णय हे] उपस्थित सदस्यांच्या बहुमताप्रमाणे असतील आणि मत समप्रमाणात विभागले गेले असेल त्या बाबतीत, सभापतीचा निर्णय हा न्यायाधिकरणाचा निर्णय असेल :

परंतु, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींशी किंवा कार्यवाहीत अभिलिखित केलेल्या पुराव्याशी निर्णय विसंगत आहे, या आधारावर सभापतीचा बहुमताशी मतभेद असेल त्या बाबतीत, तो ज्यामुळे बहुमताशी त्याचा मतभेद आहे त्या विसंगती दर्शवून जिल्हाधिकाऱ्यांकडे निर्देश करील. त्या प्रकरणाची कार्यवाहीसुद्धा तो जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवील. तसा निर्देश मिळाल्यावर, जिल्हाधिकारी स्वतः त्याची सुनावणी करील आणि ती कार्यवाही यथाशीघ्र निकालात काढील.

(७) अशा न्यायाधिकरणाची कोणतीही कार्यवाही किंवा कोणतेही कृत्य हे, केवळ त्याच्या सदस्यांमध्ये कोणतेही पद रिक्त आहे म्हणून किंवा त्याच्या रचनेत किंवा पुनर्रचनेत कोणतीही त्रुटी आहे एवढ्याच कारणास्तव विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येणार नाही.

(८) सभापती व्यतिरिक्त न्यायाधिकरणाच्या इतर सदस्यांना, न्यायाधिकरणाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी, वर्ग एकच्या अधिकाऱ्यांना अनुज्ञेय असेल असा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता आणि इतर भत्ते देण्यात येतील आणि त्यांचा पदावधी धरून सदस्यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्ती ह्या राज्य शासन, वेळोवेळी, आदेशान्वये ठरवील त्याप्रमाणे असतील. सभापतीस, राज्य शासन आदेशाद्वारे ठरवील असे भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

---

१. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०, कलम २ (१) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(९) या कलमात किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही नियमात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य विधानमंडळाच्या सदस्यास, तो न्यायाधिकरणाच्या सदस्याचे पद धारण करीत असताना, न्यायाधिकरणाच्या बैठकीस उपस्थित राहण्याच्या किंवा न्यायाधिकरणाचे इतर कोणतेही कर्तव्य पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी त्याला करावा लागलेला वैयक्तिक खर्च भागवण्याच्या प्रयोजनार्थ, अशा पदाच्या धारकास देण्यात येणाऱ्या प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा अशा इतर भत्त्यांव्यतिरिक्त इतर कोणतेही पारिश्रमिक किंवा भत्ता स्वीकारण्याचा हक्क असणार नाही.]

## [1][प्रकरण दोन

## जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे

कमाल क्षेत्रापेक्षा जादा जमीन धारण करण्यास प्रतिषेध आणि कमाल क्षेत्राहून जादा असलेले क्षेत्र हे अधिक जमीन असणे.

**३.** (१) या प्रकरणाच्या व प्रकरण ३ च्या तरतुदींना अधीन राहून कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब घटक, प्रारंभाच्या दिनांकानंतर, यात पुढे तरतूद केलेल्या रीतीने निश्चित केलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा जादा जमीन धारण करणार नाही.

**स्पष्टीकरण.**--एखाद्या व्यक्तीस किंवा कुटुंब घटकास, वगळलेली जमीन, कोणत्याही मर्यादेपर्यंत धारण करता येईल.

---

[1]१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४ आणि १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ याअन्वये प्रकरणे २ व ३ बदली दाखल करण्यात आली. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याचे कलम ५ पुढीलप्रमाणे आहे :--

"५. या अधिनियमाच्या कलम ४ द्वारे प्रकरण २ व ३ बदली दाखल करण्यात आले असले तरी, कोणत्याही धारण जमिनींच्या संबंधातील कमाल क्षेत्र आणि मूळ प्रकरण २ व ३ मधील उपबंधानुसार अशा धारण जमिनींपैकी अधिक जमीन निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी प्रलंबित असलेली सर्व कार्यवाही चालू राहील आणि सुधारणा अधिनियम, १९७२ याद्वारे मुख्य अधिनियमात सुधारणा करण्यात आली नसल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये निकालात काढण्यात येईल; आणि कलम २१ चे पोट-कलम (४) किंवा यथास्थिति, पोट-कलम (५) अन्वये राज्य शासनाने संपादन केलेल्या अधिक जमिनींच्या भरपाईची रक्कम, या अधिनियमाद्वारे असुधारित मुख्य अधिनियमात तरतूद करण्यात आलेल्या दरानुसार असेल. व्यावृत्ती

कमाल क्षेत्र ठरविण्यात आल्यानंतर आणि अधिक जमीन म्हणून सीमित केलेले क्षेत्र, मुख्य अधिनियमाच्या कलम २१ अन्वये, अंतिमरीत्या घोषित करण्यात आल्यावर, उपरोक्तप्रमाणे अधीन राहून, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाचे उपबंध, अशा धारण जमिनींना अणि अधिक जमिनी म्हणून घोषित करण्यात आलेल्या जमिनींना लागू होतील."

(२) एखाद्या व्यक्तीने किंवा, यथास्थिति, एखाद्या कुटुंब घटकाने, या राज्यात अथवा भारताच्या इतर कोणत्याही भागात धारण केलेली, कमाल क्षेत्रापेक्षा जादा असेल अशी सर्व जमीन ही त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिमध्ये किंवा परिपाठामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अधिक जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि अधिक जमिनीबाबत यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने तिची विल्हेवाट लावण्यात येईल.

एखाद्या व्यक्तीच्या किंवा, यथास्थिति, एखाद्या कुटुंब घटकाच्या धारण जमिनीतील अधिक जमीन निश्चित करताना, एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील कोणतीही व्यक्ती (प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतरच्या दिनांकास किंवा धारण जमीन कमाल क्षेत्रापेक्षा ज्या दिनांकास अधिक होत असेल अशा दिनांकानंतरच्या कोणत्याही दिनांकास परंतु त्या धारण जमिनीच्या संबंधात अधिक जमिनीची उद्घोषणा करण्यात येण्यापूर्वी) मरण पावली आहे या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करण्यात येईल; आणि त्यानुसार, ती व्यक्ती किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकातील व्यक्ती जणू मरण पावलीच नाही असे समजून, अधिक जमीन निश्चित करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**--या राज्यात धारण करावयाच्या कमाल क्षेत्राची परिगणना करताना आणि अधिक जमीन निश्चित करताना, भारताच्या कोणत्याही इतर भागातील जमिनीचे क्षेत्र (जमिनीवरील कमाल मर्यादेसंबंधीच्या कोणत्याही विधिन्वये भारताच्या इतर कोणत्याही भागात जी धारण करण्याचा एखाद्या व्यक्तीला अथवा कुटुंब घटकाला हक्क असेल अशी जमीन) विचारात घेण्यात येईल. फक्त या राज्यात धारण केलेली जमीनच अधिक जमीन म्हणून घोषित करता येईल.

(३) कोणतीही जमीन--

(क) एखादी व्यक्ती ज्या कुटुंबातील आहे त्या कुटुंबाने धारण केली असेल;

(ख) एखादी व्यक्ती जिची सदस्य आहे अशा सहकारी संस्थेने धारण केली असेल, किंवा तिच्याकडून उपयोगात आणली जात असेल;

(ग) एखाद्या व्यक्तीने इतरांबरोबर संयुक्तपणे धारण केली असेल;

(घ) एखाद्या व्यक्तीने भागीदारी संस्थेतील भागीदार म्हणून धारण केली असेल;

आणि अशा व्यक्तीची किंवा अशी व्यक्ती ज्या कुटुंब घटकातील आहे त्या कुटुंब घटकाची धारण जमीन [वरील खंड (क), (ख), (ग) किंवा (घ) मध्ये वर्णन केलेल्या जमिनी सारख्या जमिनीत अशा व्यक्तीचा कोणताही हिस्सा असल्यास त्याची मर्यादा धरून] प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही दिनांकास (यात यापुढे "संबंधित दिनांक" असा जिचा निर्देश करण्यात आला आहे) कमाल क्षेत्रापेक्षा अधिक होत असेल त्या बाबतीत, कमाल क्षेत्र व त्या धारण जमिनीतील अधिक जमीन निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा व्यक्तींचा उक्त जमिनीतील हिस्सा पुढील रीतीने मोजण्यात येईल :--

(एक) एखादी व्यक्ती ज्या कुटुंबातील आहे त्या कुटुंबाने धारण केलेल्या जमिनीतील त्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचा हिस्सा अशा रीतीने ठरविण्यात येईल की, **ज्यामुळे विभाजनानंतर जिला हिस्सा मिळण्याचा हक्क असेल** अशी कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती संबंधित दिनांकास जमिनीची विभागणी करण्यात आली होती व ती स्वतंत्रपणे धारण करण्यात आली होती असे समजून तिच्या हिश्श्याच्या जमिनीच्या मर्यादेपर्यंतची जमीन स्वतंत्रपणे धारण करीत असल्याचे मानण्यात येईल;

(दोन) एखाद्या सहकारी संस्थेने धारण केलेल्या किंवा तिच्याकडून उपयोगात आणल्या जाणाऱ्या किंवा इतरांबरोबर संयुक्तपणे धारण केलेल्या किंवा एखाद्या भागीदारी संस्थेने धारण केलेल्या जमिनीतील एखाद्या व्यक्तीचा हिस्सा, हा जणू संबंधित दिनांकास जमिनीची विभागणी करण्यात आली होती व तो स्वतंत्रपणे धारण केली होती असे समजून, सहकारी संस्थेत किंवा संयुक्तपणे धारण केलेल्या जमिनीत किंवा भागीदारी संस्थेतील भागीदारी म्हणून अशा व्यक्तीचा जो हिस्सा असेल त्या हिश्श्याच्या प्रमाणानुसार तो जेवढी जमीन धारण करू शकत असेल, त्या मर्यादेपर्यंत असल्याचे धरण्यात येईल.

(४) कोणत्याही व्यक्तीच्या किंवा, यथास्थिति कुटुंब घटकाच्या धारण जमिनीच्या कमाल क्षेत्राची परिगणना करताना, कोणतीही जमीन एकापेक्षा अधिक वेळा विचारात घेतली जाणार नाही.

कुटुंब घटकाने धारण केलेली जमीन.

४. (१) कुटुंब घटकातील प्रत्येक व्यक्तीने संयुक्तपणे असो किंवा स्वतंत्रपणे धारण केलेली सर्व जमीन, कुटुंब घटकाचे कमाल क्षेत्र निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, कुटुंब घटकाने धारण केली असल्याचे मानण्यात येईल.

[1][* * *]

**स्पष्टीकरण.**--"कुटुब घटक" म्हणजे--

(क) व्यक्ती आणि तिचा/तिची पती/पत्नी (किंवा एकाहून अधिक पत्नी) व त्यांचे अज्ञान मुलगे आणि असल्यास, अज्ञान अविवाहित मुली; किंवा

(ख) पती/पत्नी यांपैकी कोणीही मरण पावेल त्याबाबतीत हयात पती/पत्नी किंवा अनेक पत्नी आणि अज्ञान मुलगे व अज्ञान अविवाहित मुली; किंवा

(ग) पती/पत्नी मरण पावतील त्याबाबतीत अशा मयत पतीचे/पत्नीचे अज्ञान मुलगे व अज्ञान अविवाहित मुली.

(२) या कलमाच्या प्रयोजनार्थ, न्यायालयाने २६ सप्टेंबर १९७० नंतर केलेल्या विवाह विघटनाच्या सर्व उद्‌घोषणा आणि त्या दिनांकास व त्या दिनांकानंतर, रूढीनुसार किंवा योग्यरीत्या केलेली, घोषित किंवा जाहीर केलेली सर्व विवाह विघटने ही, कुटुंब घटकाने धारण करावयाचे कमाल क्षेत्र ठरविण्याच्या प्रयोजनार्थ, दुर्लक्षिण्यात येतील, आणि त्यानुसार पती पत्नीपैकी प्रत्येकाने धारण केलेली जमीन, विघटन झाले नव्हते असे समजून, त्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात येईल. परंतु उपरोक्त दिनांकापूर्वी कोणत्याही न्यायालयापुढे विवाह विघटनाची कार्यवाही सुरू झालेली असेल तर, विवाह विघटन पूर्णपणे परिणामक्षम असेल (मग विवाह त्या दिनांकास किंवा त्यानंतर विघटित झालेला असो) आणि कुटुंब घटकाचे कमाल क्षेत्र ठरविताना ते विचारात घेण्यात येईल.

कमाल क्षेत्र

५. (१) पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात अनुसूचीच्या स्तंभ २, ३, ४, ५ व ६ मध्ये वर्णन केलेल्या जमिनीच्या प्रत्येक वर्गाच्या बाबतीतील कमाल क्षेत्र हे, असा जिल्हा किंवा तालुका यासमोर जमिनीच्या अशा प्रत्येक वर्गाखाली नमूद केलेले क्षेत्र असेल.

(२) एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटक केवळ एकाच वर्गाची जमीन, धारण करीत असेल तर तिच्या किंवा त्याच्या बाबतीतील कमाल क्षेत्र हे, त्या वर्गाच्या जमिनीचे कमाल क्षेत्र असेल.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ (१) (अ) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

(३) एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटक वेगवेगळ्या वर्गाची जमीन धारण करीत असेल तर धारण जमीन ही, कमाल क्षेत्राएवढी किंवा त्यापेक्षा अधिक आहे किंवा कसे याची परिगणना करण्यासाठी, धारण जमिनीच्या एकूण क्षेत्राची परिगणना पुढीलप्रमाणे करण्यात येईल :--

कलम २, खंड (५) च्या उपखंड (क), (ख) किंवा (ग) खाली येणारे अशा प्रत्येक वर्गाच्या जमिनीचे क्षेत्र हे त्या कलमाच्या खंड (५) च्या उप-खंड (घ), किंवा यथास्थिति, उप-खंड (ङ) खाली येणाऱ्या कोरडवाहू जमिनीत रूपांतरित करावयाच्या जमिनीच्या वर्गाच्या कमाल क्षेत्राचे उपरोक्त कोरडवाहू जमिनीच्या कमाल क्षेत्राशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाच्या आधारे, रूपांतरित करण्यात येईल. एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटक खंड (५) च्या उप-खंड (घ) आणि (ङ) या खाली येणारी कोरडवाहू जमीन धारण करीत असेल, त्याबाबतीत, उपखंड (ङ) खाली येणाऱ्या जमिनीत रूपांतर करण्यात येईल.

एखाद्या व्यक्तीच्या किंवा कुटुंब घटकाच्या धारण जमिनीतील कोरडवाहू जमिनीचे क्षेत्र कोणतेही असल्यास, धरून, परिगणित केलेले कोरडवाहू जमिनीचे क्षेत्र हे उपरोक्त उप-खंड (घ) किंवा, यथास्थिति, उप-खंड (ङ) खाली येणाऱ्या कोरडवाहू जमिनीच्या कमाल क्षेत्राएवढे असेल तर, धारण जमीन कमाल क्षेत्राइतकी असल्याचे मानण्यात येईल. ते कमाल क्षेत्रापेक्षा अधिक असेल तर, धारण जमीन कमाल क्षेत्रापेक्षा अधिक असल्याचे मानण्यात येईल.

विवक्षित परिस्थितीत कमाल क्षेत्रापेक्षा जादा धारण केलेली ज़मीन कमाल क्षेत्राच्या मर्यादेत असल्याचे मानणे.

[१][६. जेव्हा एखाद्या कुटुंब घटकातील व्यक्तींची एकूण संख्या पाचपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत त्या कुटुंब घटकास पाचपेक्षा जास्त असतील अशा प्रत्येक व्यक्तीमागे कमाल क्षेत्राचा एक पंचमांश इतक्या मर्यादेपर्यंत, कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करण्याचा हक्क असेल, तथापि, एकूण धारण जमीन कमाल क्षेत्राच्या दुपटीपेक्षा जास्त होणार नाही, आणि अशा प्रकरणात, अशा कुटुंब घटकांच्या धारण जमिनीच्या संबंधात, असे क्षेत्र कमाल क्षेत्र असल्याचे मानण्यात येईल.]

वगळलेली जमीन व इतर जमीन या दोन्ही जमिनी धारण करणाऱ्या व्यक्ती.

७. एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटक, वगळलेली जमीन व इतर (म्हणजे, जी वगळलेली नाही अशी) जमीन अशा दोन्ही जमिनी धारण करीत असेल त्या बाबतीत,--

(क) वगळलेल्या जमिनीचे क्षेत्र हे कमाल क्षेत्रापेक्षा कमी असेल तर, त्या व्यक्तीस किंवा त्या कुटुंब घटकास वगळण्यात आलेल्या जमिनीच्या क्षेत्रात इतर जमिनीचे जितके क्षेत्र मिळून ते कमाल क्षेत्राएवढे होईल कारण केवळ तेवढीच इतर जमीन धारण करण्याचा हक्क असेल, आणि अशा बाबतीत, त्या व्यक्तीच्या किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकाच्या धारण जमिनीच्या बाबतीत, असे क्षेत्र हे कमाल क्षेत्र असल्याचे मानण्यात येईल.

(ख) इतर कोणत्याही बाबतीत, त्या व्यक्तीस किंवा त्या कुटुंब घटकास, जी वगळण्यात आलेली नाही अशी कोणतीही जमीन धारण करण्याचा हक्क असणार नाही.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ (१) (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

# प्रकरण तीन

## हस्तांतरण व संपादन यावर निर्बंध-उल्लंघनाचे परिणाम

हस्तांतरणावर निर्बंध.

८. एखादी व्यक्ती, किंवा यथास्थिति, कुटुंब घटक प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर, कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करीत असेल त्याबाबतीत, ती व्यक्ती, किंवा यथास्थिति, त्या कुटुंब घटकातील कोणतीही व्यक्ती, त्या दिनांकास किंवा त्या दिनांकानंतर, या अधिनियमाखाली कमाल क्षेत्रापेक्षा अधिक असलेली जमीन ठरवून देण्यात येईपर्यंत, कोणतीही जमीन हस्तांतरित करणार नाही.

**स्पष्टीकरण.**--या कलमामधील, "हस्तांतरण" याचा अर्थ जमीन मालकाने विक्री करून, देणगी देऊन, कब्जे गहाण देऊन, अदलाबदल करून, पट्ट्याने देऊन, परिरक्षणासाठी जमिनीचे अभिहस्तांकन करून, कुळवहिवाट स्वाधीन करून किंवा जमीन परत घेऊन किंवा इतर कोणतीही व्यवस्था करून, केलेले हस्तांतरण, मग असे हस्तांतरण ह्यात व्यक्तीमध्ये पक्षकारांच्या कृतीद्वारे केलेले असो किंवा, न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण यांच्या डिक्रीद्वारे किंवा आदेशाद्वारे (दिनांक २६ सप्टेंबर, १९७० पूर्वी अशा न्यायालयात, न्यायाधिकरणापुढे किंवा अशा प्राधिकरणांपुढे दाखल केलेल्या कार्यवाहीत जी डिक्री किंवा जो आदेश संमत केलेला असेल त्या व्यतिरिक्त) केलेले असो- परंतु त्यात जमीन महसुलाच्या वसुलीसाठी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोग्या रकमांसाठी जमिनीची विक्री करून किंवा अन्य रीतीने केलेल्या हस्तांतरणाचा किंवा यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी केलेल्या भूमिसंपादनाचा समावेश होणार नाही.

कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन संपादन करण्यावर निर्बंध.

९. कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील व्यक्ती, जर उक्त व्यक्ती, किंवा यथास्थिति कुटुंब घटक कमाल क्षेत्रापेक्षा जादा जमीन आधीपासून धारण करीत असेल तर किंवा अशा व्यक्तीने किंवा यथास्थिति, कुटुंब घटकाने पूर्वी धारण केलेल्या इतर कोणत्याही जमिनीसह, एकूण कमाल क्षेत्रापेक्षा जी अधिक होणार असेल अशी कोणतीही जमीन धारण करीत असेल, प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर, कोणत्याही वेळी हस्तांतरणाद्वारे कोणतीही जमीन संपादन करणार नाही.

**स्पष्टीकरण.**--या कलमामधील "हस्तांतरण" या संज्ञेला कलम ८ मध्ये असलेलाच अर्थ असेल.

जमिनीच्या विवक्षित हस्तांतरणाचे व संपादनाचे परिणाम.

**१०.** (१) जर--

(क) कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील व्यक्ती, दिनांक २६ सप्टेंबर १९७० नंतर, परंतु प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, सुधारणा अधिनियम, १९७२ करण्यात येणार आहे या अपेक्षेने किंवा त्याचा उद्देश टाळण्यासाठी किंवा तो विफल करण्यासाठी, कोणतीही जमीन हस्तांतरित करील, किंवा

(ख) कोणतीही जमीन कलम ८ चे उल्लंघन करून हस्तांतरित करण्यात आली असेल तर,
त्या व्यक्तीस, किंवा यथास्थिति, कुटुंब घटकाला ज्या कमाल क्षेत्राइतकी जमीन धारण करण्याचा हक्क असेल त्या कमाल क्षेत्राची गणना करताना, अशा रीतीने हस्तांतरित केलेली जमीन विचारात घेण्यात येईल आणि अशा रीतीने गणना केलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा जादा असणारी जमीन ही, त्या व्यक्तीजवळ किंवा कुटुंब घटकाजवळ शिल्लक राहणारी जमीन ही कमाल क्षेत्रापेक्षा वस्तुतः अधिक नसली तरीही, तिने धारण केलेल्या जमिनीसाठी असलेल्या कमाल क्षेत्रापेक्षा अधिक असल्याचे मानण्यात येईल.

अशा हस्तांतरणामुळे एखाद्या व्यक्तीने, किंवा यथास्थिति कुटुंब घटकाने धारण केलेली जमीन ही, अशा रीतीने कमाल क्षेत्रापेक्षा अधिक म्हणून गणना केलेल्या क्षेत्रापेक्षा कमी होत असेल तर, त्या व्यक्तीची

किंवा, यथास्थिति कुटुंब घटकाची सर्व जमीन, अतिरिक्त जमीन म्हणून मानण्यात येईल, आणि अशा रीतीने हस्तांतरित केलेल्या आणि हस्तांतरितीच्या कब्जात असलेल्या जमिनीपैकी [अशी जमीन पोट-कलम (३) च्या तरतुदींअन्वये जप्त करण्यास पात्र नसेल तर] अशा रीतीने कमी पडलेली जमीन ही सुद्धा, हस्तांतरितीने धारण केलेली जमीन वस्तुतः कमाल क्षेत्रापेक्षा अधिक नसली तरीही, त्या बाबतीत केलेल्या नियमास अधीन राहून, अतिरिक्त जमीन असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**--खंड (क) च्या प्रयोजनार्थ, "हस्तांतरण" या संज्ञेस कलम ८ मध्ये असलेलाच अर्थ असेल.

दिनांक २६ सप्टेंबर १९७० नंतर परंतु प्रारंभाच्या दिनांकापूर्वी केलेली सर्व हस्तांतरणे ही (तद्विरुद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर) सुधारणा अधिनियम, १९७२ करण्यात येणार आहे या अपेक्षेने किंवा उक्त अधिनियमाचा उद्देश टाळण्यासाठी किंवा तो विफल करण्यासाठी केलेली आहेत असे मानण्यात येईल.

[1][**स्पष्टीकरण.**--या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता, हस्तांतरणाचा पुरावा म्हणून असलेला दस्तऐवज हा, त्या दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी नोंदवण्यात आला नसल्यास किंवा तो त्या दिनांकास नंतर नोंदवण्यात आला असून उक्त दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी नोंदणीसाठी सादर केलेला नसल्यास, ते हस्तांतरण २६ सप्टेंबर १९७० ला किंवा त्यापूर्वी करण्यात आल्याचे समजण्यात येणार नाही.]

(२) प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर, एखाद्या व्यक्तीने किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकाने कमाल क्षेत्रापेक्षा अधिक अशी कोणतीही जमीन कब्जात ठेवली असेल किंवा त्या दिनांकास किंवा त्यानंतर (मृत्यूपत्र व्यवस्थेद्वारे किंवा मृत्युनंतर मिळाल्यामुळे किंवा विधीच्या प्रवर्तनामुळे) कोणतीही जमीन संपादन केल्याचा परिणाम म्हणून कोणत्याही व्यक्तीने किंवा यथास्थिति, कुटुंब घटकाने धारण केलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्र, कमाल क्षेत्राहून अधिक होईल तर, अशा रीतीने अधिक असलेली जमीन ही अतिरिक्त जमीन असेल.

(३) कलम ९ चे जाणूनबुजून उल्लंघन करून कोणतीही जमीन संपादन करण्यात आली असेल त्याबाबतीत, त्याबद्दल शास्ती म्हणून अशा रीतीने संपादन केलेल्या किंवा प्राप्त केलेल्या जमिनीतील अशा व्यक्तीचा किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकाचा किंवा कुटुंब घटकातील कोणत्याही व्यक्तीचा अधिकार, हक्क आणि हितसंबंध हा, प्रकरण ४ च्या तरतुदीस अधीन राहून, सरकारजमा होईल आणि आणखी हस्तांतरणपत्राशिवाय ती, राज्य शासनाकडे निहित होईल :

[2][परंतु, अशा जमिनीवर कोणताही भार असल्यास, जिल्हाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करून व जमीनधारकाचे व जिच्या नावे त्याने अशा जमिनीचा भार केला असेल अशा व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, धारकाने कलम ९ चे हेतुपुरस्पर उल्लंघन करून संपादन केलेल्या जमिनीच्या मर्यादेइतक्या इतर जमिनीतील धारकाचा अधिकार, हक्क व हितसंबंध सरकारजमा होतील, अशा निदेश देता येईल.]

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ३ (२) (अ) द्वारे हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (ब) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

विभागणी करण्यावर निर्बंध.

**११.** एखाद्या कुटुंबाने धारण केलेली कोणतीही जमीन दिनांक २६ सप्टेंबर १९७० नंतर विभागण्यात आली असेल त्या बाबतीत, अशा रीतीने करण्यात आलेली विभागणी ती (तद्विरुद्ध सिद्ध करण्यात आली नाही तर), सुधारणा अधिनियम, १९७२ करण्यात येणार आहे या अपेक्षेने किंवा उक्त अधिनियमाचा उद्देश टाळण्यासाठी किंवा तो विफल करण्यासाठी केलेली आहे असे मानण्यात येईल आणि तदनुसार ते विचारात घेतले जाणार नाही, आणि अशा विभागणीत अंतर्भूत असलेली कोणतीही जमीन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्या कुटुंबाने धारण केलेली जमीन असल्याचे मानण्यात येईल; आणि कुटुंबाने धारण केलेल्या जमिनीतील प्रत्येक व्यक्तीच्या हिश्श्याची मर्यादा कलम ३ च्या तरतुदीनुसार कमाल क्षेत्राची गणना करताना विचारात घेण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनार्थ, "विभागणी" म्हणजे पक्षकारांच्या कृतीने, हयात व्यक्तींमध्ये करण्यात आलेले जमिनीचे कोणतेही विभाजन आणि त्यामध्ये, न्यायालयाच्या न्यायाधिकरणाच्या किंवा प्राधिकरणाच्या डिक्रीद्वारे किंवा आदेशाद्वारे करण्यात आलेल्या विभागणीचा सुद्धा समावेश होतो.

दुसऱ्या वर्गात रूपांतरित केलेल्या जमिनीच्या बाबतीत कमाल क्षेत्र.

**११-क.** एखाद्या व्यक्तीने किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकाने धारण केलेल्या कोणत्याही जमिनीचे प्रारंभाच्या दिनांकानंतर, कलम २ खंड (५) च्या उप-खंड (क), (ख) किंवा (ग) मध्ये वर्णन केलेल्या जमिनीच्या कोणत्याही वर्गामध्ये रूपांतर झाले असेल आणि त्यामुळे त्या व्यक्तीने किंवा यथास्थिति कुटुंब घटकाने धारण केलेली जमीन कमाल क्षेत्रापेक्षा अधिक होत असेल तर, अशा रीतीने अधिक असलेली जमीन, रूपांतराच्या दिनांकापासून (असा दिनांक हा, कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात, राज्य शासनाकडून राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल अशा दिनांकास असेल) अतिरिक्त जमीन असल्याचे मानण्यात येईल आणि तदनुसार या प्रकरणाच्या पूर्वगामी तरतुदी धारण जमिनीला लागू होतील.]

## प्रकरण चार

## अतिरिक्त जमीन

विवरणे सादर करणे.

[1][**१२.** [2][जर--

(क) कोणत्याही व्यक्तीने किंवा] कुटुंब घटकाने [3][दिनांक २६ सप्टेंबर १९७० नंतर परंतु प्रारंभाच्या दिनांकापूर्वी] कोणत्याही वेळी कमाल क्षेत्रापेक्षा अधिक अशी कोणतीही जमीन धारण केली असेल; किंवा

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, याच्या कलम २ अन्वये मूळ कलम १२ ऐवजी नवीन कलम १२ दाखल करण्यात आले.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ६ (२) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ख) कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब घटक, [१][प्रारंभाच्या दिनांकास] किंवा त्यानंतर कमाल क्षेत्रापेक्षा अधिक अशी कोणतीही जमीन (कोणतीही वगळलेली जमीन धरून) संपादन करील, धारण करील किंवा जी तिच्या/त्याच्या कब्जात येईल; किंवा

(२) [२][ * * *]

(ख) [३][कलम ११-क] मध्ये वर्णन केलेल्या परिस्थितीत तिच्या/त्याच्या जमिनीचे रूपांतर दुसऱ्या वर्गाच्या जमिनीत झाले [४][असेल आणि जर त्यामुळे तिने/त्याने धारण केलेली जमीन कमाल क्षेत्रापेक्षा अधिक होत असेल] तर--

(एक) खंड (१) उपखंड (क) खालील प्रकरणाच्या बाबतीत [५][प्रारंभाच्या दिनांकापासून] [६][एक महिन्याच्या] आत, आणि

(दोन) खंड (१), उपखंड (ख) बाबतीत, कमाल क्षेत्राहून अधिक असेल अशी जमीन ज्या दिनांकास तिच्या/त्याच्या कब्जात आली त्या दिनांकापासून [७][एक महिन्याच्या] आत, आणि

[८][ * * *]

(चार) खंड (२), उपखंड (ख) खालील प्रकरणाच्या बाबतीत, असे रूपांतर केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत [९][असा दिनांक हा कलम ११-क अन्वये अधिसूचित केलेला दिनांक असेल]

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम ६ (२) (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६ (३) (ब) अन्वये उप-खंड (क) वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ (३) (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ४ (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ (४) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ४ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ (५) द्वारे खंड (तीन) वगळण्यात आला.

९. वरील अधिनियमाच्या कलम ६ (६) अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[१][अशी व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील कोणतीही व्यक्ती] ज्या जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारितेत अशी जमीन असेल त्या प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याकडे [२][तिने किंवा कुटुंब घटकाने धारण केलेल्या सर्व जमिनीचा] तपशील नमूद करून विहित केलेल्या नमुन्यात एक विवरण सादर करील. [३][एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील व्यक्ती ही, कुटुंबाने धारण केलेल्या जमिनीत हिस्सा धारण करीत असेल त्या बाबतीत] अशा विवरणांत, कुटुंबातील व्यक्तींची एकूण संख्या, विभागणी केल्यावर हिस्सा मिळण्याचा ज्यांना हक्क आहे, अशा व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्तीच्या हिश्श्याला येणारे जमिनीचे क्षेत्र, अशा कुटुंबातून काल्पनिकरीत्या निघणाऱ्या प्रत्येक कुटुंब घटकातील व्यक्तींची नावे व प्रत्येक कुटुंब घटकातील इतर व्यक्तींची नावे आणि कुटुंबातील इतर व्यक्तींची नावे या संबंधीच्या माहितीचा सुद्धा समावेश असेल. तसेच ती/तो सहकारी संस्थेने धारण केलेल्या किंवा उपयोगात आणलेल्या जमिनीतील किंवा संयुक्तरीत्या धारण केलेल्या जमिनीतील किंवा भागीदारी संस्थेतील आपल्या हिश्श्याची, कोणतीही असल्यास, व्याप्ती आणि भारताच्या इतर कोणत्याही भागात त्याने धारण केलेली जमीन नमूद करील :

परंतु, अज्ञान किंवा वेडसर व्यक्तीच्या बाबतीत असे विवरण तिच्या पालकास सादर करता येईल आणि असमर्थ असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत असे विवरण अशा व्यक्तीच्या अधिकृत अभिकर्त्यास सादर करता येईल : ]

[४][परंतु आणखी असे की, जिने विवरण देणे आवश्यक असेल अशी कोणतीही व्यक्ती किंवा एखाद्या कुटुंब घटकातील व्यक्ती मरण पावल्यास असे विवरण तिच्या वारसाकडून किंवा यथास्थिति, कुटुंब घटकातील इतर कोणत्याही व्यक्तीकडून सादर करण्यात येईल. ]

विवरण दाखल करण्याची मुदत वाढवण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[५]["१२-क. कलम १२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे त्या कलमाच्या कोणत्याही तरतुदीद्वारे तरतूद केलेले विवरण प्रस्तुत करण्याची कालमर्यादा, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पुढील कालावधीसाठी वाढवता येईल आणि महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, १९७५ याच्या प्रारंभापूर्वी या अधिनियमाच्या तरतुदींखालील कोणत्याही आदेशाद्वारे, विवरण दाखल करण्याच्या मुदतीत दिलेली कोणतीही वाढ ही असा आदेश काढण्यात आला तेव्हा जणू हे कलम अंमलात असल्याप्रमाणे रीतसर दिलेली असल्याचे मानण्यात येईल.] १९७६ महा.

विवरण सादर करण्यात कसूर करणे.

**१३.** (१) कलम १२ अन्वये विवरण पुरवणे [६][जिला आवश्यक आहे अशी व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील व्यक्ती,]--

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ (७) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ (८) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६ (९) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६ (१०) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ५ द्वारे कलम १२-क समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(क) वाजवी कारणाशिवाय, त्या कलमात निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत विवरण सादर करण्यात कसूर करील; किंवा

(ख) जे खोटे असल्याचे त्यास माहीत असेल, किंवा जे खोटे आहे असे त्यास सकारण वाटत असेल असे विवरण पुरवील तर,

ती पहिल्या बाबतीत शंभर रुपयांपर्यंत व दुसऱ्या बाबतीत पाचशे रुपयांपर्यंत दंड देण्यास पात्र ठरेल.

(२) कलम १२ अन्वये जिने विवरण पुरवणे आवश्यक आहे अशा व्यक्तीने [१][किंवा कुटुंब घटकातील व्यक्तीने] वाजवी कारणाशिवाय तसे करण्यात कसूर केली आहे किंवा जे खोटे असल्याचे माहीत असून किंवा जे खोटे आहे असे सकारण वाटत असताना असे विवरण अशा व्यक्तीने सादर केले आहे असे जिल्हाधिकाऱ्यांस सकारण वाटेल त्याबाबतीत, जिल्हाधिकारी, नोटीस काढून अशी नोटीस बजाविण्यात आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, पोट-कलम (१) अन्वये तरतूद करण्यात आलेला दंड त्याजवर का बसविण्यात येऊ नये याचे कारण दर्शविल्याबद्दल [२][अशा व्यक्तीस किंवा कुटुंब घटकातील व्यक्तीस] फर्मावील. उत्तर किंवा दर्शविण्यात आलेले इतर कारण विचारात घेतल्यावर जर जिल्हाधिकाऱ्याची अशी खात्री होईल की, [३][त्या व्यक्तीने किंवा कुटुंब घटकातील व्यक्तीने] वाजवी कारणाशिवाय मुदतीच्या आत, विवरण सादर करण्यात कसूर केली आहे किंवा जे खोटे असल्याचे माहीत असून किंवा जे खोटे आहे असे सकारण वाटत असताना असे विवरण अशा व्यक्तीने सादर केले आहे तर, निकटपूर्वीच्या पोट-कलमात तरतूद केलेला दंड बसविण्याच्या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीच्या आत सर्व तपशिलासहित परिपूर्ण असलेले खरे व बिनचूक विवरण सादर करण्याविषयी अशा व्यक्तीस फर्माविता येईल.

(३) जिल्हाधिकाऱ्याने अशा रीतीने दिलेल्या मुदतीच्या आत, आदेशाचे पालन करण्यात [४][अशी व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील व्यक्ती] कसूर करील तर, विवरण किंवा सर्व तपशिलासहित परिपूर्ण असे खरे व बिनचूक विवरण सादर करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा म्हणून, कमाल क्षेत्रापेक्षा अधिक असलेल्या जमिनीत तिने [५][किंवा यथास्थिति, कुटुंब घटकाने धारण केलेला] अधिकार, हक्क व हितसंबंध हा या प्रकरणाच्या तरतुदीस अधीन राहून सरकारजमा होईल व त्याचे कोणतेही आणखी हस्तांतरण न होता राज्य शासनाकडे निहित होईल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या कलम ७ (२) (अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) (ब) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) (क) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

चौकशी करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

१४. (१) कलम १२ मध्ये उल्लेख करण्यात आलेला कालावधी किंवा कलम १३, पोट-कलम (२) मध्ये उल्लेखिलेला वाढीव कालावधी संपल्यानंतर शक्य तितक्या लवकर जिल्हाधिकारी [१][विवरण दाखल करण्यात आले असो वा नसो--स्वाधिकारे किंवा] त्या कलमांपैकी कोणत्याही कलमाखाली त्याजकडे पाठवण्यात आलेल्या विवरणाच्या आधारावर किंवा आवश्यक असतील अशा ज्या कागदपत्रांची तो पाहणी करील त्यांच्या आधारावर, कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या [२][किंवा कुटुंब घटकाच्या] संबंधात चौकशी करील आणि या प्रकरणाच्या तरतुदीस अधीन राहून अशा व्यक्तीने [२][किंवा कुटुंब घटकाने] धारण केलेली अतिरिक्त जमीन निश्चित करील.

[३][ (२) जर एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटक, एकाच जिल्ह्यातील दोन किंवा अधिक तालुक्यांमध्ये जमीन धारण करीत असेल तर त्या बाबतीत, त्या जिल्ह्याचा प्रभारी जिल्हाधिकारी लेखी आदेशाद्वारे ज्यास पदनिर्देशित करील अशा जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करणाऱ्या अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून अशी चौकशी करण्यात येईल.]

(३) जर, एखादी व्यक्ती [४][किंवा कुटुंब घटक] एकाच विभागाच्या दोन किंवा अधिक जिल्ह्यांमध्ये जमीन धारण करीत असेल तर त्या बाबतीत, आयुक्त, लेखी आदेशाद्वारे ज्यास पदनिर्देशित करील तो जिल्हाधिकारी चौकशी करील.

(४) जर एखादी व्यक्ती [४][किंवा कुटुंब घटक] निरनिराळ्या विभागात जमीन धारण करीत असेल तर, त्या बाबतीत राज्य शासन, लेखी आदेशाद्वारे ज्यास पदनिर्देशित करील तो जिल्हाधिकारी चौकशी करील.

[५][(४-क) एखादी जमीन धारण करणारी व्यक्ती औद्योगिक उपक्रम असेल तर त्या बाबतीत, राज्य शासन लेखी आदेशाद्वारे ज्यास पदनिर्देशित करील त्या जिल्हाधिकाऱ्यास चौकशी करता येईल.]

(५) अशा रीतीने पदनिर्देशित करण्यात आलेला जिल्हाधिकारी हा, अशा व्यक्तीच्या [६][किंवा कुटुंब घटकाच्या] आणि तिने [७][किंवा कुटुंब घटकाने] धारण केलेल्या जमिनीच्या संबंधात चौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी ह्या अधिनियमाखाली अधिकारितेचा वापर करण्यास सक्षम राहील.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या कलम ८ (१) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ८ (१) (ब) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ७ अन्वये मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ८ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] पोट-कलम (४-क) हे, १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ यातील कलम ३ अन्वये दाखल करण्यात आले.

[६] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ८ (३) (अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ८ (३) (ब) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

१५. (१) अतिरिक्त जमिनींचे प्रत्यक्ष क्षेत्र ठरविताना, भूमापन क्रमांक किंवा त्याचा पोटविभाग याची विभागणी करणे आवश्यक असेल तेव्हा,-- अतिरिक्त जमिनींचे क्षेत्र ठरवताना भूमापन क्रमांक किंवा त्यांच्या पोट-विभागांचे विभाजन.

(क) अतिरिक्त जमिनीत समाविष्ट करावयाच्या अशा भूमापन क्रमांकाचा किंवा त्याच्या पोट-विभागाचा भाग जमिनीचा तुकडा असेल तर, असा संपूर्ण भूमापन क्रमांक किंवा पोट-विभाग अतिरिक्त जमिनीतून वगळण्यात येईल,

(ख) अतिरिक्त जमिनीतून वगळण्यात यावयाच्या अशा भूमापन क्रमांकाच्या किंवा त्याच्या पोट-विभागाचा भाग जमिनीचा तुकडा असेल तर, असा संपूर्ण भूमापन क्रमांक किंवा पोट-विभाग अतिरिक्त जमिनीत समाविष्ट करण्यात येईल,

(ग) अशा भूमापन क्रमांकाची किंवा पोट-विभागाची दोन भागात विभागणी केल्यानंतर, प्रत्येक भाग तुकडा होईल तर, असा संपूर्ण भूमापन क्रमांक किंवा पोट-विभाग अतिरिक्त जमिनीत समाविष्ट करण्यात येईल, आणि

(घ) इतर कोणत्याही बाबतीत, भूमापन क्रमांक किंवा पोट-विभाग याची विभागणी करता येईल.

(२) जर असा कोणताही भूमापन क्रमांक किंवा भूमापन क्रमांकाचा पोट-विभाग, पोट-कलम (१), खंड (क) अन्वये वगळण्यात आला असेल तर त्या बाबतीत, उक्त भूमापन क्रमांक किंवा त्याचा पोट-विभाग [१][धारण करणाऱ्या व्यक्तीस, किंवा कुटुंब घटकास] [२][त्याने/तिने] धारण केलेली जमीन कमाल क्षेत्रापेक्षा अधिक असली तरीही तो धारण करण्याचा हक्क राहील, आणि त्यानुसार अशा रीतीने ताब्यात ठेवलेली जमीन कमाल क्षेत्र म्हणून समजण्यात येईल.

१६. [३][(१) एखादी व्यक्ती किंवा कुटुंब घटक कमाल क्षेत्रापेक्षा अधिक जमीन धारण करीत असेल आणि अशी संपूर्ण जमीन किंवा तिचा भाग हा,-- कमाल क्षेत्रा-इतकी जमीन ताब्यात ठेवण्यासाठी जमिनीची निवड करणे.

(क) भाराच्या अधीन असेल, किंवा

(ख) कलम १८, खंड (खख) मधील वर्णनाचा असेल,

त्या बाबतीत कलम १०, पोट-कलम (१) व कलम १५ यांच्या तरतुदीस अधीन राहून, अशी व्यक्ती किंवा कुटुंब घटक, कमाल क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत अशी जमीन (मग मालक म्हणून किंवा कूळ म्हणून ती जमीन धारण केलेली असो) ताब्यात ठेवील.]

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ९ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १० (१) अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीन राहून एखाद्या व्यक्तीस [1][किंवा कुटुंब घटकास] ज्या जमिनी स्वत:च्या [1][किंवा स्वत:ला] ताब्यात ठेवण्याची इच्छा असेल त्या जमिनीपैकी कमाल क्षेत्राइतक्या जमिनीची निवड करण्याचा तिला [2][किंवा कुटुंब घटकाला] हक्क राहील.

[3][(३) कुटुंब घटकाच्या बाबतीत पती-पत्नींपैकी प्रत्येकाने स्वतंत्रपणे जमीन धारण केली असेल त्या बाबतीत, पती-पत्नींपैकी प्रत्येकास, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, पतीची किंवा पत्नीची जी जमीन स्वत:च्या ताब्यात ठेवण्याची इच्छा असेल त्या जमिनीची निवड करण्याचा हक्क असेल. तथापि, ताब्यात ठेवावयाच्या जमिनीचे प्रमाण हे, उक्त घोषणेपूर्वी पती-पत्नींपैकी प्रत्येकाने धारण केलेल्या जमिनीच्या प्रमाणाइतकेच असेल.]

कलम १४ अन्वयेच्या चौकशीमुळे परिणाम झालेल्या व्यक्तींना नोटीस देणे.

**१७.** (१) कलम १४ अन्वये चौकशी करण्यासाठी जिल्हाधिकारी, ज्या एका किंवा अनेक गावात धारण जमिनीत समाविष्ट असलेली जमीन असेल त्या गावातील सोईस्कर ठिकाणी, विहित केलेल्या नमुन्यातील जाहीर नोटीस देण्याची व्यवस्था करील; आणि जिल्हाधिकारी अशा नोटिशीत त्या व्यक्तीने [4][किंवा कुटुंब घटकाने] धारण केलेली (कोणतीही असल्यास) अतिरिक्त जमीन ठरविण्यासाठी ज्या जमिनीच्या बाबतीत चौकशी करावयाची असेल ती जमीन निर्दिष्ट करील, आणि अशा जमिनीत ज्यांचा हितसंबंध असेल अशा सर्व व्यक्तींना, त्यांच्या हरकती, नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून [5][पंधरा दिवसांच्या] मुदतीच्या आत त्याजकडे सादर करण्यास फर्मावील.

[6][या पोट-कलमात तरतूद केल्याप्रमाणे जाहीर नोटीस देण्यात आली असेल त्या बाबतीत, धारकाला आणि अशा जमिनीत ज्यांचा हितसंबंध असेल अशा सर्व व्यक्तींना, या नोटिशीचा आशय यथोचितरीत्या कळविण्यात आला आहे असे समजण्यात येईल. कार्यवाही चालू असताना, या पोट-कलमान्वये देण्यात येणाऱ्या नोटिशीचा आशयें एखाद्या व्यक्तीला यथोचितरीत्या कळवण्यात आला होता किंवा कसे असा प्रश्न उद्भवल्यास, या पोट-कलमात तरतूद केलेल्या पद्धतीनुसार नोटिशीची प्रसिद्धी ही, पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा नोटिशीचा आशय तिला तशा प्रकारे कळवण्यात आला होता याचा, निर्णायक पुरावा असेल.]

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या कलम १० (२) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (२) (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १० (२) (क) अन्वये पोट-कलम (३) ची भर घालण्यात आली.

४. वरील अधिनियमाच्या कलम ११ (१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ८ (अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) जिल्हाधिकारी, जमीन धारण करणाऱ्या व्यक्तींवर आणि जमिनीत ज्यांचा हितसंबंधच असल्याचे माहीत असेल किंवा हितसंबंध आहे असे वाटत असेल अशा सर्व व्यक्तींवर तशाच अर्थाच्या नोटिसा बजावील, व अशा नोटिशीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास (असा दिनांक नोटीस काढल्यानंतर १५ दिवसांच्या आतील असणार नाही), अशा वेळी व अशा ठिकाणी आपल्या पुढे जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास त्यांना फर्मावील.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या नोटिसांद्वारे, जमीनधारकास,—

(क) नोटिशीत दिलेल्या तपशिलासंबंधी कोणत्याही हरकती किंवा सूचना नमुद करण्याविषयी फर्माविता येईल;

(ख) आवश्यक असेल तेथे,--

[१][(एक) कलम ८ च्या तरतुदींचे उल्लंघन करून हस्तांतरित केलेली किंवा कलम १०, पोट-कलम (१), खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत हस्तांतरित केलेली किंवा कलम ११ च्या तरतुदींचे उल्लंघन करून विभागणी केलेली कोणतीही जमीन, कलम १०, पोट-कलम (१) किंवा कलम ११ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कमाल क्षेत्राची गणना करताना विचारात का घेतली जाऊ नये;

(दोन) कलम ९ चे जाणूनबुजून उल्लंघन करून संपादन केलेली कोणतीही जमीन, कलम १०, पोट-कलम (३) द्वारे, तरतूद केल्याप्रमाणे सरकारजमा का करण्यात येऊ नये ;]

(तीन) कमाल क्षेत्राहून अधिक प्रमाणात धारण केलेली कोणतीही जमीन, कलम १३, पोट-कलम (३) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडे सरकारजमा का करण्यात येऊ नये;

(चार) कलम १०, पोट-कलम (२) किंवा कलम [२][११-क] यामध्ये उल्लेखिलेली किंवा त्याने धारण केलेली कोणतीही जमीन, त्या पोट-कलमात किंवा कलम [११-क] मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, अतिरिक्त जमीन म्हणून का समजण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्यास फर्माविण्यात येईल;

(ग) कलम १६ अन्वये जमीनधारकाने ताब्यांत ठेवावयाची जमीन निर्दिष्ट करण्यास आणि अशा रीतीने ताब्यात ठेवावयाच्या जमिनीचा विहित केलेला तपशील, विहित केलेल्या नमुन्यात जिल्हाधिकाऱ्यास, पुरविण्यास फर्माविण्यात येईल.

[३]**[स्पष्टीकरण.**—या अधिनियमाच्या आणि सुधारणा अधिनियम, १९७२ यांच्या तरतुदीस अधीन राहून, या कलमात आणि या अधिनियमाच्या पुढील तरतुदींमध्ये, संदर्भावरून अन्यथा अपेक्षित नसल्यास, "धारक" या व्याख्येत, कुटुंब घटकाचा समावेश होईल.]

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ११ (२) (अ) अन्वये उपखंड (एक) आणि (दोन) दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ११ (२) (ब) अन्वये "११" या आकड्याऐवजी हा आकडा दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ११ (३) अन्वये या स्पष्टीकरणाची भर घालण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्याने विवक्षित गोष्टींचा विचार करणे.

**१८.** कलम १४ अन्वये सुनावणीसाठी ठरवलेल्या दिवशी किंवा चौकशी ज्या दिवसापर्यंत स्थगित ठेवण्यात आली असेल अशा इतर कोणत्याही एका किंवा अनेक दिवशी जिल्हाधिकारी, जमीनधारकाचे आणि हितसंबंध असलेल्या व हजर असलेल्या इतर व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, आणि सादर करण्यात आलेला पुरावा लक्षात घेऊन पुढील गोष्टींचा विचार करील :—

(क) [१][दिनांक २६ सप्टेंबर १९७० रोजी धारकाने] धारण केलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्र किती आहे ;

[२][ (ख) दिनांक २६ सप्टेंबर १९७० व प्रारंभाचा दिनांक या दरम्यान, हस्तांतरित केलेली कोणतीही जमीन किंवा दिनांक २६ सप्टेंबर १९७० नंतर विभागणी केलेली कोणतीही जमीन, कलम १०, पोट-कलम (१) किंवा कलम ११ द्वारे तरतूद केल्याप्रमाणे कमाल क्षेत्राची मोजणी करताना विचारात घेतली पाहिजे किंवा त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे किंवा कसे;

(खख) एखाद्या कुटुंबाने धारण केलेल्या किंवा कोणत्याही सहकारी संस्थेने धारण केलेल्या किंवा उपयोगात आणलेल्या किंवा त्याने इतरांसह संयुक्तपणे किंवा भागीदारी संस्थेतील भागीदार म्हणून धारण केलेल्या जमिनीत धारकाचा कोणताही हिस्सा आहे किंवा कसे आणि अशा हिश्श्याची व्याप्ती;]

(ग) [३][प्रारंभाच्या दिनांकास त्या धारकाने] धारण केलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्र किती आहे ?

(घ) त्या [४][धारकाने] [५][कलम ८ किंवा ११] चे उल्लंघन करून जमिनीचे कोणतेही हस्तांतरण किंवा विभागणी केली आहे किंवा कसे आणि असे हस्तांतरण केले असेल किंवा अशी विभागणी केली असेल तर, अशा रीतीने हस्तांतरित केलेली किंवा विभागणी केलेली जमीन, कलम १०, पोट-कलम (१) च्या [६][किंवा कलम ११ च्या] तरतुदींन्वये कमाल क्षेत्राची मोजणी करताना [७][विचारात घेतली पाहिजे किंवा त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे किंवा कसे] ?

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या १२ (१) अन्वये "दिनांक ४ ऑगस्ट १९५९ रोजी त्या व्यक्तीने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ (२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ (३) अन्वये "नेमलेल्या दिवशी त्या व्यक्तीने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १२ (४) (अ) अन्वये "व्यक्तीने" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम १२ (४) (ब) अन्वये "कलम ८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम १२ (४) (क) अन्वये "१०" या आकड्याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम १२ (४) (ड) अन्वये "विचारात घेतली पाहिजे किंवा कसे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ङ) [१][प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर] हस्तांतरण करून किंवा विभागणी करून कोणतीही जमीन संपादन करण्यात आली आहे किंवा कब्जात ठेवण्यात आली आहे किंवा कसे ?

(च) [१][प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर] मृत्यूपत्रविषयक व्यवस्थेद्वारे, मृत्यूनंतर मिळाल्याने, किंवा कायद्याच्या अंमलबजावणीमुळे कोणतीही जमीन संपादन करण्यात आली आहे किंवा कसे ?

(छ) चौकशीच्या वेळी धारण केलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्र किती आहे आणि त्या [२][धारकास] धारण करण्याचा हक्क असलेल्या जमिनीचे क्षेत्र किती आहे ?

(ज) त्या [२][धारकाने] कूळ म्हणून कोणतीही जमीन धारण केली आहे काय आणि केली असेल तर, त्या जमिनीस लागू असलेल्या संबंधित कुळकायद्यान्वये त्याच्या जमीनमालकास जातीने जमीन कसण्यासाठी ती परत घेण्याचा अधिकार आहे किंवा कसे ?

(झ) त्या [२][धारकाने] धारण केलेली कोणतीही जमीन, कलम १० च्या पोट-कलम (३) अन्वये किंवा कलम १३ अन्वये सरकारजमा होण्याजोगी आहे किंवा कसे किंवा ती या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये अतिरिक्त जमीन म्हणून समजण्यात यावी किंवा कसे ?

(ञ) त्या [२][धारकाने] जमीन ताब्यात ठेवणे हे कलम १६ च्या तरतुदींनुसार आहे किंवा कसे ?

(ट) [३][धारकाने] धारण केलेल्या एकूण जमिनीपैकी अतिरिक्त जमीन म्हणून, कोणत्या विशिष्ट जमिनी ठरविण्यात याव्यात ?

(ठ) कमाल क्षेत्र मोजण्याच्या आणि कोणतीही जमीन ही अतिरिक्त जमीन ठरविण्याच्या प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याच्या मते जी गोष्ट विचारात घेणे आवश्यक असेल अशी इतर कोणतीही गोष्ट.

**विवक्षित प्रकरणांमध्ये जमीनमालकास जमीन परत देण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा आधिकार.**

[४][**१९.** या प्रकरणाखाली कोणत्याही व्यक्तीने किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकाने धारण केलेल्या जमिनीबाबत चौकशी करताना जर असे दिसून येईल की,--

(क) पूर्ववर्ती तरतुदीअन्वये अतिरिक्त जमीन म्हणून सीमांकित केलेली संपूर्ण जमीन किंवा तिचा कोणताही भाग त्या व्यक्तीने किंवा अशा कुटुंब घटकाने जमीन मालकांकडून धारण केला आहे किंवा धारण केला असल्याचे मानण्यात आले आहे; आणि

(ख) अशा जमिनीस लागू असलेल्या संबंधित कुळवहिवाट विधिन्वये उक्त जमीन (किंवा तिचा भाग) जातीने कसण्यासाठी परत मिळण्याचा जमीन मालकास अधिकार आहे तर,

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ च्या कलम १२ (५) अन्वये "नेमलेल्या दिवशी किंवा त्या दिवसानंतर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ (६) अन्वये, "व्यक्तीस" व "व्यक्तीने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ (७) अन्वये, "त्याने" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कलम १९ दाखल करण्यात आले.

जिल्हाधिकारी (उक्त अधिकार हा कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा इतर प्राधिकरण यांजपुढे दिनांक २६ सप्टेंबर १९७० पूर्वी दाखल केलेल्या आणि अशा चौकशीच्या वेळी प्रलंबित असलेल्या कामकाजाच्या अधीन नसेल तर) त्या कुळवहिवाट विधिमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, (परंतु अतिरिक्त जमीन म्हणून सीमांकित करण्यात आली नसेल अशी जमीन परत मिळण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न आणता), जी अतिरिक्त जमीन परत मिळण्याचा जमीन मालकास हक्क असेल तेवढ्याच जमिनीच्या आणि जी, त्याने किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकाने धारण केलेल्या इतर कोणत्याही जमिनीसह, या अधिनियमाखालील कमाल क्षेत्रापेक्षा अधिक होणार नाही इतक्या जमिनीचा कब्जा जमीन मालकास परत देईल; आणि उर्वरित जमीन, कोणतीही असल्यास, अतिरिक्त जमीन म्हणून नंतर घोषित करण्यात येईल.]

कलम १९ अन्वये जमिनीवरील जमीन-मालकाच्या हक्काचा विचार करण्याची रीत.

**२०.** (१) कलम १९, अन्वये जमीन मालकाच्या कब्जात ज्या मर्यादेपर्यंत जमीन परत द्यावयाची असेल त्या जमिनीची मर्यादा ठरविण्याच्या प्रयोजनासाठी, जिल्हाधिकारी जमीन मालकावर नोटीस बजावील आणि अशा नोटिशीद्वारे त्यास,—

(क) त्या कलमाच्या प्रयोजनासाठी अशा अतिरिक्त जमिनीच्या उरलेल्या भागाबाबत त्याचा दावा नमूद करण्यास;

(ख) अशा जमिनीचा उरलेला भाग अतिरिक्त जमीन म्हणून का समजण्यात येऊ नये त्याचे कारण दर्शविण्यास;

फर्माविण्यात येईल.

(२) अशा नोटिशीद्वारे जमीन मालकास नोटिशीत उल्लेख केलेल्या दिनांकास, उल्लेख केलेल्या वेळी आणि उल्लेख केलेल्या जागी (असा दिनांक नोटीस काढण्यात आल्यानंतर पंधरा दिवसांपेक्षा आधीचा असता कामा नये) जिल्हाधिकाऱ्यापुढे जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास फर्मावण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये ठरविलेल्या दिनांकास किंवा चौकशी ज्या कोणत्याही इतर दिवसापर्यंत किंवा दिवसांपर्यंत स्थगित करण्यात आली असेल त्या दिवशी, जिल्हाधिकारी, जमीन मालकाची किंवा त्याच्या अभिकर्त्याची आणि अतिरिक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व हजर असलेल्या व्यक्तीची बाजू ऐकून घेतल्यानंतर आणि हजर करण्यात आलेला कोणताही पुरावा विचारात घेतल्यानंतर, पुढील गोष्टीबाबत खात्री करून घेईल--

(क) जमीन मालकास अशी सर्व अतिरिक्त जमीन किंवा तिचा कोणताही भाग याचा कब्जा परत मिळविण्याचा हक्क आहे किंवा कसे आणि तसे असल्यास, अशा जमिनीचे क्षेत्र व इतर तपशील; आणि

(ख) अशी कोणतीही शिल्लक जमीन, अतिरिक्त जमीन म्हणून समजावी किंवा कसे आणि तसे असल्यास, अशा जमिनीचे क्षेत्र व तपशील.

जिल्हाधिकाऱ्याने अतिरिक्त जमीन, वगैरेबाबत अधिकथन करणे आणि त्याचे परिणाम.

**२१.** (१) कलम १८ यात उल्लेख केलेल्या बाबी आणि कलम २० चे पोट-कलम (३) खाली जर काही प्रश्न असतील तर ते प्रश्न विचारात घेतल्यानंतर, जिल्हाधिकारी, शक्य तितक्या लवकर, एक अधिकथन करील आणि अशा अधिकथनात पुढील गोष्टींबाबतचा आपला निर्णय नमूद करील :—

(क) त्या व्यक्तीस [1][किंवा कुटुंब घटकास] जी कमाल जमीन धारण करण्याचा हक्क असेल त्या जमिनीचे एकूण क्षेत्र;

(ख) जमीनधारणेच्या कमाल मर्यादेहून अतिरिक्त असणाऱ्या जमिनीचे क्षेत्र [2][* * *];

(ग) ज्या [3][जमीन मालकास] कलम १९ अन्वये जमिनीचा कब्जा परत द्यावयाचा असेल त्या [3][जमीन मालकाचे] नाव आणि अशा जमिनीचे क्षेत्र व तपशील ;

(घ) जी अतिरिक्त जमीन म्हणून ठरविण्यात आली आहे अशा जमिनीचे क्षेत्र, वर्णन व तिचा पूर्ण तपशील;

(ङ) [4][अतिरिक्त जमिनीपैकी व्यक्तीने [1][किंवा कुटुंब घटकाने] धारण केलेल्या ज्या जमिनीचे अधिकार, हक्क आणि हितसंबंध] राज्य शासनाकडे जमा होणार असतील त्या जमिनीचे क्षेत्र व तपशील.

[5][जिल्हाधिकारी, अशा अधिकथनाच्या वेळी हजर असणारा धारक व इतर हितसंबंधी व्यक्ती यांच्या समक्ष आपले अधिकथन जाहीर करील.]

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १४ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ (१) (अ) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४ (१) (ब) अन्वये "व्यक्ती" आणि "व्यक्तीचे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. हा मजकूर "राज्य शासनाकडे जमा होणार असतील" या मजकुरापूर्वी १९६२ चा अधिनियम क्रमांक १३, कलम ४ (अ) ड अन्वये दाखल करण्यात आला.

५. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १० (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये घोषणा करण्यात आल्यावर जिल्हाधिकारी, अतिरिक्त जमीन म्हणून ठरविण्यात आलेल्या आणि [१][अशा अतिरिक्त जमिनीपैकी ज्या जमिनीबाबतचे अधिकार, हक्क आणि हितसंबंध] राज्य शासनाकडे जमा होतील [२][त्या जमिनीचे क्षेत्र, वर्णन व सर्व वैशिष्ट्ये यांचा तपशील देणारे विहित नमुन्यातील विवरणपत्र तयार करील,] [३][त्या विवरणपत्राची एक प्रत, जिल्हाधिकारी गावातील चावडीवर किंवा गावातील ठळक ठिकाणी लावील आणि विवरणपत्राची एक प्रत, अधिक म्हणून ठरविण्यात आलेल्या जमिनीत हितसंबंध असणाऱ्या व्यक्तीला किंवा कुटुंब घटकातील व्यक्तीला पाठवील. पूर्ववर्ती पोट-कलमात उल्लेखिलेले अधिकथन जाहीर केल्याच्या दिनांकास] जी जमीन सरकारजमा होण्यास पात्र असेल, [४][त्या जमिनीवरील अधिकार, हक्क व हितसंबंध] सरकारजमा होतील व ते राज्य शासनाकडे निहित होतील. [५][अधिकथन जाहीर केल्याच्या दिनांकास व त्यानंतर,] जी जमीन अतिरिक्त म्हणून ठरविण्यात आली असेल त्या जमिनीची कोणतीही विक्री करता येणार नाही, ती देणगी म्हणून देता येणार नाही, गहाण ठेवता येणार नाही, तिची अदलाबदल करता येणार नाही, ती पट्ट्याने देता येणार नाही किंवा (न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकाऱ्याचा हुकूमनामा किंवा आदेश याची अंमलबजावणी करताना करण्यात येणारे कोणतेही हस्तांतरण धरून) तिची इतर कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावता येणार नाही. अशी कोणतीही विल्हेवाट लावण्यात किंवा हस्तांतरण करण्यात आल्यास ते अवैध ठरेल आणि ते परिणामक्षम असणार नाही;

[६][**स्पष्टीकरण.**—जमिनीचा तपशील देणारे विवरणपत्र पूर्वोक्तप्रमाणे लावण्यात आले नाही किंवा ते पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे व्यक्तीला किंवा कुटुंब घटकाला पाठवण्यात आले नाही, एवढ्याच केवळ कारणास्तव कोणतीही जमीन अतिरिक्त ठरवल्याचे अधिकथन विधिग्राह्य असल्याचे समजण्यात येणार नाही.]

(क) अतिरिक्त जमीन म्हणून ठरविण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीला लागू असलेल्या संबंधित कुळकायद्यान्वये अशी जमीन परत घेण्याचा कोणताही हक्क, किंवा

(ख) अशा जमिनीचा कब्जा किंवा कब्जाबाबतचा हक्क,

---

१. "अधिक जमीन म्हणून ठरविण्यात आलेल्या" या शब्दानंतर, हे शब्द १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ (२) (अ) अन्वये दाखल करण्यात आले.

२. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १० (२) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १० (२) (ब) अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. "पात्र असेल" ह्या शब्दानंतर, हे शब्द १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ (२) (ब) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

५. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १० (२) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम १० (२) (ड) अन्वये हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

इतर कोणत्याही कायद्यान्वये कोणत्याही न्यायालयातील, न्यायाधिकरणातील किंवा प्राधिकाऱ्यापुढील कार्यवाहीत विचाराधीन असेल तर अशा कार्यवाहीत, अतिरिक्त जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस,—

(एक) जितकी जमीन स्वत:जवळ ठेवून घेण्याचा हक्क नाही, किंवा

(दोन) जितकी जमीन तिच्या कब्जात नसावी किंवा कब्जात ठेवण्याचा तिला हक्क असणार नाही, याबाबत अंतिम निर्णय देण्यात येईल तितकीच जमीन अशा कार्यवाहीनुसार हस्तांतरित करता येईल.

[1][**स्पष्टीकरण.**—या परंतुकाच्या प्रयोजनाकरिता "कार्यवाही" याचा अर्थ, एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यासंबंधीची किंवा जमीन महसुलाच्या किंवा जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल. अशा रकमांच्या वसुलीसाठी जमिनीच्या विक्रीसंबंधीची आणि कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे, २६ सप्टेंबर, १९७० पूर्वी दाखल केलेली व प्रारंभाच्या दिनांकास प्रलंबित असलेली कार्यवाही असा आहे.]

(३) या कलमान्वये केलेली कोणतीही घोषणा ही कलम ३३ अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे करण्यात येणाऱ्या [2][अपिलातील निर्णयास किंवा कलम ४५, पोट-कलम (२) खालील राज्य शासनाच्या फेरतपासणीस अधीन राहून,] अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा कामकाजात आक्षेप घेता येणार नाही.

(४) [3][पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेले अधिकथन जाहीर केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, जिल्हाधिकारी] विहित केलेल्या रीतीने अतिरिक्त जमीन म्हणून ठरविण्यात आलेल्या जमिनीचा कब्जा घेईल, [4][आणि जमीन मालकास जी जमीन परत मिळण्याचा हक्क असेल त्या जमिनीचा कब्जा अधिकथनात [5][निर्दिष्ट केलेल्या जमीन मालकास] परत देईल] ज्या दिनांकास अतिरिक्त जमिनीचा वर सांगितल्याप्रमाणे कब्जा घेण्यात आला असेल त्या दिनांकापासून ही अतिरिक्त जमीन राज्य शासनाने या अधिनियमाच्या कारणासाठी संपादन केली असल्याचे समजले जाईल आणि ती जमीन त्याप्रमाणे आणखी हस्तांतरित न करता सर्व भारातून मुक्त होऊन राज्य शासनाकडे निहित होईल :

परंतु, पोट-कलम (२) च्या परंतुकात निर्दिष्ट केलेल्या अतिरिक्त जमिनीच्या बाबतीत, कार्यवाही संबंधी अंतिम निर्णय देण्यात आल्यानंतर, जिल्हाधिकाऱ्याने अशा कार्यवाहीत अतिरिक्त जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीस,—

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, याच्या कलम १४ (२) अन्वये या स्पष्टीकरणाची भर घालण्यात आली.

२. "अपिलास आणि अपिलातील महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या निर्णयास" ह्या मजकुराऐवजी हा मजकूर १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम (२) अन्वये दाखल करण्यात आला.

३. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १० (३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १४ (३) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(१) जितकी जमीन स्वत:जवळ ठेवून घेण्याच हक्क आहे, किंवा

(२) जितकी जमीन अशा व्यक्तीच्या कब्जात आहे किंवा कब्जात ठेवण्याचा तिला हक्क आहे याबाबत जो अंतिम निर्णय देण्यात आला असेल तितकीच जमीन कब्जात घेतली पाहिजे आणि जमीन कब्जात अशी घेतल्याच्या दिनांकापासून वर सांगितल्याप्रमाणे शासनाकडे निहित होईल.

[1][**स्पष्टीकरण.**—या परंतुकाच्या प्रयोजनांकरता "कार्यवाही" या संज्ञेस या कलमाच्या पोट-कलम (२) च्या परंतुकातील स्पष्टीकरणात नेमून दिलेल्या अर्थ असेल.]

[2][(५) अतिरिक्त म्हणून सीमित केलेल्या कोणत्याही जमिनीचा कब्जा जमीन धारकाकडून, त्याने कोणत्याही न्यायालयात दिलेल्या हमीनुसार हवाली करण्यात आला असेल आणि ती जमीन अतिरिक्त असल्याबद्दल केलेल्या घोषणापत्राविरुद्ध जमीन धारकाने दाखल केलेले अपील त्यानंतर मागे घेण्यात किंवा फेटाळण्यात आले असेल त्याबाबतीत, पोट-कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, ज्या दिनांकापासून जिल्हाधिकाऱ्याने जमिनीचा कब्जा घेतला असेल त्या दिनांकापासून, ती जमीन या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता राज्य शासनाकडून यथोचित रीत्या संपादित करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार जमिनीचा कब्जा घेतल्याच्या दिनांकापासून, तिचे यापुढे कोणतेही हस्तांतरणपत्र न होता आणि सर्व भारातून मुक्त अवस्थेत अशी जमीन वैधरीत्या आणि परिणामक्षम रीतीने राज्य शासनाकडे निहित झाल्याचे मानण्यात येईल.]

अतिरिक्त जमिनीच्या वापराबद्दल आणि भोगवट्याबद्दल भरपाई.

[3][**२१-क.** (१) प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर, ज्या व्यक्तींच्या किंवा, यथास्थिति, कुटुंब घटकांच्या कब्जात कमाल क्षेत्रापेक्षा जादा अशी कोणतीही जमीन असेल अशी व्यक्ती किंवा, यथास्थिति, कुटुंब घटक हा अशा रीतीने धारण केलेले जादा क्षेत्र हे ज्या वर्षी अतिरिक्त जमीन म्हणून घोषित करण्यात येईल त्या वर्षाच्या अनुवर्ती वर्षापासून कलम २१ अन्वये अधिक जमिनीचा कब्जा घेण्यात येईल तोपर्यंतच्या मुदतीसाठी, अशा जमिनीचा वापर व भोगवटा केल्याबद्दल विहित केलेल्या रीतीस अनुसरून, जिल्हाधिकारी निश्चित करील अशी भरपाई राज्य शासनास देण्यास पात्र ठरेल.

(२) प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर सुधारणा अधिनियम, १९७२ द्वारे सुधारण्यात न आलेल्या या अधिनियमाखाली अधिक जमीन निर्धारित करण्यासंबंधीच्या चौकशीचे काम प्रलंबित असेल त्या बाबतीत, प्रारंभाचा दिनांक किंवा कलम २१ अन्वये जादा क्षेत्र, अधिक जमीन म्हणून जाहीर करण्यात येईल तो दिनांक, या दोहोंपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून कलम २१ खाली अधिक जमिनीचा कब्जा प्रत्यक्षात घेण्यात येईल त्या दिनांकापर्यंतच्या मुदतीसाठी अशा अतिरिक्त जमिनीचा वापर किंवा भोगवटा केल्याबद्दल, विहित केलेल्या रीतीस अनुसरून, जिल्हाधिकारी निश्चित करील अशी भरपाई राज्य शासनास देण्यास धारक पात्र ठरेल.]

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १४ (३) (ब) अन्वये या स्पष्टीकरणाची भर घालण्यात आली.

२. १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ अन्वये पोट-कलम ५ ची भर घालण्यात आली.

३. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १५ अन्वये कलम २१-क समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण पाच

## भरपाई

२२. या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीबद्दल राज्य शासनाकडून यात पुढे तरतूद केलेल्या पद्धतीने व त्या मर्यादेपर्यंत भरपाई देण्यात येईल. भरपाई देणे.

२३. [१][पहिल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या जिल्ह्यांपैकी व तालुक्यांपैकी प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात, त्या अनुसूचीच्या स्तंभ २, ३, ४, ५ व ६ यात वर्णन केलेल्या जमिनीच्या प्रत्येक वर्गासाठी कलम २१ अन्वये राज्य शासनाकडून संपादित करण्यात आलेल्या अधिक जमिनीसाठी भरपाईची रक्कम पुढील गोष्टी मिळून होईल :— भरपाईचे प्रमाण.

(क) स्तंभ ५ किंवा ६ खाली येणाऱ्या कोरडवाहू जमिनीच्या बाबतीत, त्या अनुसूचीच्या स्तंभ ७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दर हेक्टरच्या किंमतीच्या आधारे गणना केलेली किंमत, किंवा]

(ख) त्या अनुसूचीचे [२][स्तंभ २, ३ व ४] यांखाली येणाऱ्या जमिनीच्या बाबतीत, कोरडवाहू पिकाच्या जमिनीबद्दलच्या [३][दर हेक्टरला] किंमतीनुसार गणना केलेल्या किंमतीत अनुक्रमे शंभर, पन्नास आणि पंचवीस टक्क्यांनी वाढ करून आलेली रक्कम :

[४][**स्पष्टीकरण.**—खंड (क) मध्ये निर्देश केलेल्या जमिनीच्या बाबतीत कोणत्याही प्रकरणी दर हेक्टरला एक हजार रुपयांपेक्षा अधिक किंमत होणार नाही आणि खंड (ख) मध्ये निर्देश केलेल्या जमिनीच्या बाबतीत कोणत्याही प्रकरणी दर हेक्टरला पाच हजार रुपयांपेक्षा अधिक किंमत होणार नाही:]

परंतु, [५][प्रारंभाच्या दिनांकाच्या] निकटपूर्वीच्या तीन वर्षांच्या अखंड कालावधीत ज्या जमिनीची लागवड करण्यात आली नसेल अशा जमिनीच्या बाबतीत, अशी किंमत ही, यथास्थिति, खंड (क) किंवा (ख) अन्वये गणना केलेल्या किंमतीच्या पंचवीस टक्क्यांएवढी असेल :

तसेच, परंतु मागील परंतुकास अधीन राहून,—

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १६ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ (२) अन्वये "स्तंभ ४, ५ व ६" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ (२) अन्वये "दर एकरी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १६ (२-अ) आणि १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ५ अन्वये या स्पष्टीकरणाची भर घालण्यात आली.

५. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १६ (३) अन्वये "नेमलेल्या दिवसाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(एक) [1][जमीन महसूल अधिनियमाच्या कलम २९, पोट-कलम (३) च्या खंड (ब) खालील वर्ग दोनचा खातेदार असेल असा भूमिधारी म्हणून] धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत यथास्थिति, खंड (क) किंवा (ख) अन्वये गणना केलेली किंमत, अशा जमिनीवर त्या वेळी आकारण्यात येणाऱ्या महसुलाच्या तीन पट इतक्या रकमेने कमी करण्यात येईल;

(दोन) ज्या जमिनीची विभागणी करता येत नसेल व जिचे हस्तांतरण करता येत नसेल अशा जमिनीच्या बाबतीत अशी किंमत ही, यथास्थिति, खंड (क) किंवा (ख) अन्वये गणना केलेल्या किंमतीच्या दोन-तृतीयांशाएवढी असेल;

(तीन) शासनाकडून पट्ट्याने धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत, अशी किंमत, यथास्थिति, खंड (क) किंवा (ख) अन्वये गणना केलेल्या किंमतीच्या दहा टक्क्यांएवढी असेल; [2][आणि, (ग) कोणतीही झाडे, कामे, बांधकामे व जोडकामे यांची किंमत; आणि]

[3][ * * * ]

(ङ) दुमाला किंवा इनाम जमिनीवर आकारण्यायोग्य असलेला पूर्ण जमीन महसूल आणि त्यावर देण्याजोगा जमीन महसूल यातील फरकाच्या सातपटीएवढी रक्कम.

[4][(च) अशा जमिनीवरील उभ्या पिकाचा लागवडीचा खर्च किंवा कलम २१ खाली जमीन निहित होण्यापूर्वी अथवा त्यानंतर जमीनधारकाशी पिकाच्या कापणीबद्दल किंवा पिकाची विल्हेवाट लावण्याबद्दल करार केला असेल तर, अशा करारानुसार मान्य केलेली रक्कम किंवा व्यवस्था केली असेल तर अशी कोणतीही व्यवस्था.]

**स्पष्टीकरण एक.**--राज्याच्या कोणत्याही भागात जमाबंदी करण्यात आली नसेल त्याबाबतीत,
१९५४ चा आकारणी ही, [5][जमीन महसूल अधिनियमाच्या कलम ६८ अन्वये किंवा मुंबई विलीन प्रदेश व क्षेत्रे
मुंबई ३९ (जहागिरी नाहीशा करणे) अधिनियम, १९५३, कलम ७ अन्वये निश्चित केल्याप्रमाणे असेल.]

**स्पष्टीकरण दोन.**--खंड (ग) च्या प्रयोजनासाठी विहिरीची किंमत ही, अशा विहिरीचे पाणी मिळणाऱ्या जमिनीची ओलिताखालील जमीन म्हणून जी किंमत होईल ती किंमत व उक्त जमिनीची कोरडवाहू जमीन म्हणून जी किंमत होईल ती किंमत या दोहोमधील फरकाइतकी असेल.

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १६ (४) अन्वये, "एखाद्या भू-धृतिधारकाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. खंड (क) हा, १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ (अ) अन्वये दाखल केला असल्याचे नेहमीच समजण्यात आले आहे.

३. खंड (ङ) हा, वरील अधिनियमाचे कलम ३ (ब) अन्वये वगळण्यात आल्याचे नेहमीच समजण्यात आले आहे.

४. खंड (च) हा, १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ३ अन्वये मूळ खंडाऐवजी दाखल करण्यात आल्याचे नेहमीच समजण्यात आले आहे.

५. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १६ (५) अन्वये, "(एक) राज्याच्या मुंबई क्षेत्रात" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "१९५४ च्या कलम ५३ च्या उपबंधान्वये किंवा तदनुसार" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२४.** (१) कलम २१, पोट-कलम (४) अन्वये अतिरिक्त जमिनीचा कब्जा घेण्यात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने, अधिकथनात निर्दिष्ट केलेली अतिरिक्त जमीन जेथे असेल अशा गावात जिल्हाधिकारी जाहीर नोटीस देण्याची व्यवस्था करील आणि अशा नोटिशीद्वारे अशा जमिनीत हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींकडून भरपाई बाबतचे सर्व दावे त्याच्याकडे सादर करण्यास फर्मावील.

जिल्हाधिकाऱ्याने हितसंबंध असलेल्या व्यक्तीस भरपाईबद्दल आपल्या मागण्या सादर करण्याविषयी नोटीस देणे.

(२) अशा नोटिशीद्वारे, जमीन धारण करणाऱ्या आणि तीत हितसंबंध असणाऱ्या इतर व्यक्तीस (त्या जमिनीवर वैधरीत्या कोणतेही भार असणाऱ्या व्यक्तींचा समावेश करून) जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यापुढे नोटिशीत निर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकास, त्यावेळेस आणि त्या जागी (असा दिनांक नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांपेक्षा आधीचा असणार नाही) हजर राहण्यास आणि जमिनीत त्याच्या हितसंबंधाचे स्वरूप व त्याची मर्यादा [१][आणि कोणतीही झाडे, कामे, बांधकामे किंवा कायम स्वरूपाची जोडकामे यांची किंमत] आणि त्याबाबत भरपाईची रक्कम आणि तीबाबतच्या त्यांच्या दाव्यांचा तपशील याबाबत निवेदन करण्यास फर्माविले जाईल. असे प्रत्येक निवेदन लेखी स्वरूपात करण्यात येईल आणि त्यावर हितसंबंध असलेली व्यक्ती किंवा तिचा अभिकर्ता सही करील.

**२५.** (१) कलम २४ अन्वये ठरविलेल्या दिवशी किंवा ज्या दिवसापर्यंत चौकशी स्थगित करण्यात येईल अशा इतर कोणत्याही दिवशी, जिल्हाधिकारी भरपाईबद्दलच्या सर्व दाव्यांबाबत चौकशी करील आणि--

भरपाई ठरविणे आणि तिचे संविभाजन.

(क) कलम २३ च्या तरतुदींनुसार द्यावयाच्या भरपाईची रक्कम ठरविणारा,

(ख) पोट-कलमे (२) आणि (३) च्या तरतुदीस अधीन राहून, जमिनीत ज्या व्यक्तींचे हितसंबंध असल्याचे जिल्हाधिकाऱ्यास माहीत असेल किंवा ज्यांचे तीत हक्क असल्याचे त्यास वाटत असेल, अशा सर्व व्यक्तींमध्ये--मग त्या त्याच्यासमोर हजर झालेल्या असोत किंवा नसोत--भरपाईचे संविभाजन करण्याबाबतचा तो निवाडा देईल.

(२) (क) कुळाने धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत द्यावयाच्या भरपाईच्या रकमेची विभागणी कूळ व जमीनधारक यांच्यामध्ये पुढीलप्रमाणे करण्यात येईल :--

[२][(एक) जर संबंधित कुळवहिवाटीच्या विधिअन्वये, ज्या मुदतीसाठी कुळवहिवाट निर्माण करण्यात आली ती मुदत संपल्यानंतर किंवा परिपाठामुळे कुळवहिवाट रद्द केली जाऊ शकत नसेल अशा बाबतीत, अशा जमिनीवरील करयोग्य आकारणीच्या तीनपटीइतकी भरपाई कुळास आणि बाकीची जमीनमालकास देण्यात येईल;

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत कुळास द्यावयाची भरपाई ही,--

(क) पट्ट्याचा असमाप्त कालावधी पाच वर्षांहून अधिक नसेल तर, ती अशा जमिनीवरील करयोग्य आकारणीच्या सहापट रकमेइतकी असेल;

---

१. "त्यातील कोणतीही बांधकामे, विहिरी आणि बंधारे यांची किंमत, त्यावर केलेली कोणतीही कायम स्वरूपाची बांधकामे, आणि लावलेली झाडे" ह्या मजकुराऐवजी हा मजकूर १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ३२, कलम ४ अन्वये नेहमीकरिता दाखल करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

२. उप-खंड (एक) आणि (दोन) ऐवजी हा मजकूर १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ९, कलम ४ अन्वये दाखल करण्यात आला.

(ख) जर पट्ट्याचा असमाप्त कालावधी पाच वर्षांहून अधिक असेल परंतु दहा वर्षांहून अधिक नसेल तर, ती अशा जमिनीवरील करयोग्य आकारणीच्या नऊपट रकमेइतकी असेल;

(ग) जर पट्ट्याचा असमाप्त कालावधी दहा वर्षांहून अधिक असेल परंतु वीस वर्षांहून अधिक नसेल तर ती अशा जमिनीवरील करयोग्य आकारणीच्या बारापट रकमेइतकी राहील;

(घ) जर पट्ट्याचा असमाप्त कालावधी वीस वर्षांहून अधिक असेल तर ती अशा जमिनीवरील करयोग्य आकारणीच्या पंधरापट रकमेइतकी राहील;

आणि बाकीची भरपाई प्रत्येक बाबतीत जमीनमालकास देय असेल.]

[१][**स्पष्टीकरण** :—जमीनमालक आणि कूळ यांच्यामध्ये भरपाईच्या विभागणीचा विचार करताना कलम २३, खंड (च) मध्ये उल्लेखिलेली भरपाई आणि अशा जमिनीवर कुळाने केलेली बांधकामे, विहिरी आणि बांध-बंधारे व कायम स्वरूपाची जोडकामे विचारात घेतली जाणार नाहीत.]

(ख) पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून, ज्या भाराबाबत जमीनमालक जबाबदार असेल असे भार जमीनमालकास द्यावयाच्या भरपाईच्या रकमेतून देण्यात येतील आणि ज्यास कूळ जबाबदार आहे असे भार कुळास द्यावयाच्या भरपाईच्या रकमेतून देण्यात येतील.

(३) भारांबाबत दावा सांगणाऱ्या व्यक्तींमध्ये भरपाईचे संविभाजन पुढील रीतीने करण्यात येईल :-

(क) जर जमिनीवरील अशा भारांची एकूण किंमत सदरहू जमिनीबाबत द्यावयाच्या भरपाईच्या रकमेपेक्षा कमी असेल तर, भारांची पूर्ण रक्कम भारधारकास परत देण्यात येईल.

(ख) जर जमिनीवरील अशा भारांची एकूण रक्कम, सदरहू जमिनीबाबत द्यावयाच्या भरपाईच्या रकमेपेक्षा अधिक असेल, तर भरपाईची रक्कम भारधारकामध्ये यथास्थिति अग्रतेच्या क्रमानुसार वाटण्यात येईल.

(४) भरपाई मंजूर करणारा कोणताही निवाडा,--

(क) अशी भरपाईची रक्कम पंचवीस हजार रुपयांहून अधिक होत असेल परंतु ती पन्नास हजार रुपयांहून अधिक नसेल तर, आयुक्तांच्या पूर्वसंमतीशिवाय देता येणार नाही, आणि

(ख) अशा भरपाईची रक्कम पन्नास हजार रुपयांहून अधिक होत असेल तर, राज्य शासनाच्या पूर्वसंमतीशिवाय देता येणार नाही.

(५) जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निवाडा कलम ३३ अन्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे करावयाच्या अपिलास, आणि अपिलात न्यायाधिकरणाने दिलेल्या निवाड्यास अधीन राहून, अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा कामकाजात हरकत घेता येणार नाही.

भरपाईची रक्कम द्यावयाची पद्धती.

**२६.** (१) भरपाईची रक्कम, पोट-कलम (३) च्या तरतुदीस अधीन राहून, हस्तांतरणयोग्य रोख्यात देता येईल आणि त्यावर दरसाल दर शेकडा तीन टक्के दराने व्याज मिळेल.

---

१. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ४ अन्वये हे स्पष्टीकरण नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(२) रोखे हे पुढील किंमतीचे असतील, म्हणजे,--

(क) रुपये ५०, रुपये १००, रुपये २००, रुपये ५००, रुपये १,०००, रुपये ५,००० आणि रुपये १०,०००; आणि

(ख) ते दोन प्रकारचे असतील, म्हणजे ज्या दिनांकास रोखे काढण्यात आले त्या दिनांकापासून वीस वर्षांच्या मुदतीत मुद्दल व व्याज यांच्या समान वार्षिक हप्त्याने परतफेड करण्याजोगे रोखे आणि दुसऱ्या प्रकारचे रोखे म्हणजे ते ज्या दिनांकास काढण्यात आले त्या दिनांकापासून वीस वर्षांच्या मुदतीनंतर सममूल्य रकमेत विमोचनयोग्य असतील असे रोखे. अशा प्रकारच्या रोख्यांपैकी [1][कोणत्याही एका किंवा इतर प्रकारच्या दुसऱ्या रोख्यात, किंवा अंशत: एका प्रकारच्या व अंशत: इतर प्रकारच्या रोख्यात] भरपाईची रक्कम घेण्याबाबत त्यास निवड करता येईल.

(३) भरपाईची रक्कम किंवा तिचा कोणताही भाग वर सांगितलेल्या अभिधानात देता येत नसेल तर, अशी रक्कम किंवा तिचा भाग रोख देण्यात येईल.

## प्रकरण सहा

## अतिरिक्त जमिनीची वाटणी

[2][ २७. (१) याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमास अधीन राहून, कलम २१ अन्वये, राज्य शासनाने संपादन केलेली आणि राज्य शासनाकडे निहित असलेली (गायरान, किंवा तलावाखालील जमीन किंवा लागवडीसाठी अयोग्य म्हणून राज्य शासनाने अधिसूचित केलेली जमीन खेरीज करून) जमीन जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याकडून पोट-कलमे (२), (३), (४) आणि (५) यात ठरवून दिलेल्या प्राथम्यक्रमानुसार, जमीन महसूल अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून देण्यात येईल.

अतिरिक्त जमिनीचे वितरण.

(२) कोणत्याही कुळवहिवाटीच्या विधिअन्वये जातीने कसण्यासाठी म्हणून ज्याने आपल्या कुळाकडून जमीन ताब्यात घेऊन प्रारंभाच्या दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी, त्या कुळास भूमिहीन केले असेल अशा धारकाच्या मालकीची कोणतीही अतिरिक्त जमीन असेल त्या बाबतीत अशी अतिरिक्त जमीन, प्रथम त्या कुळास देऊ करण्यात येईल.

(३) एखाद्या व्यक्तीच्या धारण जमिनीचा कोणताही भाग हा, एक किंवा अधिक सलग गटांचा मिळून झाला असेल आणि असा भाग या अधिनियमान्वये अतिरिक्त जमीन म्हणून घोषित करण्यात आला असेल त्या बाबतीत अशी अतिरिक्त जमीन,--

---

१. १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ५ अन्वये "कोणत्याही एक प्रकारच्या रोख्यात," या मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १७ व १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ६ अन्वये कलम २७ दाखल करण्यात आले.

(क) ज्याने अशा व्यक्तीला जमीन भाडेपट्ट्याने दिली असेल व ज्याने संबंधित कुळवहिवाटीच्या विधिन्वये किंवा कलम १९ अन्वये जमीन परत मिळण्यासंबंधीच्या आपल्या अधिकाराची बजावणी केली नसेल अशा जमीन मालकास प्रथम देऊ करण्यात येईल; व

(ख) त्यानंतर, सलग गटामध्ये पूर्वी शेतमजूर म्हणून किंवा उक्त जमिनीवर काढण्यात किंवा लागवड करण्यात आलेल्या कृषि उत्पादनाच्या किंवा त्या संबंधातील कामावर तांत्रिक किंवा इतर कर्मचारी म्हणून, जी काम करीत होती अशी व्यक्ती ही, अशा गटातील जमीन अतिरिक्त जमीन म्हणून घोषित करण्यात आल्यामुळे बेकार झाली असेल तर तिला देऊ करण्यात येईल.

(४) त्यानंतर अतिरिक्त जमिनीच्या पन्नास टक्के [जमीन पोट-कलमे (२) व (३) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी वगळून] ही, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (मग त्या जाती व जमाती अनुसूचित क्षेत्रात राहत असोत किंवा नसोत) व राज्य शासन, वेळोवेळी अधिसूचित करील अशा भटक्या जमाती, विमुक्त जाती व मागासवर्ग यामधील, भूमिहीन व्यक्तींना वाटून देण्यासाठी राखून ठेवण्यात येईल व अशा रीतीने राखून ठेवण्यात आलेली जमीन याबाबत करण्यात आलेल्या नियमानुसार, अशा भूमिहीन व्यक्तींना देण्यात येईल. अशा नियमात प्राथम्यक्रम निश्चित करण्याबाबत तरतूद करता येईल.

(५) त्यानंतर, सर्व अधिक जमीन ही, [पोट-कलमे (२) व (३) या अन्वये जी अतिरिक्त जमीन देण्यात आली नसेल ती धरून] पुढील प्राथम्यक्रमानुसार देऊ करण्यात येईल :--

(एक) ज्या व्यक्तीकडून त्याच्या जमीनमालकाने जातीने कसण्यासाठी म्हणून कोणतीही जमीन कोणत्याही कुळवहिवाटीच्या विधिअन्वये परत घेतली असेल व परिणामी जी व्यक्ती भूमिहीन झाली असेल अशा व्यक्तीस; परंतु अशी व्यक्ती, वाटप करण्यासाठी असलेली उक्त अतिरिक्त जमीन ज्या गावात असेल त्या गावची किंवा त्या गावाच्या आठ किलोमीटर परिसरातील रहिवाशी असेल ;

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १४.

[1][ (एक-क) महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ याच्या तरतुदीनुसार ज्याची जमीन (जनजातीतील हस्तांतरकाची, जनजातीतर हस्तांतरितीला, हस्तांतरित करण्यात आलेली जमीन असल्यामुळे) जनजातीतील हस्तांतरकाला प्रत्यार्पित करण्यात आली असेल आणि जो दुसरी कोणतीही जमीन धारण करीत नसेल आणि जो शेतजमिनीवर अंगमेहनत करूनच मुख्यत: आपली उपजीविका करतो असा जनजातीतर हस्तांतरिती.

१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम १४.

**स्पष्टीकरण—**या खंडाच्या प्रयोजनांसाठी "जनजातीतर हस्तांतरिती" आणि "जनजातीतील हस्तांतरक" या संज्ञांना, महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ देण्यात आले असतील तेच अर्थ असतील;]

(दोन) कलम २८ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही उपक्रमाला ज्या व्यक्तीने आपली जमीन भाडेपट्ट्याने दिली असेल अशी व्यक्ती; परंतु, अशी व्यक्ती वाटप करण्यासाठी असलेली अतिरिक्त जमीन ज्या तालुक्यात असेल त्या तालुक्याची रहिवाशी असेल; अशा व्यक्तीचे सर्व साधनांपासूनचे निव्वळ वार्षिक उत्पन्न, चार हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही, आणि कलम २८-१-कक अन्वये अशा व्यक्तीला कोणतीही जमीन दिलेली नसेल;

---

१. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०, कलम ३ अन्वये खंड (एक-क) समाविष्ट करण्यात आला.

(तीन) सशस्त्र बलात नोकरी करणाऱ्या व्यक्ती आणि माजी सैनिक, किंवा हा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असेल असा कोणताही विधि किंवा कोणतेही कार्यकारी आदेश या अन्वये राज्य शासनाकडून कोणतीही जमीन देण्यापूर्वी अशी कोणतीही व्यक्ती मरण पावेल त्या बाबतीत तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती;

(चार) भूमिहीन व्यक्ती :

परंतु, समान प्राथम्यक्रम असणाऱ्या व्यक्ती असतील तर, वाटप करण्यासाठी असलेली अतिरिक्त जमीन ज्या गावात असेल त्या गावाच्या बाह्य सीमेपासून आठ किलोमीटरमधील रहिवाशी असणाऱ्या व्यक्तीस पसंती देण्यात येईल :

[१][परंतु, आणखी असे की, अतिरिक्त जमीन एखाद्या संयुक्त कृषि संस्थेने किंवा कृषि संस्थेने पूर्वी धारण केली असेल त्या बाबतीत, जी जमीन, ज्या व्यक्तीला संस्था आपला सदस्य म्हणून घेण्याची हमी घेत असेल आणि अशी व्यक्ती त्या संस्थेची सदस्य होत असेल तर तिला प्रथम देऊ करण्यात येईल.]

(६) जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी यास समान प्राथम्यक्रम असलेल्या व्यक्तींमधून (जमीन देण्यासाठी) एका किंवा त्याहून अधिक प्रतिग्रहीत्यांची पोट-कलमे (२), (३) व (५) अन्वये निवड करणे आवश्यक असेल, त्या बाबतीत, तो चिठ्ठ्या टाकून निवड करील :

परंतु, समान प्राथम्यक्रम असलेल्या अशा व्यक्तीमध्ये सशस्त्र बलात नोकरी करणाऱ्या व्यक्ती किंवा माजी सैनिक किंवा त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती असतील तर त्यांची पसंती करण्यात येईल; म्हणजे जर त्यांची संख्या, प्रतिग्रहीते म्हणून निवड करावयाच्या व्यक्तींच्या संख्येइतकी किंवा त्याहून कमी असेल त्या बाबतीत, त्या सर्वांची प्रतिग्रहीते म्हणून निवड करण्यात येईल, आणि जर त्यांची संख्या जमीन देण्यासाठी निवड करावयाच्या व्यक्तीच्या संख्येहून जास्त असेल तर, त्यांच्यात चिठ्ठ्या टाकून निवड करण्यात येईल.

(७) या कलमान्वये जमीन देताना, जिल्हाधिकारी किंवा प्राधिकृत अधिकारी हा, जमीन देण्यात आल्यानंतर त्या व्यक्तीने धारण केलेली एकूण जमीन ही, शक्यतो, कलम २, खंड (५) च्या उप-खंड (क) खाली येणाऱ्या जमिनीच्या बाबतीत एका हेक्टरपेक्षा किंवा त्या खंडाच्या उप-खंड (ख) खाली येणाऱ्या जमिनीच्या बाबतीत दीड हेक्टरपेक्षा किंवा त्या खंडाच्या उप-खंड (ग) किंवा (घ) खाली येणाऱ्या जमिनीच्या बाबतीत दोन हेक्टरपेक्षा किंवा त्या खंडाच्या उप-खंड (ङ) खाली येणाऱ्या जमिनीच्या बाबतीत, तीन हेक्टरपेक्षा अधिक होणार नाही याबद्दल आपली खात्री करून घेईल.

(८) बागायतीसाठी वापरलेली जमीन कलम २१ अन्वये राज्य शासनाकडे निहित होईल त्या बाबतीत, जमीन देण्यात आल्यानंतरही ती त्याच प्रयोजनासाठी वापरण्याचे चालू राहील या शर्तीवर, देण्यात येईल.

(९) कलम २१ अन्वये राज्य शासनाकडे निहित असलेली जमीन, गायरान जमीन किंवा तलावाखालील जमीन किंवा पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेली जमीन असेल त्या बाबतीत, राज्य शासनाला, त्यास योग्य वाटेल अशा प्रकारे, अशा जमिनीची विल्हेवाट लावता येईल.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ६ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

(१०) वर सांगितल्याप्रमाणे दिलेल्या अधिक जमिनीच्या संबंधात द्यावयाचे भोगाधिकारमूल्य हे त्या जमिनीबाबत निवाड्याद्वारे दिलेल्या भरपाईची प्रत्यक्ष रक्कम काहीही असली तरी, त्या जमिनीसाठी कलम २३ चा खंड (क) किंवा खंड (ख) व खंड (ग) आणि खंड (च) अन्वये परिगणना केलेल्या भरपाईच्या रकमेइतके असेल आणि प्रतिग्रहीत्यास पंधरापेक्षा अधिक नसतील अशा वार्षिक हप्त्यात ते देता येईल, त्यातील पहिला हप्ता पहिला जमिनीचा कब्जा घेतल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या आत देय होईल व त्यास नियत दिनांकापूर्वी कोणताही किंवा सर्व हप्ते देण्याचा विकल्प असेल. भोगाधिकारमूल्य हप्त्यानी देण्यात येईल त्या बाबतीत, अदत्त भोगाधिकारमूल्यावर दरसाल तीन टक्के दराने, सरळ व्याज देय होईल:

परंतु, जेव्हा अतिरिक्त जमिनीच्या भरपाईत अशा जमिनीवरील उभ्या पिकाच्या लागवडीच्या खर्चाचा समावेश असेल, आणि जर जमीन देण्यात आली असेल तेव्हा जमिनीवर कोणतेही पीक नसेल तर, अशा जमिनीचे, प्रतिग्रहीत्याने या पोट-कलमान्वये द्यावयाचे भोगाधिकारमूल्य हे, उभ्या पिकाच्या लागवडीच्या खर्चाबरोबरीच्या रकमेने कमी करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(क) सशस्त्र बलात नोकरी करणारी व्यक्ती म्हणजे, संघराज्याच्या सशस्त्र बलात नोकरी करणारी व्यक्ती;

(ख) माजी सैनिक म्हणजे, संघराज्याच्या सशस्त्र बलातील माजी सैनिक (परंतु, त्यात ज्या कोणत्याही व्यक्तीस सेना न्यायालयाने किंवा गैरवर्तनावरून किंवा तो फरारी झाल्यामुळे बडतर्फ करण्यात आले असेल किंवा सेवामुक्त करण्यात आले असेल आणि त्याचा परिणाम म्हणून जो सशस्त्र बलातील व्यक्ती म्हणून असण्याचे बंद झाले असेल किंवा ज्यास अनुप्रमाणित करण्यात आले नसेल अशा व्यक्तींचा समावेश होणार नाही.);

(ग) सशस्त्र बलात नोकरी करणाऱ्या अशा कोणत्याही व्यक्तीवर किंवा माजी सैनिकावर अवलंबून असणारी व्यक्ती म्हणजे, त्याची विधवा, मुलगा, मुलाचा मुलगा, अविवाहित मुलगी, वडील किंवा आई या क्रमाने,--अशा अवलंबून असलेल्या व्यक्तीचे, या कलमाखाली अतिरिक्त जमीन तिला ज्या महिन्यात देण्यात आली असेल त्या महिन्याच्या लगतपूर्वीच्या वर्षातील स्थूल वार्षिक उत्पन्न [१][रुपये १२,०००] पेक्षा अधिक असता कामा नये;

(घ) "अनुसूचित जाती" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, अनुसूचित जाती म्हणून समजण्यात येत असतील अशा जाती, वंश अथवा जमाती अथवा अशा जाती, वंश अथवा जमाती यांचे भाग अथवा त्यांच्यातील गट;

(ङ) "अनुसूचित जमाती" म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात, अनुसूचित जमाती म्हणून समजण्यात येत असतील अशा जमाती अथवा जनजातिसमूह किंवा अशा जमातीचे अथवा जनजातिसमूहाचे भाग अथवा त्यांच्यामधील गट;]

---

१. सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९७४ चा
महा. १

[1][२७-क. कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,--

सार्वजनिक प्रयोजने इत्यादींसाठी जमीन देण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

(१) जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी, कोणतीही योग्य अशी सरकारी जमीन नसेल किंवा अशा सार्वजनिक प्रयोजनासाठी, भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादनासाठी, इतर कोणतीही योग्य अशी जमीन आढळत नसेल तरच केवळ, कोणतीही अधिक जमीन अशा प्रयोजनासाठी मंजूर करता किंवा उपलब्ध करून देता येईल.

(२) कोणत्याही औद्योगिक उपक्रमाच्या मालकीची असलेली कोणतीही अधिक जमीन, प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर, राज्य शासनाकडे निहित झाली असेल त्या बाबतीत, राज्य शासनास, त्या जमिनीचा शेतीसाठी कार्यक्षमरीत्या वापर करण्याच्या दृष्टीने आणि तिच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी, त्यास आवश्यक वाटेल तर, उक्त जमिनीची कलम २८-१-कक मध्ये तरतूद केलेल्या रीतीने, विल्हेवाट लावण्याबद्दल निदेश देता येईल]

कार्यक्षम रीतीने लागवड करण्यासाठी आणि कच्च्या मालाचा पुरवठा सतत चालू ठेवण्यासाठी औद्योगिक उपक्रमाकडून घेतलेल्या जमिनीच्या संबंधात खास तरतूद.

२८. [2][(१) औद्योगिक उपक्रमाने धारण केलेली कोणतीही जमीन, कलम २१ अन्वये राज्य शासनाने संपादन केली असेल आणि ती राज्य शासनाकडे निहित असेल त्या बाबतीत, अशी जमीन, त्या उपक्रमाकडून कोणताही माल, वस्तू किंवा पदार्थ यांच्या उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल निर्माण करण्याच्या प्रयोजनार्थ, जिचा वापर करण्यात येत होता अशी असेल तर, राज्य शासन, अशा जमिनीच्या संपादनामुळे, कच्च्या मालाच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होणार नाही याबद्दल खात्री करून घेण्याची दक्षता घेईल;]

(२) कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमास अधीन राहून, राज्य शासनास अशा जमिनीचा शेतीसाठी पूर्ण व कार्यक्षम उपयोग करण्याची व तिच्या कार्यक्षम व्यवस्थापनाची [3][खात्री करून घेण्याच्या] प्रयोजनासाठी--

(क) उपरिनिर्दिष्ट प्रयोजनांसाठी अशा रीतीने संपादन करण्यात आलेल्या क्षेत्राची एक किंवा त्याहून अधिक सधन गटात सलगता राखून ठेवणे आवश्यक वाटत असेल तर (असे मत संबंधित व्यक्तींचे अर्ज विचारात घेऊन ठरविता येईल) त्यास तसे करता येईल; आणि

(ख) अशा अटींस व शर्तीस अधीन राहून, [4]* * * उक्त जमीन किंवा तिचा कोणताही भाग, शक्य असेल तेथवर पुढील व्यक्तींच्या संयुक्त कृषिसंस्थेस, (किंवा तिच्या सदस्यास) देता येईल.

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १८ अन्वये कलम २७-क समाविष्ट करण्यात आला.

२. १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम २ (१) अन्वये पोट-कलम (१) हे १ ऑक्टोबर, १९६९ पासून दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

३. १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम २ (२) (अ) अन्वये "अशा उपक्रमास अशा कच्च्या मालाचा पुरवठा सतत चालू राहण्याच्या कारणासाठी आणि सामान्यतः" या मजकुराऐवजी हा मजकूर १ ऑक्टोबर, १९६९ पासून दाखल करण्यात आल्याचे समजण्यात आले.

४. वरील अधिनियमाचे कलम २ (२) (ब) अन्वये "(विशेषकरून अशा शर्तीत" या शब्दांनी सुरू होणारा व "शर्तीचा समावेश करून)" या शब्दांनी संपणारा मजकूर १ ऑक्टोबर, १९६९ पासून वगळण्यात आल्याचे समजण्यात आले.

(एक) ज्यांनी पूर्वीच अशी जमीन उपक्रमास पट्ट्याने दिली आहे अशा व्यक्ती;

(दोन) उपक्रमाने, अशा जमिनीवर कामावर ठेवलेले (कोणतेही असल्यास) शेतमजूर;

(तीन) उपक्रमाने, अशा जमिनीवर, किंवा कोणत्याही कच्च्या मालाचे उत्पादन किंवा पुरवठा करण्याच्या संबंधात कामावर ठेवलेला तांत्रिक किंवा इतर सेवकवर्ग;

(चार) अल्पभूमिधारक असतील असे संलग्न जमिनीचे जमीनधारक;

(पाच) भूमिहीन व्यक्ती :

परंतु, राज्य शासनास,--

(क) पूर्वोक्त संयुक्त कृषि संस्था स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या व जमीन ताब्यात घेतल्याच्या दिनांकापासून प्रथमतः तीन वर्षांपेक्षा अधिक नसलेल्या मुदतीपर्यंत (जी दोन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा आणखी मुदतीपर्यंत वाढविता येईल) संपादन केलेल्या जमिनीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची, [1][राज्य शासनाकडून चालविण्यात येणाऱ्या किंवा राज्य शासनाच्या व्यवस्थेखाली असलेल्या एका किंवा अधिक कृषि क्षेत्रामार्फत किंवा (कंपनीचा समावेश करून) एक किंवा त्याहून अधिक महामंडळांमार्फत] लागवड करण्यात यावी असा निदेश देता येईल.

[2]* * * * *

[3]* * * * *

(३) राज्य शासनास पुढील बाबीसाठी तरतूद करता येईल :--

(क) पोट-कलम (२), खंड (ख) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अटीचे किंवा शर्तीचे उल्लंघन केल्यास, किंवा *

[4]* * * * *

[5]* * * * *

---

१. हा मजकूर १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ यातील कलम ६ अन्वये "राज्य शासनाकडून चालविण्यात येणाऱ्या किंवा राज्य शासनाच्या व्यवस्थेखाली असलेल्या एका किंवा अधिक फार्मकडून" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

२. १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ (१) अन्वये खंड (ख) वगळण्यात आला.

३. १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, याच्या कलम २ (३) (अ) अन्वये हे स्पष्टीकरण दिनांक १ ऑक्टोबर, १९६९ पासून वगळण्यात आल्याचे समजण्यात आले.

४. १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ (२) अन्वये खंड (ख) वगळण्यात आला.

५. १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम २ (३) (अ) अन्वये खंड (ग) हा १ ऑक्टोबर, १९६९ पासून वगळण्यात आल्याचे समजण्यात आले.

(घ) इतर कोणत्याही कारणांमुळे जमिनीची संपूर्ण व कार्यक्षमरीत्या लागवड करण्याच्या दृष्टीने, संयुक्त कृषि संस्थेने जमिनीची लागवड करण्याचे चालू ठेवणे इष्ट नसेल तर;

जमीन दिल्याबद्दलची मंजुरी काढून घेण्याबद्दल तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर आणि दुसऱ्या पक्षास त्याबद्दल कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अशी मंजुरी काढून घेतली जाईल आणि जमीन परत घेतली जाईल. त्यानंतर राज्य शासनास, जमिनीची योग्य प्रकारे लागवड करण्यासाठी व [1][कच्च्या मालाचे उत्पादन] करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशी इतर व्यवस्था करता येईल.

**२८-१-क.** [योजनेनुसार संयुक्त कृषि संस्था स्थापन होईपर्यंत जमीन देण्याबद्दलची अंतरिम व्यवस्था] १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७* अन्वये वगळण्यात आले.

राज्य महामंडळांना जमीन देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

१९७० चा महा. २७

[2][**२८-१-कक.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कलम २८ मध्ये उल्लेखिलेली व औद्योगिक उपक्रमांकडून ताब्यात घेतलेली आणि राज्य शासनाच्या मालकीच्या व त्याच्या नियंत्रणाखालील एका किंवा अधिक महामंडळांकडून (कंपनी धरून) जिची मशागत करण्यात येत असेल अशी अतिरिक्त जमीन, [3]*** अशा अतिरिक्त जमिनीचा एकसंघपणा एका किंवा अधिक सघन गटांमध्ये राखण्यात येईल या विशेष अटीवर, महाराष्ट्र शेत जमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, १९७० च्या प्रारंभापासून नव्वद दिवसांपेक्षा उशीरा नसेल अशा मुदतीत यथास्थिति अशा महामंडळास किंवा महामंडळांना, देता येईल. पूर्वोक्तप्रमाणे एका किंवा अधिक महामंडळांना अशी अतिरिक्त जमीन दिल्यावर, कलम २८ च्या तरतुदी संयुक्त कृषिसंस्थांच्या स्थापनेसंबंधी तरतूद करीत असतील तेथवर ते अशा अतिरिक्त जमिनीच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

(२) राज्य शासनास अशी तरतूद करता येईल की,--

(क) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही अटीच्या किंवा शर्तीच्या भंगाबद्दल, किंवा

(ख) [4][कच्च्या मालाचे उत्पादन] यथोचित व कार्यक्षम व्यवस्थापनाद्वारा ज्या मर्यादेपर्यंत किंवा ज्या रीतीने चालू ठेवावयास पाहिजे त्या मर्यादेपर्यंत किंवा त्या रीतीने ते चालू ठेवण्यात येत नाही असे, राज्य शासनास, योग्य ती चौकशी केल्यानंतर वाटेल तर, किंवा

---

१. सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम २ (३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याचे कलम ७ पुढीलप्रमाणे आहे :--

**७.** मुख्य अधिनियमाचे कलम २८-१अ वगळण्यात येईल, परंतु अशा प्रकारे वगळल्यामुळे त्या कलमाच्या पोट-कलम (१) मध्ये संयुक्त कृषिसंस्थांच्या स्थापनेसाठी तरतूद केलेल्या मुदतीस बाध येणार नाही.

२. कलम २८-१-कक हे, १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ८ अन्वये दाखल करण्यात आले.

३. १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ (१) अन्वये, "उपक्रमास वाजवी किंमतीत" या शब्दांनी सुरू होणारा व "या अटीवर आणि" या शब्दांनी संपणारा मजकूर २० मे १९७० पासून वगळण्यात आल्याचे समजण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (अ) अन्वये "व उपक्रमास होणारा कच्च्या मालाचा पुरवठा" हा मजकूर २० मे १९७० पासून वगळण्यात आल्याचे समजण्यात आले.

[१][(ख-१) महामंडळाकडे (कंपनी धरून) सध्या निहित असलेली सर्व जमीन किंवा तिचा भाग, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी काढून घेणे राज्य शासनास आवश्यक वाटत असेल तर, किंवा;]

(ग) जमिनीची पुरेपूर व कार्यक्षम लागवड करण्याच्या दृष्टीने, महामंडळाकडे (कंपनी धरून) त्या जमिनीची लागवड चालू ठेवणे जर कोणत्याही कारणावरून अनिष्ट वाटत असेल तर, अशी देणगी, ती समाप्त करण्याविषयी तीन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर व महामंडळाला कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, समाप्त करण्यात येईल व ती जमीन परत घेण्यात येईल. त्यानंतर, राज्य शासनास, जमिनीच्या यथोचित लागवडीसाठी एक किंवा अधिक कृषिक्षेत्रे, चालविण्याकरिता, [२][आणि त्यांच्या व्यवस्थापनाकरिता [३][कच्च्या मालाचे उत्पादन चालू ठेवण्याकरिता], स्वत: उपाययोजना करता येईल, किंवा पोट-कलमे (३) आणि (३-क) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने जमिनीची विल्हेवाट करता येईल.]

[४]* * * * *

[५][(३) राज्य शासनास, पोट-कलम (४) च्या तरतुदींना अधीन राहून, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींच्या मतांविषयी खात्री करून घेतल्यानंतर, जिने आपली जमीन उपक्रमास पूर्वी पट्ट्याने दिलेली असून, जिला आपल्या वैयक्तिक लागवडीसाठी त्या जमिनीची गरज आहे अशा (सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नसलेल्या) व्यक्तीला, या अधिनियमातील करारनिविष्ट केलेल्या कमाल मर्यादेपर्यंतचे क्षेत्र किंवा अशा व्यक्तीने उपक्रमास पट्ट्याने दिलेल्या जमिनीचे प्रत्यक्ष क्षेत्र, यांपैकी जे कमी असेल तितकी जमीन, ह्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर अटींस व शर्तीस अधीन राहून देता येईल :

परंतु, ज्या व्यक्तीने १९ सप्टेंबर, १९७५ रोजी असल्याप्रमाणे तिने धारण केलेल्या जमिनीच्या बाबतीत, या अधिनियमांच्या कलम १२ किंवा १२-क अन्वये विवरण दाखल करणे आवश्यक होते आणि जिची जमीन, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये अतिरिक्त असल्याचे घोषित करण्यात आले होते, अशी व्यक्ती अशी जमीन दिली जाण्यास हक्कदार असणार नाही :

२००३ चा महा. १७. परंतु आणखी असे की, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभापासून ९० दिवसानंतर अशी जमीन देण्याकरिता ज्या व्यक्तीने अर्ज केला असेल, अशी व्यक्ती अशी जमीन देण्यासाठी पात्र असणार नाही:]

---

१. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ (क) (१) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) (ब) अन्वये "कच्च्या मालाचे उत्पादन" या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि "चालू ठेवण्याकरिता" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी, २० मे, १९७० पासून हा मजकूर दाखल केल्याचे समजण्यात आले.

३. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ (क) (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ (२) (क) अन्वये स्पष्टीकरण २० मे, १९७० पासून वगळण्यात आल्याचे समजण्यात येईल.

५. २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ (ब) अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

[१][परंतु तसेच, ज्या व्यक्तीने महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००१ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केला नव्हता किंवा ज्या व्यक्तीने उक्त कालावधीनंतर अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे, अशा व्यक्तीने, महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) अधिनियम, २००६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अशी जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास, ती व्यक्ती अशी जमीन परत मिळण्यास पात्र होईल.]

२००३ चा महा. १७.

२००६ चा महा. ८.

[२][(३-क) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाला, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित याकडे निहित असलेल्या जमिनींची, याबाबतीत विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाला विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर, सार्वजनिक प्रयोजनासाठी, विल्हेवाट करता येईल "आणि जेव्हा अशी विल्हेवाट शासकीय अथवा निमशासकीय संस्थांव्यतिरिक्त इतर संस्थांना करण्यात येईल तेव्हा ती मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये करण्यात आलेल्या मुंबई मुद्रांक (मालमत्तेचे खरे बाजारमूल्य ठरविणे) नियम, १९९५ अनुसार ठरविण्यात आलेल्या बाजारमूल्यानुसार अथवा जाहीर लिलावाने करण्यात येईल."

१९५८ चा मुंबई ६०.

**स्पष्टीकरण.**--या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता "सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनींची विल्हेवाट करणे" या शब्दप्रयोगाचा अर्थ, शैक्षणिक, वैद्यकीय किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था किंवा समाजकल्याण आणि सांस्कृतिक कार्य संस्था याच्याकरिता सार्वजनिक प्रयोजनासाठी किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २२ खालील विकास योजनेमध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम ३ च्या खंड (फ) मध्ये समावेश असलेल्या, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या नगरपालिका क्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या परिसरात असलेल्या, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम (२) च्या खंड (१०) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या बृहत नागरी क्षेत्रातील इतर कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी जमिनीची विल्हेवाट करणे, असा आहे.]

१९६६ चा महा. ३७.

१८९४ चा १.

१९६५ चा महा. ४०.

१९४९ चा मुंबई ५९.

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(४) पोट-कलम (३) अन्वये द्यावयाच्या जमिनीचा तपशील, राज्य शासन, एक किंवा अधिक सघन गटांमध्ये शेताचा एकसंघपणा राखण्याची गरज योग्यरीत्या लक्षात घेऊन, लेखी आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे असेल.[३]***

[४][ * * * *]

[५][ * * * *]

---

१. २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

२. २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ (क) अन्वये पोट-कलम (३-क) समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ (ड) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

४. सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ (४) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २ (क) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

*[२८-१-ख. [कच्च्या मालाचा पुरवठा व रास्त किंमतीचे नियमन] *१९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (१) अन्वये, १ ऑक्टोबर, १९६९ पासून वगळण्यात आले.]

**२८-क.** [विवक्षित जमिनीची सलगता वगैरे राखून ठेवण्यासाठी त्यांच्याबाबतीत विशिष्ट तरतूद] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २२ अन्वये वगळण्यात आले.

कलम २८ अन्वये देण्यात आलेल्या जमिनीचे हस्तांतरण किंवा विभागणी करण्यावर निर्बंध.

**२९.** (१) कलम २७ अन्वये देण्यात आलेल्या किंवा कलम २८ अन्वये संयुक्त कृषि संस्थेस दिलेल्या कोणत्याही जमिनीचे जिल्हाधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीवाचून--

(क) विक्री करून (दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा किंवा निवाडा किंवा कोणत्याही इतर सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश अंमलात आणण्याकरिता करावयाची विक्री धरून) किंवा देणगी, गहाण, अदलाबदल, पट्टा किंवा इतर गोष्टीद्वारे हस्तांतरण करता येणार नाही; किंवा

(ख) विभाजन करून इतर रीतीने आणि दिवाणी न्यायालय किंवा कोणताही इतर सक्षम प्राधिकारी यांचा हुकूमनामा किंवा आदेश याद्वारे तिची विभागणी करता येणार नाही;

अशी मंजुरी विहित करण्यात येईल त्या परिस्थिती खेरीजकरून व विहित करण्यात येतील त्या अटी खेरीजकरून [1][राज्य शासनास अधिमूल्य किंवा नजराणा देण्यासंबंधीची अट धरून] इतर परिस्थितीत व अटीवर देण्यात येणार नाही :

[2][परंतु, सशस्त्र बलात नोकरी करणाऱ्या व्यक्तीकडून जमीन पट्ट्याने देण्यात यावयाची असेल त्या बाबतीत किंवा अशा जमिनीमध्ये कोणतीही सुधारणा करण्याच्या प्रयोजनार्थ कर्ज उभारण्यासाठी अधिनियमाच्या कलम ३६, पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जमीन गहाण ठेवण्यात यावयाची असेल त्या बाबतीत, अशा कोणत्याही मंजुरीची आवश्यकता असणार नाही.]

(२) जर पोट-कलम (१) अन्वये जिल्हाधिकाऱ्याने कोणतेही हस्तांतरण करण्यास किंवा विभागणी करण्यास मंजुरी दिली असेल तर, त्यानंतरचे अशा जमिनीचे कोणतेही हस्तांतरण किंवा विभागणी ही सुद्धा पोट-कलम (१) च्या तरतुदीस अधीन असेल.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) चे उल्लंघन करून केलेले जमिनीचे कोणतेही हस्तांतरण किंवा कोणतीही विभागणी आणि अशी जमीन संपादन करणे या गोष्टी अवैध ठरतील आणि त्याबद्दल शास्ती म्हणून अशा जमिनीतील किंवा जमिनीच्या संबंधातील हस्तांतरकर्ता किंवा हस्तांतरिती याचा कोणताही हक्क आणि हितसंबंध, अशा व्यक्तींना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्यावर, सरकारजमा होईल आणि आणखी हस्तांतरणाशिवाय ती राज्य शासनाकडे निहित होईल.

---

* कलम २८-१ख व तिसरी अनुसूची वगळण्यात आल्याच्या परिणामांसाठी १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५० चे कलम ४ पहा.

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, याच्या कलम २३-अ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २३-ब अन्वये हे परंतूक मूळ परंतुकाऐवजी दाखल करण्यात आले.

## प्रकरण सात

## कार्यपद्धती आणि अपील

१९०८ चा मुंबई ५.

चौकशी करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

**३०.** या अधिनियमान्वये चौकशी करताना जिल्हाधिकारी यास, दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये न्यायालयाकडे पुढील बाबतीत जे अधिकार निहित केलेले आहेत तेच अधिकार असतील.

(क) प्रतिज्ञालेखावरून वस्तुस्थिती सिद्ध करणे;

(ख) कोणत्याही व्यक्तीस, समन्स काढून बोलाविणे व तिला हजर राहावयास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे; आणि

(ग) दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे.

[1][या अधिनिमयान्वये कोणतीही चौकशी चालू असताना एखादा धारक मरण पावल्यास, जिल्हाधिकारी, मयत धारकाच्या कायदेशीर प्रतिनिधीचे नाव अभिलेखात नमूद करून घेण्याची व्यवस्था करील आणि जिल्हाधिकारी त्यानंतर चौकशीचे काम पुढे चालू ठेवील.]

जिल्हाधिकाऱ्याचे निर्णय अभिलेखित करण्याची रीत.

**३१.** जिल्हाधिकाऱ्याचा प्रत्येक निर्णय आदेशाच्या स्वरूपात नोंदण्यात येईल व त्यात अशा निर्णयाची कारणे नमूद केली जातील.

नोटीस बजावणे.

**३२.** (१) या अधिनियमान्वयेच्या कोणत्याही नोटिशीची बजावणी जिल्हाधिकाऱ्याने किंवा त्याच्या आदेशान्वये सही केलेली नोटिशीची प्रत स्वाधीन करून किंवा सादर करून करण्यात येईल.

(२) शक्य असेल तेथे अशी नोटीस तीत नाव असलेल्या व्यक्तीवर बजावण्यात येईल.

(३) जर अशी व्यक्ती सापडणे शक्य नसेल तर, त्याजबरोबर राहत असणाऱ्या त्याच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ पुरुष सदस्यावर अशी नोटीस बजावता येईल आणि जर असा कोणताही प्रौढ पुरुष सदस्य आढळून आला नाही तर, त्यात नाव असलेली व्यक्ती साधारणत: ज्या घरात राहत असेल किंवा व्यवसाय चालवीत असेल त्या घराच्या बाहेरील दारावर त्याची प्रत लावून बजावता येईल किंवा ती जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयातील कोणत्या तरी ठळक जागी किंवा ज्या जमिनीच्या संबंधात चौकशी करावयाची असेल त्या जमिनीतील कोणत्या तरी ठळक जागी देखील नोटिशीची प्रत लावून अशी नोटीस बजावता येईल :

परंतु, जिल्हाधिकारी तसा निदेश देईल तर, नोटीस त्यात नाव असलेल्या व्यक्तीस अनुलक्षून लिहिलेल्या पत्राद्वारे तिच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या जागी, पत्त्यावर किंवा व्यवसायाच्या जागी पोस्टाने पाठवता येईल. आणि ज्या व्यक्तीच्या नावे नोटीस असेल त्या व्यक्तीची पावती हजर करून ती बजावण्यात आली असल्याचे सिद्ध करता येईल.

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम २४ अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

अपिले. **३३.** (१) पुढील प्रकरणात जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध किंवा त्याच्या निवाड्याविरुद्ध महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल :--

(१) कलम १३, पोट-कलम (२) आणि पोट-कलम (३) अन्वयेचा आदेश; [1][ज्या अन्वये सर्व तपशिलासह परिपूर्ण असे खरे व अचूक विवरणपत्र सादर करणे आवश्यक असेल अशा स्वरूपाचा नसलेला आदेश];

(२) कलम २१ खाली काढलेले घोषणापत्र [2][किंवा त्याच्या कोणताही भाग];

[3][(२-क) खंड २१-क अन्वयेचा आदेश];

(३) कलम २५ खालील निवाडा;

(४) कलम २९ अन्वये जमिनीचे हस्तांतरण किंवा तिची विभागणी करण्यास नकार दिलेला आदेश;

(५) कलम २९, पोट-कलम (३) अन्वये सरकारजमा करण्याबद्दल दिलेला आदेश;

(६) कलम ३७ अन्वये, घोषणापत्र किंवा निवाडा यांची सुधारणा ; आणि

(७) कलम ४० अन्वये संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकल्याचा आदेश.

[4][(१-क) निर्णय, आदेश, घोषणापत्र किंवा निवाडा यांच्या कोणत्याही भागावर उत्तरवादीने अपील केले नसले तरी, कोणत्याही उत्तरवादीस, त्याच्याविरुद्ध ठरविण्यात आलेल्या मुद्यांपैकी कोणत्याही मुद्यावर, यथास्थिति निर्णय, आदेश, घोषणापत्र किंवा निवाडा यास केवळ पुष्टीच देता येईल असे नाही तर, अपिलाद्वारे त्यास उपस्थित करता आले असते असे, निर्णय, आदेश, घोषणापत्र किंवा निवाडा यासंबंधी प्रतिआक्षेपसुद्धा घेता येतीलः

परंतु, त्याने अपिलाच्या सुनावणीसाठी ठरविलेल्या दिवसाबद्दलची नोटीस त्याच्यावर बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून [5][तीस दिवसांच्या] आत, किंवा न्यायाधिकरणास जी आणखी मुदत देणे योग्य वाटेल अशा आणखी मुदतीत, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे आक्षेप सादर केलेले असतील; आणि त्यानंतर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या पहिल्या अनुसूचीच्या नियम २२, नियमक्रम ४१ याच्या तरतुदी या, त्या नियमक्रमाखालील प्रतिआक्षेपास ज्याप्रमाणे लागू होतील, त्याप्रमाणे त्या, उक्त प्रतिआक्षेपास लागू होतील.] १९०८ चा मुंबई ५.

(२) पोट-कलम (१) खालील अपिलाच्या प्रत्येक विनंती-अर्जाबरोबर, ज्याविरुद्ध अपील करण्यात येत असेल तो निर्णय, आदेश, घोषणापत्र किंवा निवाडा याची [6]**** प्रत जोडण्यात येईल.

---

[1] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २५ (१) (अ) अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

[2] १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ८ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २५ (१) (ब) अन्वये खंड (२-क) समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २५ (२) अन्वये पोट-कलम (१-क) समाविष्ट केले.

[5] १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ११ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

१९०८ चा मुंबई ५. (३) अशा अपिलाचा निर्णय करताना, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली मूळ न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश यावरील अपिलाचा निर्णय करताना न्यायालयाकडून ज्या अधिकारांचा वापर केला जातो त्याच अधिकारांचा वापर करील आणि न्यायालय जी कार्यपद्धती अनुसरते तीच कार्यपद्धती अनुसरील.

महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचा आदेश वगैरे कायम करण्याचा अधिकार.

**३४.** महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणास, कलम ३३ खालील अपिलावर निर्णय देताना, निर्णय, आदेश, घोषणापत्र किंवा निवाडा अथवा, यथास्थिति, सुधारणा केलेले घोषणापत्र किंवा निवाडा कायम करता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो रद्द करता येईल.

अपिलाबाबत मुदत.

**३५.** या अधिनियमान्वये करावयाचे प्रत्येक अपील [१][जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय, आदेश, घोषणापत्र किंवा निवाडा याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या मुदतीच्या आत दाखल करण्यात येईल. भारताचा मुदतीबाबत अधिनियम, १९०८ याची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी] असे अपील दाखल करण्याच्या बाबतीत लागू होतील.

न्यायालय फी.

१९५९ चा मुंबई ३६. **३६.** मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या अपिलावर,--

(१) जिल्हाधिकाऱ्याने कलम २१ अन्वये दिलेल्या किंवा कलम ३७ अन्वये सुधारलेल्या घोषणापत्राच्या बाबतीत, पंचवीस रुपये किंमतीचा;

(२) जिल्हाधिकाऱ्याने कलम २५ अन्वये दिलेल्या निवाड्याच्या बाबतीत किंवा कलम ३७ अन्वये सुधारलेल्या निवाड्याच्या बाबतीत, अपील करणाऱ्यास दिलेल्या भरपाईची रक्कम आणि त्याने आपल्या अपिलात मागणी केलेली रक्कम यामध्ये जो फरक असेल त्याच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम किंवा पंधरा रुपये यांपैकी जी अधिक असेल त्या रकमेचा; आणि

(३) कोणत्याही इतर बाबतीत, पाच रुपये किंमतीचा न्यायालय फी मुद्रांक लावण्यात येईल.

---

१. १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण आठ

## संकीर्ण

घोषणापत्रातील किंवा निवाड्यातील लेखनदोष इत्यादी दुरुस्त करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

३७. कलम २१ अन्वये केलेल्या घोषणापत्रातील किंवा कलम २५ अन्वये दिलेल्या निवाड्यातील कोणतेही लेखनदोष किंवा अंकगणितीय चुका किंवा त्यातील अभावित दोष किंवा वर्जने यातून उद्भवणाऱ्या चुका, [१]**** जिल्हाधिकारी यास स्वत: होऊन दुरुस्त करता येतील किंवा घोषणापत्रात किंवा त्या निवाड्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तीने अर्ज केल्यावर दुरुस्त करता येतील आणि दुरुस्त करण्यात आल्याप्रमाणेचे घोषणापत्रक किंवा निवाडा हा तद्नुसार सुधारण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[२][परंतु, अशा दुरुस्तीमुळे जिच्या हितसंबंधाला बाधा पोहोचू शकेल अशा व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, कोणतेही घोषणापत्र अथवा निवाडा यात दुरुस्ती केली जाणार नाही.]

जमीन-महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे रक्कम वसूल करण्याजोग्या असणे.

३८. कोणत्याही व्यक्तीकडून राज्य शासनाला या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा तद्नुसार येणे असलेली काणतीही रक्कम--मग ती भोगवटा मूल्य म्हणून, खंड म्हणून, दंड म्हणून, भरपाईबद्दल [३][कलम २१-क अन्वये देय असलेल्या भरपाईबद्दल] दिलेली जादा रक्कम म्हणून देण्याजोगी असो, किंवा इतर कोणत्याही स्वरूपात देण्याजोगी असो--अशा व्यक्तीने दिली नाही तर, ती जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

कोणत्याही व्यक्तीस जमिनीचा कब्जा देण्याची रीत.

३९. (१) कोणत्याही जमिनीचा कब्जा देणे किंवा कब्जा परत देणे किंवा तिचा उपयोग परत करू देणे याविषयी जिल्हाधिकाऱ्याने किंवा कलम २७ अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी ज्या मामलतदाराच्या किंवा तहसिलदाराच्या अधिकारक्षेत्रात ती जमीन असेल तो मामलतदार किंवा तहसिलदार जणू तो आदेश मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ अन्वये मामलतदाराने दिलेला निर्णय आहे, असे समजून त्या अधिनियमाच्या कलम २१ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने करील. १९०६ मुंबई

(२) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने अपिलात दिलेल्या [४][किंवा राज्य शासनाने फेरतपासणीत दिलेल्या] आदेशाची अंमलबजावणी, पोट-कलम (१) अन्वये जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी ज्या पद्धतीची तरतूद करण्यात आली आहे त्याच पद्धतीने करण्यात येईल.

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २६ (अ) अन्वये "घोषणापत्राच्या किंवा" या शब्दांनी सुरू होणारा व "कोणत्याही दिवशी" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाचे कलम २६ (ब) अन्वये, या परंतुकाची भर घालण्यात आली.

३. वरील अधिनियमाचे कलम २७ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. हे शब्द, १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ यातील कलम २ अन्वये दाखल करण्यात आले.

**संक्षिप्तरीत्या चौकशी करून काढून टाकणे.**

४०. जी कोणतीही व्यक्ती,--

(क) जी जमीन या अधिनियमान्वये राज्य शासनाकडे निहित असेल, किंवा

(ख) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये ज्या जमिनीचा उपभोग व भोगवटा करण्याचा तिला हक्क नसेल,

अशा कोणत्याही जमिनीचा अनधिकृतपणे भोगवटा करीत असेल किंवा अशी कोणतीही जमीन अवैधरीत्या तिच्या कब्जात असेल तर, जिल्हाधिकारी, यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, संक्षिप्तरीत्या काम चालवून अशा व्यक्तीस काढून टाकता येईल.

**विवरण इत्यादी सादर करण्यात कसूर केल्यास शिक्षा.**

[1][४०-क. (१) कलम १२ अन्वये आवश्यक ठरविलेले विवरण देण्यास जी जबाबदार आहे अशी कोणतीही व्यक्ती किंवा कुटुंब घटकातील व्यक्ती, त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत ते विवरण सादर करण्यात कसूर करील किंवा जे खोटे असल्याचे तिला माहीत असेल किंवा जे खोटे आहे असे तिला सकारण वाटत असेल असे विवरण पुरवील त्या व्यक्तीला कलम १३ मध्ये विहित केलेल्या शिक्षेव्यतिरिक्त, दोषसिद्धीनंतर, दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची, कोणतेही न्यायालय, जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीशिवाय दखल घेणार नाही, अशी मंजुरी, विहित करण्यात येतील अशा नियमांना अधीन राहून, देण्यात येईल.]

**अधिकारितेस प्रतिबंध.**

४१. या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार, [2][आयुक्ताने], जिल्हाधिकाऱ्याने, [3][न्यायाधिकरणाने] किंवा कलम २७ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, वा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने किंवा राज्य शासनाने ज्या कोणत्याही प्रश्नाचा निवाडा करावयाचा असेल, निर्णय करावयाचा असेल किंवा तो विचारात घ्यावयाचा असेल त्या प्रश्नाचा निवाडा करण्याची, त्यावर निर्णय देण्याची किंवा त्यांचा विचार करण्याची कोणत्याही दिवाणी न्यायालयास अधिकारिता असणार नाही.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनाकरिता "दिवाणी न्यायालय" या संज्ञेत, मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६ अन्वये रचना केलेल्या मामलतदार न्यायालयाचा समावेश होतो.

(१९०६ चा मुंबई २.)

**चौकशी व कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असणे.**

४२. जिल्हाधिकारी, [4][न्यायाधिकरण] व महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण याजपुढील चौकशीची सर्व कामे व इतर कार्यवाही ही, भारतीय दंड संहिता, कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही आहे असे समजले जाईल.

(१९६० चा मुंबई ४५.)

---

[1] १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १३ अन्वये, कलम ४०-क समाविष्ट करण्यात आले.

[2] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २८ अन्वये, "जिल्हाधिकाऱ्याने" या शब्दापूर्वी "आयुक्ताने" या शब्दाची भर घालण्यात आली.

[3] १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १४ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १५ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

अधिकारी हे लोकसेवक असणे.

४३. या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार काम करणारे अधिकारी हे भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थाप्रमाणे लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल. १८६० मुंबई

एकापेक्षा अधिक ग्रामलेखापालांच्या अधिकारितेत जमीन धारण करण्यात आली असेल त्या बाबतीत पुरवावयाचे तपशील.

[1][४३-क.(१) दिनांक २६ सप्टेंबर, १९७० रोजी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही दिनांकास, मालक म्हणून किंवा कूळ म्हणून किंवा अंशतः मालक आणि अंशतः कूळ म्हणून एकापेक्षा अधिक ग्रामलेखापालांच्या अधिकारितेतील जमीन धारण करणारी प्रत्येक व्यक्ती, विहित मुदतीत, वेळोवेळी, अशी कोणतीही जमीन ज्यांच्या अधिकारितेत असेल अशा प्रत्येक तहसिलदारास तिने अशा रीतीने धारण केलेल्या सर्व जमिनीसंबंधी खरा आणि अचूक तपशील, विहित रीतीने, पुरवील तसेच, अशी व्यक्ती, भारताच्या इतर कोणत्याही भागात तिने धारण केलेल्या जमिनीचा, कोणताही असल्यास, तपशीलही अशा कोणत्याही तहसिलदारास पुरवील.

(२) एखाद्या व्यक्तीने धारण केलेल्या जमिनीचा तपशील, वाजवी कारणाशिवाय, विहित मुदतीत देण्यात कसूर केली असेल किंवा जो खोटा असल्याचे तिला माहीत असेल किंवा तो खोटा असल्याचे तिला सकारण वाटत असेल असा तपशील पुरविला असेल त्या बाबतीत, तहसिलदार, उक्त व्यक्तीवर नोटीस बजावील व पोट-कलम (३) द्वारे तरतूद केलेली शास्ती तिजवर का लादण्यात येऊ नये यासंबंधी, अशी नोटीस बजावल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, कारण दर्शविल्याबद्दल अशा व्यक्तीस फर्मावील. दिलेले उत्तर किंवा दर्शविलेले कारण विचारात घेतल्यानंतर, उक्त व्यक्तीने, वाजवी कारणाशिवाय, वेळेवर तपशील देण्यामध्ये कसूर केली आहे किंवा जो खोटा असल्याचे तिला माहीत असेल किंवा जो खोटा असल्याचे तिला सकारण वाटत असेल असा तपशील तिने दिला आहे याबद्दल तहसिलदाराची खात्री होईल तर, त्यास, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केलेली शास्ती लादता येईल व आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या मुदतीत, खरा व अचूक तपशील सादर करण्यास तिला भाग पाडता येईल.

(३) एखाद्या व्यक्तीने पोट-कलम (१) अन्वये विहित करण्यात आलेल्या किंवा पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीत तपशील देण्यात कसूर केली असेल किंवा जो खोटा असल्याचे तिला माहीत असेल किंवा जो खोटा असल्याचे तिला सकारण वाटत असेल असा तपशील तिने दिला असेल तर, ती व्यक्ती, पंचवीस रुपये दंड देण्यास पात्र ठरेल.]

या अधिनियमान्वये केलेल्या उपाययोजनेस संरक्षण.

४४. या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कारवाई करता येणार नाही.

---

[1] १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २९ अन्वये, कलम ४३-क समाविष्ट करण्यात आले.

[1][४४-क. जर कोणत्याही क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी किंवा या अधिनियमातील कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनांसाठी किंवा त्याच्या कोणत्याही तरतुदीसाठी किंवा तरतुदींसाठी कलम २-क अन्वये एखाद्या न्यायाधिकरणाची रचना किंवा पुनर्रचना करण्यात आली असेल तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यांच्या अपवादाने, केवळ न्यायाधिकरणालाच अशा क्षेत्राच्या किंवा क्षेत्रांच्या किंवा या अधिनियमाच्या किंवा त्याखालील कोणत्याही नियमांच्या कोणत्याही प्रयोजनाच्या किंवा प्रयोजनांच्या किंवा तरतुदीच्या किंवा तरतुदींच्या संबंधात (कलम २-क, पोट-कलम (६) [2][किंवा कलम ४५-क, पोट-कलम (२)] च्या तरतुदींखेरीज करून) जिल्हाधिकाऱ्यांची सर्व कर्तव्ये पार पाडता येतील, आणि या अधिनियमातील किंवा नियमांतील अशा कोणत्याही तरतुदीत केलेला जिल्हाधिकाऱ्यांचा निर्देश हा न्यायाधिकरण निर्देश असल्याचे समजण्यात येईल आणि त्यानुसार त्या तरतुदींचा अन्वयार्थ लावण्यात येईल. काही क्षेत्रात किंवा या अधिनियमाच्या काही प्रयोजनार्थ, जिल्हाधिकाऱ्यांच्या अपवादाने जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार वापरण्याचा किंवा त्यांची कर्तव्ये पार पाडण्याचा न्यायाधिकरणाचा अधिकार.

४४-ख. या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधित काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही विधिज्ञास, या अधिनियमाखालील, कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी प्राधिकृत अधिकारी, न्यायाधिकरण, जिल्हाधिकारी, आयुक्त, राज्य शासन किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्यासमोर, कोणत्याही पक्षकाराच्यावतीने, उपस्थित राहण्याचा हक्क असणार नाही : विधिज्ञ, इत्यादींना उपस्थितीतून वगळणे.

परंतु, पक्षकार हा अज्ञान किंवा वेडा असेल त्याबाबतीत, त्याच्या पालकास उपस्थित राहता येईल आणि विकलांग असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, त्याच्या प्राधिकृत अभिकर्त्यास उपस्थित राहता येईल.

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनार्थ, 'विधिज्ञ' या संज्ञेत, अधिवक्ता, न्यायप्रतिनिधी, वकील किंवा इतर विधिव्यवसायी यांचा समावेश होतो.]

४५. (१) राज्य शासनाला सामान्य व महसुली प्रशासनात जो अधिकार व जे नियंत्रण असते तेच या अधिनियमाशी संबंधित असलेल्या सर्व बाबतीत त्यास, कलम २७ खाली प्राधिकृत केलेले अधिकारी, या अधिनियमाखाली काम करणारे जिल्हाधिकारी आणि आयुक्त याबाबत असेल, नियंत्रण.

---

१. १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १६ अन्वये, कलम ४४-क व कलम ४४-ख समाविष्ट करण्यात आले.

२. १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७, कलम ३ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(२) राज्य शासनास कोणत्याही वेळी स्वत: होऊन किंवा ज्याच्यावर अन्याय झाला आहे अशा व्यक्तीने अर्ज केला असता, कलमे १७ ते २१ (दोन्ही कलमे धरून) [२]**** खाली केलेल्या कोणत्याही चौकशीचे किंवा कार्यवाहीचे अभिलेख त्या कलमाखालील चौकशीची किंवा कार्यवाहीची (किंवा तिच्या भागाची) [३]*** वैधता किंवा औचित्य याची खातरजमा करून घेण्यासाठी मागवून घेता येतील आणि पक्षकारास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर त्यावर त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील :

परंतु, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे राज्य शासनास, कलम २१ अन्वये जमिनीबाबत जे घोषणापत्र केलेले असेल त्या घोषणापत्रासंबंधीच्या किंवा त्याच्या भागासंबंधीच्या कोणत्याही चौकशीचे किंवा कार्यवाहीचे अभिलेख मागविण्याचा हक्क असणार नाही; मात्र, अशा घोषणापत्राविरुद्ध किंवा त्याच्या भागाविरुद्ध तरतूद केलेल्या कालावधीत अपील केले गेले असेल, कलम २१, [४][****] आणि अशा घोषणापत्राच्या किंवा त्याच्या भागाच्या दिनांकापासून तीन वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असेल तर, राज्य शासनास अशा चौकशीतील किंवा कार्यवाहीतील अभिलेख मागवून घेण्याचा हक्क राहील :

[५][परंतु आणखी असे की, जी जमीन याआधीच अतिरिक्त म्हणून घोषित करण्यात आली असून या अधिनियमाच्या तरतुदींनुसार जिचे वितरण करण्यात आले आहे तिला बाधा पोहोचेल अशा रीतीने या कलमाखाली कोणताही आदेश काढण्यात येणार नाही :

तसेच, ज्या बाबतीत अतिरिक्त म्हणून घोषित करण्यात आलेली जमीन ही, अतिरिक्त म्हणून घोषित करता आली असती अशा प्रत्यक्ष जमिनीपेक्षा कमी आहे असे अभिकथित करण्यात आले असेल अशाच बाबतीत केवळ या कलमाखालील पुनरीक्षण अधिकारितेचा वापर करण्यात येईल.]

(३) राज्य शासनास, ते जे निर्बंध व अटी लादील त्यास अधीन राहून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, [६][या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये आणि या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींअन्वये त्यास जे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत त्यांपैकी कलम ४६ खालील नियम करण्याच्या किंवा कलम ४९ खालील आदेश देण्याच्या अधिकाराव्यतिरिक्त इतर अधिकार,] आयुक्तास सोपविता येतील].

---

१. १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये, मूळ पोट-कलम (२) ऐवजी पोट-कलम (२) व (३) दाखल करण्यात आली.

२. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३० अन्वये, "किंवा कलम २७" हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३० अन्वये, "किंवा कलम २७ खालील कोणत्याही आदेशाची" हा मजकूर वगळण्यात आला.

४. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

५. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

६. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][४५-क (१) या कलमाच्या तरतुदींस अधीन राहून, आयुक्ताला, स्वाधिकारे अथवा पीडित व्यक्तीने त्याच्याकडे अर्ज केल्यानंतर अथवा राज्य शासनाकडून त्याबाबतीत त्याच्याकडे निर्देश करण्यात आल्यानंतर, कोणत्याही वेळी-- कलम २७ खालील चौकशी व कार्यवाही यात पुनरीक्षण करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

(क) कोणत्याही चौकशीच्या किंवा कार्यवाहीच्या (अथवा तिच्या कोणत्याही भागाच्या) वैधतेबाबत अथवा औचित्याबाबत स्वत:ची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनास्तव, [२][कलम २५ (ज्या बाबतीत अपील दाखल करण्यात आले असेल अशा प्रकरणांव्यतिरिक्त) किंवा, यथास्थिति, कलम २७] खालील कोणत्याही चौकशीची अथवा कार्यवाहीची कागदपत्रे मागविता येतील; आणि

(ख) संबंधित पक्षकारास आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यावर त्याला योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

परंतु, राज्य शासनाने निर्देश केला असेल त्या बाबीव्यतिरिक्त, [३][कलम २५ अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाईची रक्कम देण्यात आल्याच्या किंवा यथास्थिति, कलम २७ अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून जमीन देण्यात आल्याच्या दिनांकापासून] एक वर्षाची मुदत संपल्यानंतर, अशी कोणतीही कागदपत्रे मागविण्यात येणार नाहीत.

[४][(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेली चौकशी किंवा कामकाज हे ज्यावेळी सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या अधिकाऱ्याकडून किंवा असा अधिकारी ज्याचा सभापती आहे अशा न्यायाधिकरणाकडून करण्यात आले असेल त्या बाबतीत, पोट-कलम (१) खालील आयुक्ताचे अधिकार असा अधिकारी ज्या जिल्हाधिकाऱ्याला दुय्यम असेल त्या जिल्हाधिकाऱ्यास वापरता येतील.]

(३) पोट-कलम (२) अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून कोणताही आदेश देण्यात येईल त्या बाबतीत, पोट-कलम (१) मध्ये घालून दिलेल्या रीतीने व त्यातील शर्तीस अधीन राहून, आयुक्तास त्या आदेशांचे पुनरीक्षण करता येईल.]

**४६.** (१) राज्य शासनास आगाऊ प्रसिद्ध करावयाच्या शर्तीस अधीन राहून, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) वरील अधिकारांच्या समान्यतेस बाध न येता, अशा नियमात पुढील बाबींसंबधी तरतूद करता येईल :--

(क) विवरणपत्राचा नमुना व कलम १२ अन्वये त्यात द्यावयाचा तपशील;

(ख) कलम १७ च्या पोट-कलम (१) अन्वये द्यावयाच्या जाहीर नोटिशीचा नमुना व पोट-कलम (३) खंड (ग) अन्वये सादर करावयाचा तपशील ज्या नमुन्यात असेल तो नमुना;

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३१, अन्वये कलम ४५-क समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६०, कलम ५ (१) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७, कलम ४ द्वारे मूळ उपकलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(ग) कलम २७ अन्वये शासनाकडे निहित असलेली जमीन देण्यासाठी करावयाचे नियम;

(घ) कलम २८ च्या प्रयोजनासाठी करावयाचे नियम;

(ङ) कलम २९ अन्वये ज्या परिस्थितीत व ज्या शर्तीस अधीन राहून मंजुरी देता येईल ती परिस्थिती व त्या शर्ती;

[1]* * * * *

(छ) सामान्यतः या अधिनियमाच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या सर्व बाबतीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी.

(३) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवले जातील आणि ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या अधिवेशनात किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील व राजपत्रात प्रसिद्ध करील त्यास ते अधीन असतील.

वगळण्यात आलेल्या जमिनी.

[2][**४७.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींतून पुढील जमिनी वगळण्यात येतील :--

(क) शासनाने (केंद्र सरकार किंवा इतर कोणतेही राज्य शासन धरून) अथवा राज्याच्या अथवा संघराज्याच्या मालकीच्या अथवा त्यांच्या नियंत्रणाधीन असलेल्या (कंपनीसहित) एखाद्या महामंडळाने धारण केलेली जमीन;

(ख) महाराष्ट्र राज्यात विधिअन्वये स्थापन करण्यात आलेल्या स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा विद्यापीठाच्या मालकीची किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कृषि महाविद्यालयाच्या किंवा शाळेच्या किंवा कृषिविषयक संशोधन करीत असलेल्या कोणत्याही संस्थेच्या मालकीची अथवा त्यांनी अथवा त्यांच्याकडून, पट्ट्याने धारण करण्यात आलेली जमीन;

(ग) विहित केलेल्या रीतीने ज्यास राज्य शासनाकडून मान्यता देण्यात येईल अशा लष्करी प्रक्षेत्रांनी धारण केलेली जमीन;

(घ) भू-विकास बँकेकडून अथवा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून अथवा प्राथमिक सहकारी संस्थेकडून, ४ ऑगस्ट, १९५९ पूर्वी, भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनी;

[3][ (ङ) एखाद्या बँकेने किंवा सहकारी संस्थेने आपल्या देय रकमांच्या वसुलीसाठी प्रतिभूती म्हणून धारण केलेली जमीन.

**स्पष्टीकरण.**--खंड (ङ) च्या प्रयोजनांसाठी,--

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३२ अन्वये खंड (फ) वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३३, ८ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ४७ दाखल करण्यात आले.

३. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ८ (१) द्वारे खंड (ङ) समाविष्ट करण्यात आला.

(१) बँक म्हणजे--

(एक) बँक व्यवसाय नियमन अधिनियम, १९४९ यात व्याख्या केल्याप्रमाणे एखादी बँक व्यवसाय १९४९ चा
कंपनी; मुंबई १०.

(दोन) भारताची स्टेट बँक अधिनियम, १९५५ अन्वये रचना करण्यात आलेली भारताची स्टेट बँक; १९५५ चा मुंबई २३.

(तीन) भारताची स्टेट बँक (दुय्यम बँका) अधिनियम, १९५९ यात व्याख्या केल्याप्रमाणे एखादी दुय्यम १९५९ चा
बँक; मुंबई ३८.

(चार) बँक व्यवसाय कंपन्या (उपक्रमांचे संपादन आणि हस्तांतरण) अधिनियम, १९७० अन्वये १९७० चा
रचना करण्यात आलेली एखादी संबद्ध नवीन बँक; महा. ५.

(पाच) बँक व्यवसाय नियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ५१ अन्वये केंद्र शासनाकडून १९४९ चा
अधिसूचित करण्यात आलेली कोणतीही बँक व्यवसाय परिसंस्था; मुंबई १०.

(सहा) कृषि पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ अधिनियम, १९६३ अन्वये रचना करण्यात आलेले कृषि १९६३ चा
पुनर्वित्तव्यवस्था महामंडळ; महा. १०.

(सात) कोणतेही कृषि-उद्योग महामंडळ;

(आठ) कृषि वित्तव्यवस्था महामंडळ मर्यादित कंपन्यांबाबत अधिनियम, १९५६ अन्वये कायद्याने १९५६ चा
संस्थापित केलेली कंपनी; मुंबई १.

(२) "सहकारी संस्था" याचा अर्थ, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी १९६१ चा
करण्यात आलेली किंवा नोंदणी करण्यात आल्याचे समजण्यात येणारी सहकारी संस्था असा आहे आणि महा. २४.
त्यामध्ये सहकारी भू-विकास बँकेचा समावेश होतो.]

(२) या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाच्या अधीन राहून, राज्य शासनाला, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, **राजपत्रातील** आदेशाद्वारे, पुढील जमिनींपैकी कोणतीही जमीन, वगळण्यात यावयाच्या क्षेत्राची व्याप्ती धरून आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटींवर व शर्तींवर, या अधिनियमाच्या तरतुदींमधून वगळता येईल :--

(क) ज्या जमिनीच्या उत्पन्नाच्या मोठ्या भागाचा शिक्षणाच्या अथवा वैद्यकीय साहाय्याच्या किंवा या दोन्ही प्रयोजनार्थ विनियोग करण्यात येत असेल अशी, किंवा जिच्या उत्पन्नाच्या मोठ्या भागाचा अशा रीतीने विनियोग करण्यात येत नसेल, परंतु अशा जमिनीच्या उत्पन्नाच्या मोठ्या भागाचा, अशी जमीन वगळणारा आदेश प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीत त्या प्रयोजनार्थ विनियोग करण्यात येईल अशी हमी प्रारंभाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत (किंवा राज्य शासन या बाबतीत परवानगी देईल अशा आणखी कालावधीत) विहित नमुन्यात, जिल्हाधिकाऱ्याला देण्यात येईल, अशी विश्वस्त-व्यवस्थेने [१][किंवा एखाद्या वक्फाने] दिनांक २६ सप्टेंबर, १९७० पूर्वी धारण केलेली जमीन;

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ८ (२) (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ख) कोणत्याही व्यक्तीने, अश्वपैदास क्षेत्रासाठी किंवा [1][कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेने किंवा एखाद्या वक्फाने] पांजरपोळ किंवा गोशाळा, [2][***] यासाठी किंवा दिनांक २६ सप्टेंबर, १९७० पूर्वी धारण केलेली जमीन;

[3][(खख) कोणत्याही सार्वजनिक मर्यादित कंपनीने किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेने किंवा एखाद्या वक्फाने, पशु किंवा मेंढ्या यांच्या पैदाशीच्या प्रयोजनार्थ, दिनांक २६ सप्टेंबर, १९७० पूर्वी धारण केलेली जमीन :

परंतु, या खंडातील कोणतीही गोष्ट, बागायती उत्पन्न किंवा (गवत किंवा वैरण पिके याव्यतिरिक्त) पिके काढण्यासाठी, २६ सप्टेंबर, १९७० पूर्वी तीन वर्षांच्या अखंड कालावधीसाठी उपयोगात आणलेल्या जमिनीस किंवा पशु किंवा मेंढ्या यांच्या देशी किंवा स्थानिक पैदाशीच्या सुधारणेच्या हेतूने जी उपयोगात आणली जात नाही अशा जमिनीस लागू होणार नाही. कोणतीही जमीन या परंतुकात मोडते किंवा नाही याबद्दलच्या प्रश्नावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर कोणत्याही दिवाणी न्यायालयात आक्षेप घेतला जाणार नाही.]

(ग) कोणत्याही खऱ्याखुऱ्या औद्योगिक किंवा अन्य कृषीतर वापरासाठी औद्योगिक उपक्रमाकडून, धारण करण्यात आलेली किंवा त्याच्याकडून कोणत्याही रीतीने संपादन करण्यात येणारी जमीन, अशी जमीन अशा प्रकारे धारण करण्यात आली आहे किंवा संपादन करण्यात येणार आहे किंवा कसे हे ठरविताना, राज्य शासन, पुढील गोष्टी विचारात घेईल :--

(एक) (औद्यागिक अथवा कृषीतर वापरासाठी उपक्रमाने पूर्वीच धारण केलेल्या कोणत्याही जमिनीसहित) उपक्रमाकडून अगोदरच धारण करण्यात आलेल्या, कोणतीही असल्यास, जमिनीची मर्यादा व तिचे ठिकाण;

(दोन) ज्या व्यक्तीकडून जमीन संपादन करण्यात येणार असेल त्या व्यक्तीने धारण केलेल्या जमिनीची मर्यादा.

(३) जी कोणतीही जमीन,--

(क) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वर्णनाबरहुकूम असल्याचे बंद झाले असेल अशी कोणतीही जमीन, त्या पोट-कलमाच्या तरतुदींअन्वये वगळण्यात आलेली जमीन म्हणून असण्याचे चालू राहणार नाही;

(ख) जी कोणतीही जमीन, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वर्णनाबरहुकूम असण्याचे बंद झाले असेल अशी कोणतीही जमीन, किंवा ज्या शर्तींस अधीन राहून, ती वगळण्यात आली असेल त्यापैकी कोणत्याही शर्तीचा कोणताही भंग केला असेल, तर अशी जमीन त्या पोट-कलमाच्या तरतुदींअन्वये वगळण्यात आलेली जमीन म्हणून असण्याचे चालू राहणार नाही;

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७, कलम ८ (२) (ब) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) (ब) (दोन) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ८ (२) (क) द्वारे खंड (खख) समाविष्ट करण्यात आला.

व ती अशा रीतीने वगळण्यात आलेली जमीन म्हणून असण्याचे बंद झाल्यानंतर, या अधिनियमाच्या तरतुदी या इतर जमिनीच्या संबंधात जशा लागू होतात त्याप्रमाणे, परंतु कलम १२ अन्वये सादर करावयाचे विवरण हे, वगळण्यात आलेली जमीन म्हणून असण्याचे ज्या दिनांकास बंद झाले असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात येईल या फेरफारासह, अशा जमिनीस, लागू होतील.

(४) कोणत्याही प्रकरणात पोट-कलम (२) खाली लादण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीचा भंग करण्यात आला आहे किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उद्भवल्यास राज्य शासन, त्यामध्ये, हितसंबंध असणाऱ्या पक्षकारास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, उक्त बाबीच्या संबंधात निर्णय घेईल व राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(५) प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी जी वगळण्यात आलेली जमीन असेल अशी कोणतीही जमीन, पोट-कलमे (१) आणि (२) च्या तरतुदींना अधीन राहून, अशा प्रारंभाच्या दिनांकानंतरही वगळलेली जमीन असण्याचे चालू राहणार नाही, आणि अशी जमीन वगळलेली जमीन म्हणून चालू राहण्याचे बंद झाल्यावर, पोट-कलम (३) च्या तरतुदी , योग्य त्या फेरफारासह, परंतु कलम १२ अन्वये सादर करावयाचे विवरण हे प्रारंभीच्या दिनांकापासून, [१][तीन महिन्यांच्या] आत सादर करण्यात येईल, या फेरफारासह, लागू होतील.]

[२][ **४८.** सुधारणा अधिनियम, १९७२ याच्या प्रारंभापासून, दुसऱ्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांमध्ये, उक्त अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व मर्यादेपर्यंत सुधारणा करण्यात येईल व याद्वारे, तशी सुधारणा करण्यात येत आहे.] सुधारलेले अधिनियम.

**४९.** [३][सुधारणा अधिनियम, १९७२ अन्वये सुधारण्यात आल्याप्रमाणे] या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना (आणि विशेषत: कमाल क्षेत्र निश्चित करण्याबाबत, आणि कोणतीही अतिरिक्त जमीन निश्चित करण्याबाबत किंवा तिची वाटणी करण्याबाबत) कोणतीही अडचण उपस्थित होईल तर, राज्य शासनास ती अडचण दूर करण्यासाठी, **राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करून, त्यास आवश्यक वाटेल ती तरतूद करता येईल, त्याप्रमाणे निदेश देता येतील किंवा इतर अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

---

१. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम १८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७५ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ३४ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम ४८ दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनिमयाच्या कलम ३५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## [1][पहिली अनुसूची

(कलमे ५ व २३ पहा)

| जिल्हे व तालुके | कमाल क्षेत्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम २, खंड (५), उप-खंड (क) खाली येणाऱ्या जमिनीकरिता | कलम २, खंड (५), उप-खंड (ख) खाली येणाऱ्या जमिनीकरिता | कलम २, खंड (५), उप-खंड (ग) खाली येणाऱ्या जमिनीकरिता | कलम २, खंड (५), उप-खंड (घ) खाली येणाऱ्या जमिनीकरिता | कलम २, (खंड (५), उप-खंड (ङ) खाली येणाऱ्या जमिनीकरिता | कोरडवाहू जमिनीकरिता दर हेक्टरी किंमत |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | हेक्टर आर | हेक्टर आर | हेक्टर आर | हेक्टर आर | हेक्टर आर | दर हेक्टरी आकारणीच्या पुढील पटीइतकी ६० |
| १ मुंबई उपनगर जिल्हा .. | ७ २८.४३ (१८ एकर) | १० ९२.६५ (२७ एकर) | १४ ५६.८६ (३६ एकर) | १४ ५६.८६ (३६ एकर) | २१ ८५.२९* (५४ एकर) | १५० |
| २. ठाणे .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे* | १५० |
| ३. कुलाबा .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे* | १५० |
| ४. रत्नागिरी .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे* | १५० |
| ५. भंडारा .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे* | २५० |
| ६. चंद्रपूर जिल्ह्याचे ब्रह्मपुरी, गडचिरोली व सिरोंचा हे तालुके. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे* | २५० |
| ७. नाशिक .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | २१ ८५.२९ | १५० |
| ८. धुळे .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |

* कलम ५ खाली न येणाऱ्या कोरडवाहू पिकांच्या जमिनींसाठी.

[1] १९७५ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ३६ अन्वये, मूळ अनुसूचीऐवजी ही पहिली अनुसूची दाखल करण्यात आली.

| १ | २ हेक्टर आर | ३ हेक्टर आर | ४ हेक्टर आर | ५ हेक्टर आर | ६ हेक्टर आर | ७ दर हेक्टरी |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. जळगाव .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| १०. अहमदनगर .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| ११. पुणे .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| १२. सातारा ... | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| १३. सांगली .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| १४. कोल्हापूर .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| १५. सोलापूर .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २०० |
| १६. औरंगाबाद .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २०० |
| १७. परभणी .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २०० |
| १८. नांदेड .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २०० |
| १९. उस्मानाबाद .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २०० |
| २०. बीड .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २०० |
| २१. नागपूर .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| २२. वर्धा .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| २३. चंद्रपूर जिल्ह्याचे ब्रह्मपुरी, गडचिरोली व सिरोंचा हे तालुके वगळून. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २५० |
| २४. अकोला .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| २५. अमरावती .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० |
| २६. यवतमाळ .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | २५० |
| २७. बुलढाणा .. | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | वरीलप्रमाणे | ---- | वरीलप्रमाणे | १५० ] |

## [1][दुसरी अनुसूची

सुधारणा करण्यात आलेले अधिनियम

(कलम ४८ पहा)

| वर्ष | क्रमांक | संक्षिप्त नाव | केलेल्या सुधारणांची मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९४८ | ६७ | मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८.<br><br>१९७५ चा महा. २१. | कलम ६३, पोट-कलम (१) यामधील,--<br>(क) "कमाल क्षेत्राच्या दोन-तृतीयांशाहून अधिक" या मजकुराऐवजी "कमाल क्षेत्राहून अधिक" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ख) "महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१" या मजकुरापूर्वी, "महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे) आणि (सुधारणा) अधिनियम, १९७२ या अन्वये सुधारण्यात आल्याप्रमाणेचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.<br>(ग) परंतुकामध्ये पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :--<br>"शेतकरी नसणाऱ्या व्यक्तीस, जर तिचे इतर साधनांपासूनचे वार्षिक उत्पन्न रुपये १२,००० किंवा त्याहून अधिक असेल तर, कृषि प्रयोजनासाठी जमीन विकण्यात येत असेल त्याबाबतीत अशी परवानगी देण्यात येणार नाही.". |
| १९५० | २१ | हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५०.<br><br>१९७५ चा महा. २१. | कलम ४७, पोट-कलम (१) यामधील,--<br>(क) "कमाल क्षेत्राच्या दोन-तृतीयांशाहून अधिक" या मजकुराऐवजी "कमाल क्षेत्राहून अधिक" हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(ख) "महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१" या मजकुरापूर्वी "महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे) आणि (सुधारणा) अधिनियम, १९७२ या अन्वये सुधारण्यात आल्याप्रमाणेचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३७ अन्वये, मूळ दुसऱ्या अनुसूचीऐवजी ही दुसरी अनुसूची दाखल करण्यात आली.

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| | | | (ग) परंतुकामध्ये पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :-- "शेतकरी नसणाऱ्या व्यक्तीस, जर तिचे इतर साधनांपासूनचे वार्षिक उत्पन्न रुपये १२,००० किंवा त्याहून अधिक असेल तर, कृषि प्रयोजनासाठी, जमीन विकण्यात येत असेल त्याबाबतीत अशी परवानगी देण्यात येणार नाही.". |
| १९५८ | ९९ | मुंबई कुळवहिवाट व शेत-जमीन (विदर्भ विभाग) अधिनियम, १९५८. | कलम ८९, पोट-कलम (१) यामधील,-- (क) "कमाल क्षेत्राच्या दोन-तृतीयांशाहून अधिक" या मजकुराऐवजी "कमाल क्षेत्राहून अधिक" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | १९७५ चा महा. २१. | (ख) "महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१" या मजकुरापूर्वी "महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे) आणि (सुधारणा) अधिनियम, १९७२ या अन्वये सुधारण्यात आल्याप्रमाणेचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| | | | (ग) परंतुकामध्ये पुढील मजकुराची भर घालण्यात येईल :-- "शेतकरी नसणाऱ्या व्यक्तीस, जर तिचे इतर साधनांपासूनचे वार्षिक उत्पन्न रुपये १२,००० किंवा त्याहून अधिक असेल तर, कृषि प्रयोजनासाठी, जमीन विकण्यात येत असेल त्याबाबतीत अशी परवानगी देण्यात येणार नाही.]. |

## तिसरी अनुसूची

[१९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ४ (१) अन्वये दिनांक १ ऑक्टोबर, १९६९ पासून वगळण्यात आली.]

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६.